रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक १७४ । पृष्ठे १० ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

(छायाचित्र : समीर मालोदे)

रायगड, रविवार, दि. ३० नोव्हेंबर २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹



# बाईक रॅलीतून आघाडीचा प्रचार

## वे|ध|क

### थोरातांकडून सत्ताधिकाऱ्यांची खिल्ली

**संगमनेर :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रचारादरम्यान वेगवेगळ्या ठिकाणी उद्योगमंत्री उदय सामंत यांना व्यासपीठावरूनच फोन लावत एमआयडीसी मंजूर केल्याची ध्वनीफित ऐकवत, ते जिथे जातात तिथे एमआयडीसी मंजूर करतात. उद्या ते नद्या, डोंगरही मंजूर करतील. कालही संगमनेरमध्ये त्यांनी सगळेच मंजूर करून टाकले. सध्या त्यांची 'अशी ही बनवाबनवी' चालू असल्याची खिल्ली काँग्रेसचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी उडवली आहे. संगमनेरच्या प्रचार सभेत बाळासाहेब थोरात बोलत होते. ते पुढे म्हणाले की, निवडणुकीत पान २ वर

### चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू

**नाशिक :** मुंबई नाका येथील गायकवाडनगर भागातून एक दुर्दैवी घटना समोर आली आहे. येथील घराच्या बाहेर एक पाचवर्षीय चिमुकला खेळत असताना त्याच्या अंगावर लोखंडी गेट पडून त्याचा मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी (दि.२८) घडली. अयनिश गवई असे या मृत मुलाचे नाव आहे. अयनिशने खेळता-खेळता घराच्या लोखंडी गेटवर चढण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी अचानक गेट कोसळून त्याच्या अंगावर पडले. त्यात त्याच्या डोक्यास गंभीर दुखापत झाली. त्याला त्वरित उपचारार्थ जिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी मृत घोषित केले.

## हजारो कार्यकर्ते झाले रॅलीमध्ये सहभागी



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग नगरपरिषद निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतील शेकाप व काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी शनिवारी (दि.२९) संपूर्ण अलिबाग शहरात बाईक रॅली काढली. शेकाप भवन येथून सुरु झालेल्या या रॅलीत उमदेवारांसह हजारो कार्यकर्ते सहभागी झाले होते. यानिमित्ताने एक वेगळा उत्साह पहावयास मिळाला. ही रॅली अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक तसेच नगराध्यक्षपदाच्या उमेदवार अक्षया नाईक यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण अलिबाग शहरातून काढण्यात आली. पान २ वर

### मतदारांचे जल्लोषात स्वागत

अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणूकीच्या निमित्ताने महाविकास आघाडीतील शेकाप व काँग्रेसच्या थेट नगराध्यक्षपदाच्या उमेदवार अक्षया नाईक यांच्यासह प्रभाग एक ते दहा मधील नगरसेवकपदाच्या उमेदवारांसह कार्यकर्त्यांनी अलिबाग शहरातून बाईक रॅली काढली. दरम्यान, जिल्हा सार्वजनिक वाचनालय अलिबागच्या कार्याध्यक्षा शैला पाटील यांनी सर्व उमेदवारांचे औक्षण केले. त्यानंतर फटाक्यांची आतषबाजी करून रॅलीला सुरूवात झाली. मारुती नाका, बाजारपेठ, रामनाथ, बालाजी नाका, कोळीवाडा परिसरात उमेदवारांचे मतदारांकडून जल्लोषात स्वागत करीत त्यांचे औक्षण करण्यात आले.

### प्रचारासाठी दिवस वाढला

रायगड : नगरपरिषद व नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर प्रचाराच्या मुदतीमध्ये वाढ करण्यात आली आहे. मतदानाच्या आदल्या दिवशी १ डिसेंबरपर्यंत रात्री १० वाजेपर्यंत प्रचार असणार आहे. त्यानंतर प्रचार बंदी लागू करण्यात आली आहे. त्यानंतर सभा, मोर्चे, ध्वनीक्षेपाचा वापर करता येणार नसल्याची माहिती राज्य निवडणूक आयोगाकडून उपलब्ध झाली आहे. पान २ वर



## थोरवेंनी 'डीएनए'चा लाँगफॉर्म सांगावा

### अखेर तटकरेंनी मौन सोडले

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

सर्वसामान्य माणसाच्या हितासाठी समर्पित भावनेने काम करणे, धर्मनिरपेक्षतेची जपवणूक करणे, समाजातील वेगवेगळ्या घटकातील लोकांना घेऊन काम करणे हा माझा डिएनए आहे. त्यामुळे आ. थोरवेंना माझा सवाल आहे की, त्यांनी डीएनएचा लाँगफॉर्म सांगावा. त्यांना त्याचा अर्थ समजत नसेल तर कोणाकडून तरी समजून घ्या, अशी टिका राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खा.. सुनिल तटकरेंनी शिंदे गटाचे आ. थोरवेंवर करत अखेर मौन सोडले आहे. खोपोली नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी अजित पवारांची राष्ट्रवादी, शेकाप आणि उद्धव ठाकरे पक्षाने परिवर्तन विकास आघाडी स्थापन केली आहे. यावेळी नगराध्यक्षपदाचे उमेदवार डॉ. सुनिल पाटील आणि सर्व नगरसेवकपदाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी खोपोलीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकासमोर उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या उपस्थित जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

पुढे बोलताना त्यांनी म्हटले की, खोपोलीत चार वर्ष प्रशासक आहे. त्यांची अवस्था उठ म्हटला की उठला पाहिजे, अशी आहे. प्रारूप विकास आराखडा तयार झाला आहे. पान २ वर

## शेकापचा नगरविकास आघाडीला पाठिंबा



**। पेण । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी नुकतीच पेणमध्ये भेट दिली. यावेळी नगरविकास आघाडीचे उमेदवार संजय म्हात्रे आणि सुजाता डाकी यांना शेतकरी कामगार पक्षाचा जाहिर पाठींबा आहे. त्यामुळे संजय म्हात्रे व सुजाता डाकी यांना निवडून द्यायचे आहे, असे आदेश जयंत पाटील यांनी कार्यकर्त्यांना दिले आहेत. यादरम्यान, संजय म्हात्रे यांनी जयंत पाटील यांचे स्वागत केले. यावेळी माजी नगराध्यक्ष गुरूनाथ मांजरेकर, माजी नगरसेवक प्रकाश शिंगरूत, गणेश पवार, नरेश गुजर, रविंद्र जाधव, सिद्धार्थ म्हात्रे आदी उपस्थित होते.

## जयंत पाटील यांचा कार्यकर्त्यांशी संवाद

### खोपोली नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दौरा

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोली नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी शनिवारी खोपोलीमध्ये दौरा केला. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधत उमेदवारांच्या तयारीचा सखोल आढावा घेतला. जयंत पाटील यांच्या आगमनाने खोपोलीत निवडणूकीच्या काळात संघटन बळकटीसाठी हा दौरा महत्वपुर्ण ठरणार, असा विश्वास यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.



खोपोली नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूकीत शेतकरी कामगार पक्षाने जनसंपर्क आणि संघटन बांधणीला वेग दिला आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी खोपोली शहरातील कार्यकर्त्यांशी संवाद साधला. शेकापच्या या बैठकीला कार्यकर्त्यांची उत्स्फूर्त उपस्थिती पाहायला मिळाली. ठिकठिकाणी जयंत पाटील यांचे जंगी स्वागत करण्यात आले. निवडणुकीच्या काळात संघटन बळकटीसाठी हा दौरा महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास स्थानिक पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. यावेळी खोपोली शहर परिवर्तन विकास आघाडीच्यावतीने लढणारे नगराध्यक्षपदाचे उमेदवार डॉ. सुनील पाटील, तसेच अरुण पुरी, विनिता कांबळे (औटी), निजामुद्दीन जळगावकर, रवी रोकडे, संतोष मालकर, शिल्पा मालकर, तस्लिमा नासिर पाटील आणि गणेश सूतक यांची जयंत पाटील यांनी व्यक्तिगत भेट घेऊन त्यांच्याशीसंवादसाधला.प्रचाराची दिशा, स्थानिक प्रश्नांची समज आणि जनसंपर्काची गती याबाबत जयंत पाटील यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. या भेटीदरम्यान विविध प्रभागांतील स्थानिक प्रश्न, नागरिकांच्या अपेक्षा आणि सध्या सुरू असलेल्या पान २ वर

### वृद्ध महिलेचा संशयास्पद मृत्यू

**महाड :** तालुक्यात गुन्ह्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून



यामध्ये चोरी, दरोडा, महिलांवर अत्याचार, लहान मुलींवर बलात्कार, खून व खुनाचा प्रयत्न असे गंभीर गुन्हे घडत आहेत. त्यातच शुक्रवारी (दि.२८) संध्याकाळी तालुक्यातील नाते गावातील काही अंतरावर एका वाड्याजवळ ७६ वर्षीय वृद्ध महिलेचा मृतदेह सापडला आहे. लीलावती राजाराम बलकावडे असे मृत महिलेचे नाव आहे. लीलावती बलकवडे यांचा मृतदेह सापडला तेव्हा त्यांच्या अंगावर दागिने नव्हते. त्यामुळे हा पान २ वर

**पनवेलमध्ये २००० बोगस मतदान** | **अरविंद म्हात्रे यांची चौकशीची मागणी**

## अरेच्या! एकाच पत्त्यावर २६८ मतदार

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

देशभरता काँग्रेस तर, राज्यात महाविकास आघाडी आणि मनसेने दुबार व बोगस मतदारांच्या मुद्यावर निवडणूक आयोगावर आक्षेप नोंदवला आहे. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विविध प्रभागांत अशाच प्रकारच्या मतदार नोंदण्या समोर येत आहेत. दरम्यान, पनवेल महानगरपालिका क्षेत्रात विविध प्रभागांतील मतदार यादीमध्ये मोठ्या प्रमाणात बोगस नावे समाविष्ट झाल्याच्या तक्रारी नागरिकांकडून वारंवार होत आहेत. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेची विश्वासनियता धोक्यात येत असून नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. या बाबत पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक तथा रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अरविंद म्हात्रे यांनी आवाज उठवला आहे.

अरविंद म्हात्रे म्हणाले की, महानगरपालिका प्रभाग क्रमांक २ मध्ये जवळजवळ २००० मतदान बोगस असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याच्यामधून २६८ मतदार हे एकाच वडिलांच्या नावाने तेही एकाच घरात दर्शवले आहेत. महत्वाचे म्हणजे ते घर सुद्धा उपस्थित नाही. तसेच, कल्याण पूर्व मधील मतदारांची प्रभाग क्रमांक २ मध्ये नोंद केलेली आहे. अशा प्रकारे बोगस मतदान प्रभाग क्रमांक २ मध्ये मोठ्या प्रमाणात केले आहेत. त्याची सविस्तर माहिती आयुक्तांना दिली असता त्यांनी सांगितले की, आम्ही मतदान कमी करू शकत नाही. त्यामुळे तुम्ही निवडणूक अधिकाऱ्यांकडे कळवा. त्याप्रमाणे मी स्वतः निवडणूक अधिकारी यांना ई-मेल केलेला आहे आणि सविस्तर पीडीएफ सुद्धा पाठवलेल्या आहे. जर निवडणूक अधिकारी यांनी मतदार यादीमध्ये बदल केला नाही तर मी स्वतः न्यायालयात या विषयावरती जाणार आहे. त्यामुळे ही बोगस नावे तातडीने तपासून मतदार यादीमधून वगळण्यात यावी. याबाबत पनवेल महानगरपालिकेच्या निवडणूक अधिकाऱ्यांनी लक्ष टाकून ज्या ज्या प्रभागांमधून तक्रारी आलेल्या आहेत त्यांची सहनिशा करून ती नावे वगळण्यात यावी, जेणेकरून पनवेल महानगरपालिकेची निवडणूक ही पारदर्शकपणे पार पाडता येईल, असे मत अरविंद म्हात्रे यांनी व्यक्त केले आहेत.

### निवडणूक प्रक्रियेची विश्वासनियता धोक्यात



राज्यासह जिल्ह्यात वारंवार दुबार व बोगस मतदारांचा मुद्दा समोर येत असून निवडणूक अधिकाऱ्यांचे याकडे जाणिव पूर्वक लक्ष होताना दिसत आहे. या बाबतीत वारंवार तक्रारी होऊन देखील सत्ताधारी मुग गिळून बसले आहेत. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेची विश्वासनियता धोक्यात आल्याची चर्चा सर्वत्र होत आहे.




# भाजपकडून स्वतःच्याच आब्रुचे धिंडवडे ?

**नगरपालिकेच्या निवडणूकीत मते मिळविण्यासाठी आश्वासनाचे गाजर**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

मागील चार वर्षापासून नगरपरिषदेवर प्रशासकीय राजवट होती. राज्यात व केंद्रात भाजप, महायुतीची सत्ता होती. तरीदेखील अलिबाग शहरातील प्रश्नांची सोडवणूक करण्यास भाजप उदासीन ठरले. मात्र, निवडणूकीत मते मिळविण्यासाठी शहरातील समस्यांचा पाढा वाचला. परंतु, स्वतःच्या आब्रुचे धिंडवडे त्यांनी पत्रकार परिषदेत काढल्याची चर्चा सध्या शहरात सुरु आहे. त्यामुळे या निवडणूकीत भाजपला अलिबागची जनता जागा दाखविल, अशी प्रतिक्रीया जनमानसातून उमटत आहे.

अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मते मिळविण्यासाठी भाजपच्या एका बड्या नेत्याने शहरातील डंपिंग ग्राऊड, क्रिंडागण आदी विषय पत्रकार परिषदेमध्ये मांडले. परंतु, अलिबाग नगरपरिषदेवर मागील चार वर्षांपासून प्रशासकीय राजवट आहे. या राजवटीच्या कालावधीत सर्व अधिकारी शासनासह प्रशासनाकडे होते. राज्यात व केंद्रात भाजपची सत्ता असतानादेखील शहरातील प्रश्नांची सोडवणूक भाजपला करता आली नाही. प्रशासकीय राजवटीच्या कालावधीत घरपट्टी माफ केली नाही. शहराच्या विस्ताराचाही विचार केला नाही. मात्र, निवडणूक जवळ आल्यावर आश्वासनाचे गाजर दाखविण्याचा प्रयत्न भाजपने केला असल्याची चर्चा आहे. त्यामुळे पत्रकार परिषदेमध्ये स्वतःच्याच आब्रुचे धिंडवडे भाजपने काढल्याची चर्चा जोर धरत आहे.

# दरोडाप्रकरणातील आरोपींना शिक्षा

- **पोयनाड येथील सुरभी ज्वेलर्स दरोडा प्रकरण**
- **दोघांना ७ तर चौघांना ४ वर्षांची शिक्षा**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील पोयनाड येथील सुरभी ज्वेलर्स दरोडा प्रकरणातील दहा आरोपींना न्यायालयाने शिक्षा सुनावली आहे. त्यातील दोघांना ७ वर्षे व इतरांना ४ वर्षे अशी शिक्षा अलिबागमधील न्यायालयात शनिवारी (दि.२९) सायंकाळी सुनावण्यात आली. सरकार पक्षातर्फे ॲड. संतोष पवार यांनी हे काम पाहिले. या निकालाकडे अलिबाग तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागून राहिले होते.

पोयनाड येथील सुरभी ज्वेलर्सवर पोयनाड परिसरातील काही स्थानिकांनी मुंबई परिसरातील सराईत दरोडोखोरांच्या मदतीने ऑगस्ट २०१५ मध्ये सशस्त्र दरोडा टाकला होता. त्यावेळी रेकी ठेवली होती. बुरखा घालून धारदार शस्त्र घेऊन त्यांनी दरोडा टाकून लाखोचा ऐवज लंपास केला होता. याप्रकरणी पोयनाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेचे गांभीर्य ओळखून तपासाची सुत्रे वेगात हालविण्यातो आली होती. या गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यास पोलिसांना यश आले. पोलिसांनी केलेल्या तपासानंतर या टोळीचा पर्दाफाश झाला. आरोपींविरोधात मोक्का (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा) अंतर्गत कारवाई करण्यात आली होती. आरोपींविरोधात दोषारोपत्र दाखल करण्यात आले होते. अलिबागमधील न्यायालयात आरोपींवरील अंतिम सुनावणी झाली. त्यामध्ये दहा आरोपींना शिक्षा सुनावण्यात आली. सरकारपक्षातर्फे ॲड. संतोष पवार यांनी काम पाहिले. यादरम्यान, ५५ साक्षीदार तपासण्यात आले. न्यायालयासमोर केलेले युक्तीवाद, फिर्यादी, साक्षीदारांची साक्ष, पुरावे ग्राह्य धरून न्यायालयाने दहा आरोपींना शिक्षा सुनावण्यात आली. दोन आरोपींना ७ वर्षे आणि अन्य आरोपींना ४ वर्षे शिक्षा सुनावल्याची माहिती ॲड. संतोष पवार यांनी दिली.

# माणगावात मोफत नेत्र तपासणी शिबीर संपन्न



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

लायन्स क्लब ऑफ माणगाव, लायन्स हेल्थ फाऊंडेशन आणि ग्रामपंचायत निलज यांच्या संयुक्त विद्यमाने निलज ग्रामपंचायत कार्यालय येथे शुक्रवारी (दि.२८) मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात अनेक रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. तसेच, मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पात्र रुग्णांची नोंदणी करून त्यांना पुढील उपचारासाठी मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी आरोग्य सेविका सी.एन.मोरे यांच्यासह प्राथमिक शाळा शिक्षक, अंगणवाडी ताई तसेच ग्रामपंचायत निलज विभागातील ग्रामस्थ, रुग्ण मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिबिरासाठी लायन्स क्लब ऑफ माणगावचे अध्यक्ष दसंदीप नागे, क्लब मेम्बरशिप चेअर पर्सन सुरेश मोहिते, डायरेक्टर संतोष नागे, कृषी अधिकारी विशाल जाधव, लायन्स हेल्थ फाऊंडेशनचे निलेश म्हात्रे, तेरणा हॉस्पिटलचे राम महाडिक, इंदापूर येथील आरोग्य सेवक सुधीर खैरे यांनी या शिबिरामध्ये अनमोल योगदान दिले.

# वाजेकर विद्यालयात पालक सभा

उरण : तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात गुरुवारी (दि.२७) इयत्ता अकरावी कला शाखेचे विद्यार्थी, शिक्षक, पालक सभा उत्साहात पार पडली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्युनियर कॉलेज विभागप्रमुख प्रा. बाबूलाल पाटोळे यांनी केले. दि रयत सेवक को-ऑप बँक लि. साताराचे संचालक प्रा. किशोर पाटील यांनी अभ्यासाचे नियोजन व पालकांचे कर्तव्य या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या दैनंदिन अभ्यासाचे शास्त्रशुद्ध नियोजन, पालकांची जबाबदारी आणि घरातील शैक्षणिक वातावरण यावर भर दिला. तत्पूर्वी प्रा. हरिश्चंद्र हरड यांनी आपल्या विषयासंदर्भात विद्यार्थ्यांसोबत तसेच पालकांसोबत संवाद साधून अभ्यास पद्धतीबाबत मार्गदर्शन केले. विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका संगीता थोरात यांनी विद्यार्थ्यांची शिस्त, वर्तन आणि अभ्यासाबाबत सविस्तर माहिती देत पालकांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

# जलशुद्धीकरण केंद्राचे लोकार्पण



> **पाली नगरपंचायतीद्वारे येणाऱ्या पाणी पुरवठा योजनेवर घरगुती जलशुद्धीकरण प्रक्रिया योजना करून या सोसायटीने पालीकरांसाठी एक नवीन आदर्श निर्माण केला आहे.**
> **– सुलतान बेनसेकर,**
> उपनगराध्यक्ष नगरपंचायत पाली

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

वक्रतुंड सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित पाली देऊळवाडा वास्तूचा वास्तुशांती समारंभ शुक्रवारी (दि.२८) संपन्न झाला. या वास्तुशांतीनिमित्त वक्रतुंड सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदाच्या कल्पनेतून निर्माण झालेले घरगुती जलशुद्धीकरण प्रक्रिया योजना सुरू करण्यात आली. या जलशुद्धीकरण जोडणीसाठी ३ प्लास्टिक ड्रम, गोठे, रेजगा, वाळू, कोळसा, जाळी या साहित्याचा वापर करून ही योजना तयार करण्यात आली. या योजनेमुळे पाली नगरपंचायतीच्यावतीने येणारे अंबा नदीचे पाणी शुद्ध करून सोसायटीमधील नागरिकांच्यावतीने नियमितपणे वापरण्यात येणार आहे. यावेळी या कार्यक्रमानिमित्त नम्रता ब्रीद यांच्यावतीने हळदीकुंकू कार्यक्रम तसेच सोसायटीच्यावतीने उपस्थित नागरिकांना स्नेहभोजन आणि रात्री भजनाचे आयोजन केले होते.

# महापरिनिर्वाण दिनाच्या पाश्वभूमीवर पहाणी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक आणि शिवाजी पार्क परिसरात येणाऱ्या अनुयायांसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून विविध सोयी-सुविधा पुरविल्या जातात. या पार्श्वभूमीवर, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. अश्विनी जोशी यांनी शनिवारी (दि.२९) शिवाजी पार्क येथे प्रत्यक्ष भेट देऊन पूर्वतयारीचा आढावा घेतला. तसेच, अनुयायांसाठी विविध सोयी-सुविधा वेळेत आणि योग्य प्रकारे उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश दिले. यावेळी उपायुक्त प्रशांत सपकाळे, सहायक आयुक्त विनायक विसपुते यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# सर्व पक्षांचे म्हणणे ऐकून पुनर्विचार करावा

## झीनत शबरीन यांचे सर्वोच्च न्यायालयाला पत्र

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भटकी कुत्री व रस्त्यावरच्या प्राण्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी सर्वसमावेशक दृष्टिकोन अपेक्षित आहे. परंतु, सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय हा मानव व प्राणी यांच्या सहजीवनामध्ये अनावश्यक दरी निर्माण करू शकतो. न्यायालयाने आपल्या आदेशाची अंमलबजावणी स्थगित करून संविधान पीठासमोर नव्याने व सर्व पक्षांचे म्हणणे ऐकून घेऊन पुनर्विचार करावा, असे मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्षा झीनत शबरीन यांनी म्हटले आहे.




सर्वोच्च न्यायालयाने दि. ७ नोव्हेंबर रोजी भटक्या कुत्र्यांबाबत दिलेल्या निकालाचा पुनर्विचार करावा म्हणून देशभरातील प्राणीप्रेमींनी हजारोंच्या संख्येने सर्वोच्च न्यायालयाला पत्रे पाठवली आहेत. मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्षा झीनत शबरीन व युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी याच विषयावर पत्रे पाठवली आहेत. शनिवारी दुपारी झीनत शबरीन आपल्या सहकाऱ्यांसह छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस जवळील पोस्ट ऑफिसमध्ये पोहोचल्या, त्यांनी व त्यांच्या सहका-यांनी सर्वोच्च न्यायालयाला पत्रे पाठवली. या पत्रात, सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय वैज्ञानिक, वैद्यकीय आणि व्यावहारिक दृष्टीनेही अंमलात आणणे कठिण आहे. या निर्णयाची अंमलबाजवणी करण्याची जबाबदारी असणाऱ्या संस्थांकडे त्यासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद नाही, पायाभूत सुविधा उपलब्ध नाहीत. भटक्या प्राण्यांना आपली वेदना, भीती किंवा हक्क व्यक्त करता येत नाही. त्यामुळे त्यांच्याशी संवेदनशील आणि न्याय्य वर्तन करणे हीच खऱ्या अर्थाने मानवी जबाबदारी आहे. करुणा, मानवता आणि जबाबदारी ही आपल्या समाजाची मूलभूत मूल्ये आहेत, आणि त्यांचे रक्षण आपण सर्वांनी एकत्रितपणे करायला हवे, असे म्हटले आहे.

# महाड तालुक्यात भरदिवसा घरफोडी

- **सुमारे तीन लाखांचा ऐवज चोरीला**

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड तालुक्यातील तांबडभुवन परिसरात भरदिवसा घरफोडीची एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. वहूर येथील शिक्षिका शालिनी कदम (५८) यांच्या राहत्या घरातून सुमारे ३ लाख १५ हजार किमतीचे सोन्याचे मौल्यवान दागिने चोरीला गेले आहेत. या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये मोठी खळबळ उडाली असून सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (दि.२८) दुपारी सुमारे ४ वाजताच्या सुमारास ही चोरी घडली. शालिनी कदम यांच्या घरात त्या वेळी कोणीही नव्हते. ही संधी साधून चोरट्यांनी आपला डाव साधला असल्याचे बोलले जात आहे. यावेळी चोरट्यांनी सर्वप्रथम घराच्या मुख्य दरवाजा तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर थेट बेडरूम गाठून, तेथील लाकडी कपाटाचे लॉकर उचकटून त्यातील दागिन्यांचा संच लंपास केला. त्यात २ लाख रुपये किमतीच्या ४ सोन्याच्या बांगड्या, १ लाख रुपये किमतीच्या २ तोळे सोन्याच्या पाटल्या, १५ हजार रुपयांची ५ ग्रॅम सोन्याची चैन असा एकूण ३ लाख १५ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरीला गेला आहे. या घटनेची माहिती मिळताच महाड शहर पोलीस ठाण्यात धाव घेण्यात आली.

दिवसाढवळ्या घडलेल्या या घरफोडीच्या घटनेमुळे तांबडभुवन परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे आणि चिंतेचे वातावरण पसरले आहे. पोलिसांनी परिसरात नियमितपणे वाढीव गस्त घालावी आणि चोरट्यांना लवकरात लवकर पकडावे, अशी मागणी स्थानिक रहिवाशांकडून जोर धरू लागली आहे. दरम्यान, आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलीस पथके सक्रिय झाली असून पुढील तपास सुरू आहे.

# शिघ्रे येथे जनजागृतीसाठी पथनाट्य सादर

**। मुरुड-जंजिरा । प्रतिनिधी ।**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरुड-जंजिरा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत आयोजित सात दिवसीय विशेष निवासी शिबिराअंतर्गत शनिवार (दि.२९) अंमली पदार्थ व तंबाखूमुक्त भारत जनजागृतीसाठी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावी पथनाट्य सादर करण्यात आले.

पथनाट्य शिघ्रे पोलीस चौकी, शिघ्रे मार्केट आणि जिल्हा परिषद शाळा येथे सादर करण्यात आले. या पथनाट्याद्वारे अंमली पदार्थांचे दुष्परिणाम, तंबाखूमुळे होणारे आरोग्यधोके आणि व्यसनमुक्त समाजनिर्मितीसाठी युवकांचे योगदान याबाबत स्वयंसेवकांनी जागृतीपर संदेश दिला.



'अंमली पदार्थाला नकार-सुंदर जीवनाचा स्वीकार' या प्रभावी संदेशावर आधारित या पथनाट्यास नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

पथनाट्यासाठी कार्यक्रम अधिकारी डॉ. फिरोज शेख, प्रा. स्वालिहा कादिरी, तौसीफ फत्ते, प्रा. अल्ताफ फकीर यांनी विशेष परिश्रम घेतले. या पथनाट्यात फातिमा जमादार, सानिया खातिब, प्रेमसागर सोनवणे, मसीरा कादिरी, इकरा कर्वारी, सलवा फत्ते आदीनी उत्कृष्ट भूमिका साकारल्या.

# तळा येथील शाळांना स्मार्ट बोर्ड भेट



**। तळा । प्रतिनिधी ।**

दुर्गवीर प्रतिष्ठान आणि ब्लॅक ॲण्ड वीच कंपनीच्या वतीने गो.म. वेदक विद्यामंदिर, ज्युनियर कॉलेज तसेच रायगड जिल्हा परिषद शाळा तळा यांना अत्याधुनिक स्मार्ट बोर्ड भेट देण्यात आले. डिजिटल शिक्षणाच्या दिशेने टाकलेले हे महत्त्वपूर्ण पाऊल विद्यार्थ्यांसाठी मोठी शैक्षणिक उभारी ठरणार आहे. या कार्यक्रमास तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत रोडे, सचिव मंगेश देशमुख, वैभव चव्हाण, अभिजित तापिसे, संतोष हसुरकर, रवींद्र रावराणे, सागर टक्के, रामजी कदम, मंदार गावकर, विठ्ठल केंबळे, कृष्णराम धनवी, भास्कर गोळे, दिलीप ढाकणे, जामकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सीएसआर कॉर्डिनेटर वैभव चव्हाण यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांनी स्मार्ट बोर्डचा शैक्षणिक प्रगतीसाठी अधिकाधिक उपयोग करावा, असे आवाहन केले. दुर्गवीर प्रतिष्ठानचे संतोष हसुरकर, सागर टक्के, तसेच रामजी कदम यांनी किल्ले संरक्षण, संवर्धन आणि ग्रामीण-डोंगराळ भागातील शाळांना सतत सहकार्य करत असल्याचे सांगितले. याप्रसंगी शाळेचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून

## बाईक रॅलीतून आघाडीचा प्रचार

महाविकास आघाडीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांसह नगरसेवकपदाचे उमेदवार आणि शेकाप व काँग्रेसचे पदाधिकारी हजारो कार्यकर्ते एकत्र येऊन निवडणूकीच्या प्रचारार्थ सायंकाळी त्यांनी बाईक रॅली काढली. प्रत्येकाच्या गाडीला शेकापचा लाल बावटा, काँग्रेसचा झेंडा लावून शेतकरी भवन येथून रॅलीला सुरूवात झाली. दुचाकी चालकाच्या मागे असलेल्या कार्यकर्त्याने हातात झेंडा घेऊन 'शेकापचा विजय असो, महाविकास आघाडीचा विजय' असो अशा घोषणा दिल्या. शेतकरी भवन येथून सुरू झालेली रॅली ठिकरूळ नाका, शिवलकर नाका, खोजणी नाका, मांडवी मोहल्ला, जलसापाडा, शास्त्रीनगर, सिद्धार्थ नगर, पापाभाई पठाण चौक, बाजारपेठ, मारूती नाका, बालाजी नाका, छत्रपती शिवाजी महाराज चौक, भगवान महावीर चौक, ब्राह्मण आळी, श्रीराम मंदिर, तळकरनगर, रामनाथ, महेश टॉकीज, चेंढरे येथील मारुती नाका, रायवाडी, श्रीबागमधील अंबा माता मंदिर, गणपती मंदिर त्यानंतर रॅलीचा शेवट पुन्हा शेतकरी भवन येथे झाला.

महाविकास आघाडीतील शेकाप व काँग्रेसचे प्रभाग दोनमधील उमेदवार प्रशांत नाईक यांची बिनविरोध निवड झाली आहे. आता निवडणूकीच्या रिंगणात महाविकास आघाडीतील शेकाप व काँग्रेसचे थेट नगराध्यक्षपदाच्या उमेदवार अक्षया नमिता प्रशांत नाईक, नगरसेवकपदासाठी प्रभाग एकमधून संतोष मधूकर गुरव, संध्या शैलेश पालवणकर, प्रभाग दोनमधून सुषमा नित्यानंद पाटील, प्रभाग तीनमधून साक्षी गौतम पाटील, आनंद अशोक पाटील, प्रभाग चारमधून रेश्मा मनोहर थळे, महेश वसंत शिंदे, प्रभाग पाचमधून निवेदिता राजेंद्र वाघमारे, समिर मधूकर ठाकूर, प्रभाग सहामधून ऋषीकेश रमेश माळी, अश्वीनी ठोसर, प्रभाग सातमधून ॲड, मानसी संतोष म्हात्रे, अभय म्हामुणकर, प्रभाग आठमधून ॲड. निलम किशोर हजारे, अनिल चोपडा, प्रभाग नऊमधून योजना प्रदिप पाटील, सागर शिवनाथ भगत, प्रभाग दहामधून शैला शेषनाथ भगत, वृषाली महेश भगत या उमेदवारांसह शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड.गौतम पाटील, शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत आदी पदाधिकारी यांच्यासह हजारोच्या संख्येने कार्यकर्ते, तरुण मंडळी, महिला, तरुणी सहभागी झाले होते. अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या या रॅलीला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. रॅलीच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहचून मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. रॅलीतील उत्स्फुर्त प्रतिसादामुळे ही निवडणूक महाविकास आघाडीच जिंकणार, असा विश्वास अनेकांनी व्यक्त केला.

यावेळी जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, शेकाप राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, शेकाप राज्य कामगार आघाडी प्रमुख प्रदिप नाईक, शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, युवराज पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल पाटील, शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष सुनील थळे, रवि ठाकूर, पिंट्या तथा अमिर ठाकूर, अशोक प्रधान, सतिश प्रधान, नागेश कुलकर्णी, संदीप शिवलकर, ॲड. अशिष रानडे, अश्वीन लालन, अजय झुंजारराव, प्रकाश राठोड, इंद्रनील नाईक आदी असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## प्रचारासाठी दिवस वाढला

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५मधील कलम २३ नुसार मतदानाच्या दिवशी कोणतीही जाहिर सभा आयोजित करणे, भरविणे किंवा त्यात सहभागी होणे प्रतिबंधित आहे. मतदानादिवशी शांतता राखण्यासाठी ही तरतूद लागू आहे. ९ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध केलेल्या प्रसार माध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५ मध्ये मतदानाच्या एक दिवस आधी रात्री १२ पासून प्रचारबंदी लागू करण्याचे आदेश होते. तसेच, ४ नोव्हेंबर रोजीच्या आचारसंहितेबाबत एकत्रित आदेशामध्ये मतदानाच्या २४ तास आधीपासून प्रचारबंदीचा उल्लेख होता. विविध आदेशांतील या वेळेतील फरकामुळे निवडणूक अधिकाऱ्यांमध्ये आणि उमेदवारांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. या सर्व बाबींचा विचार करून राज्य निवडणूक आयोगाने नियमात सुधारणा करीत १ डिसेंबर रोजी रात्री १० वाजेपर्यंतच प्रचार करता येणार असल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली. प्रचारासाठी एक दिवस वाढल्याने कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला असून या कालावधीत मतदारांपर्यंत पोहचण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

## जयंत पाटील यांचा कार्यकर्त्यांशी संवाद

निवडणूक कामगिरीचा आढावा जयंत पाटील यांनी घेतला. तसेच, प्रत्येक उमेदवाराने नागरिकांशी थेट संपर्क वाढवावा, स्थानिक समस्यांची अचूक नोंद ठेवून नियोजनबद्ध उपाययोजना जाहीर कराव्यात, असे निर्देश देण्यात आले. खोपोलीच्या वाढत्या लोकसंख्येनुसार पायाभूत सुविधा, आरोग्यसेवा, पाणीपुरवठा, वाहतूक, अपघातमुक्त रस्ते, स्वच्छता आणि शिक्षण क्षेत्रातील सुधारणांची गरज, यावर कार्यकर्त्यांशी संवाद साधताना भर दिला. यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस किशोर पाटील, खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम, ज्येष्ठ नेते बंधू पाटील, तसेच विविध प्रभागांतील समर्थक, युवक आणि ज्येष्ठ कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वृद्ध महिलेचा संशयास्पद मृत्यू

मृत्यू हा संशयास्पद झाला असावा, असा अंदाज वर्तविला जात आहे. हा मृतदेह महाड ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनाकरिता पाठविण्यात आला. त्यावेळी या महिलेच्या नातेवाईकांनी एकच गर्दी केली होती. जोपर्यंत चोरी करून खून करणाऱ्या आरोपीला पोलीस पकडून कठोर शिक्षा देत नाहीत तोपर्यंत आम्ही मृतदेह ताब्यात घेणार नाही, असे नातेवाईकांनी सांगितले आहे. पोलीस प्रशासन व फॉरेन्सिक टीम या संपूर्ण घटनेचा अधिक तपास करीत आहेत.

## थोरवेंनी 'डीएनए'चा लाँगफॉर्म सांगावा

या प्रारूप विकास आराखड्यात काय दडलयं हे तुमच्या समोर सांगण्यासाठी परिवर्तन विकास आघाडी स्थापन केली आहे. या आघाडीच्या माध्यमातून खोपोली शहराचा विकास घडवू, यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवारांची साथ निश्चित असेल, असा विश्वास तटकरेंनी व्यक्त केला आहे. तसेच, खोपोलीची सत्ता परिवर्तन विकास आघाडीच्या हाती द्या, असे अवाहनही त्यांनी खोपोलीकरांना केले आहे. यावेळी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनिल तटकरे, ज्येष्ठ नेते बंधु पाटील, दत्ताजीराव मसुरकर, भरत भगत, अशोक भोपतराव, शेकापचे विधानसभा अध्यक्ष संतोष जंगम, महिला जिल्हाध्यक्षा शिवानी जंगम, तालुका चिटणीस किशोर पाटील, पंकज पाटील, एकनाथ धुळे, नगराध्यक्षपदाचे उमेदवार डॉ. सुनिल पाटील यांच्यास परिवर्तन विकास आघाडीचे पदाधिकारी आणि नगरसेवकपदाचे उमेदवार उपस्थित होते.

## थोरातांकडून सत्ताधिकाऱ्यांची खिल्ली

आश्वासने द्यावी लागतात हे खरे असले तरी फसवी आश्वासन देणे योग्य नाही. पुणे-नाशिक रेल्वेमार्ग संगमनेर मार्गेच जाणार होता, तसेच सर्वेक्षण होऊन जमिनीही ताब्यात घेतल्या गेल्या होत्या. मात्र, त्यात यांनी खोडा घातला. पुन्हा मूळ मार्गावरून रेल्वेमार्ग जावा यासाठी सत्यजित आणि मी भांडतो आहे. मात्र, ज्याने भांडायला हवे, तो मूग गिळून बसल्याचा टोला त्यांनी आमदार अमोल खताळ यांना लगावला. तसेच, गेल्या ३० वर्षाच्या कालखंडात नगरपालिका कायम विकासाच्या मार्गावर ठेवली. विरोधी नगरसेवकांनाही सोबत घेत एकमताने सर्व ठराव मंजूर झाले, हा इतिहास आहे.

चांगले काम असल्यामुळे तर सत्ता नसतानाही २७ कोटी रुपयांची बक्षिसे नगरपालिकेला मिळाली आहेत. समृद्ध व्यापार, शांतता, सुव्यवस्था बंधुभाव यांनी नटलेले हे शहर आहे. सध्या शांतता बिघडत चालली असून कोणाचा हात तोडला जातोय, पोलीस ठाण्यात मारामाऱ्या होतात, नशेचा व्यापार करणारी 'यांच्या' व्यासपीठावरून भाषणे ठोकतात, हे नेमके कोणत्या दिशेला चालले आहे याचा विचार करायला हवा. शहराला बाधक असलेल्या या प्रवृत्तींपासून लोकांनी सावध राहिले पाहिजे. अन्यथा पुन्हा जुने दिवस येतील, अशा इशारा देतानाच समृद्ध शहरासाठी संगमनेर सेवा समितीच्या उमेदवारांना मतरूपी शाबासकी द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

## निवडक



### मूर्तीचोरावर गुन्हा; अद्याप अटक नाही

**रेवदंडा** : रेवदंडा मोठा कोळीवाडा येथील खंडेराय मंदिरातील चांदीच्या मूर्तीची चोरी झाल्याची घटना घडली असून, रेवदंडा पोलिसांनी आरोपीवर गुन्हा दाखल केला आहे. मात्र, त्यास अटक करण्यात आलेली नाही. खंडेराय मंदिरात दि. २१ नोव्हेंबर रोजी रात्री १० ते दि. २२ नोव्हेंबर रोजी सकाळी ५.३० च्यादरम्यान थेरोंडा येथील सराईत गुन्हेगार महेश नंदकुमार चायनाखवा याने प्रवेश करून देव्हाऱ्यातील १०० ग्रॅम वजनाची रुपये ६ हजार किमतीची खंडोबा देवाची चांदीची मूर्ती, १०० ग्रॅम वजनाची ६ हजार रूपये किमतीची भैरवनाथ देवाची चांदीची मूर्ती, १०० ग्रॅम वजनाची रूपये ६ हजार किमतीची कुलस्वामीनी देवीची चांदीची मूर्ती, १०० ग्रॅम वजनाची रूपये ६ हजार किमतीची महिशासुरमर्दिनी देवीची चांदीची मूर्ती, १०० ग्रॅम वजनाची रूपये ६ हजार किमतीची वाघजाई देवीची चांदीची मूर्ती, ५०० रूपये किमतीची गणपतीची चांदीचा मुलामा दिलेली धातूची मुर्ती, असे एकूण ३० हजार ५०० रूपयांचा ऐवज चोरीस गेल्याची तक्रार रेवदंडा पोलीस ठाणे येथे मोठा कोळीवाडा ग्रामस्थ हेमंत गुंडा यांनी दिली आहे. याबाबत अधिक तपास पोलीस करीत आहेत.



### शेतकऱ्यांनी वाचला समस्यांना पाढा

**पाताळगंगा** : खालापूर तालुक्यातील असलेल्या शेतकरी वर्गास कृषी खात्यांच्या माध्यमातून समस्या सोडविण्यात असफल होत असल्यामुळे, नुकताच तालुका कृषी अधिकारी सुनील निंबाळकर यांना निवेदन देण्यात आले. त्याचबरोबर कृषी सहसंचालक कोकण विभाग ठाणे आमले हे खोपोली रामेती येथे येत असल्याचे समजताच वरद विनायक शेतकरी सामाजिक संस्थाच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी भेट घेऊन विविध समस्यांचा पाढा वाचला. यावेळी तुमच्या समस्या मार्गी लावल्या जातील, असे आश्वासन देण्यात आले. तालुक्यातील औद्योगिकीकरण होत असल्यामुळे शेती अल्प होत चालली आहे. त्याचबरोबर बदलते हवामान यामुळे यामुळे शेतीमध्ये मोठे नुकसान सहन करावा लागत आहे. मात्र, असे असले तरीसुद्धा शेतकरी शेतीला प्राधान्य देत आहे. मात्र, कृषी खात्याच्या येणाऱ्या योजना मागील वर्षापासून लाभ मिळत नसल्यामुळे नाराजी व्यक्त केली जात आहे. शेतीसाठी बियाणे, त्याचबरोबर प्रशिक्षण अभ्यास दौरा, मार्गदर्शन शिबीर, समस्या व तक्रार निवारण आदी समस्या निर्माण होत असल्याचे सांगितले.



### सुधागडात बिबट्याची दहशत

**पाली/बेणसे** : सुधागड तालुक्यात नागशेत व कोशिंबळे परिसरात बिबट्याने पाळीव जनावरांवर हल्ले करून दहशत निर्माण केली आहे. दाट जंगलाला लागून असलेल्या या गावांमध्ये गेल्या काही दिवसांत बिबट्याने तीन जनावरांची हत्या केली असून, शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांत नरभक्षक बिबट्याच्या हल्ल्यांची मालिका सुरू असून शेतकरी, ग्रामस्थ तसेच शाळकरी मुलांचेही जीव या हल्ल्यांत गेले आहेत. दरम्यान, कोकणातही बिबट्याचे संचार वाढत आहे. सुधागड तालुक्यात सुद्धा अशाप्रकारे बिबट्यांची दहशत वाढत असल्याने परिसरात घाबराट पसरली आहे. बिबट्याच्या जनावरांवरील हल्ल्याच्या बाबतीत शेतकऱ्यांनी वनविभागाला कळविले. त्यानंतर लगेचच सुधागड वनपरिक्षेत्र अधिकारी विशाल सोनवणे, वन्यजीव परिक्षेत्र अधिकारी उमेश जंगम, अनुभवी वनपाल उत्तम किसनराव शिंदे, वनरक्षक समाधान कुटे, पाच्छापूर वनरक्षक सायली महाडिक, पशुधन अधिकारी म्हसकर आणि नांदगाव विभागीय पशुवैद्यकीय अधिकारी यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. शेतकऱ्यांचे झालेले नुकसान तातडीने भरून निघावे म्हणून परिक्षेत्र अधिकारी विशाल सोनवणे यांनी संबंधित कागदपत्रांसह भरपाईचा प्रस्ताव अलिबाग वनविभागाकडे पाठविला आहे.

# भाजपाने विकास खुंटीला टांगला

## बोरीतील सभेतून महाविकास आघाडीचा आरोप

| उरण | प्रतिनिधी |

उरण नगरपालिकेतील प्रभाग ३ व ४ या शिवसेनेच्या परंपरागत बालेकिल्ल्याकडे सत्ताधारी भाजपने जाणीवपूर्वक पाठ फिरवून विकासकामे खुंटीवर टांगून ठेवल्याचा आरोप महाविकास आघाडीने बोरी गावातील जाहीर सभेत केला. रस्ते, कचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा यांसारख्या मूलभूत गरजांकडे गेल्या अनेक वर्षांपासून ढिम्म दुर्लक्ष केल्यामुळे जनतेत प्रचंड रोष निर्माण झाला आहे. वारंवार तक्रारी करूनही भाजपपुरस्कृत अधिकाऱ्यांनी कोणतीही दखल घेतली नसल्याने ''विकासाला वाळीत टाकणार कोण?'' असा सवाल नागरिकांनी सभागृहातून उपस्थित केला.

बोरी गावातील महाविकास आघाडीच्या सभेला उसळलेल्या जनसागराने निवडणूक वातावरण ढवळून निघाले. गर्दीचा प्रचंड लोंढा पाहता अतुल ठाकूर आणि प्रमिला पवार यांचा विजय जवळपास निश्‍चित असल्याचे सर्वत्र बोलले जात आहे. प्रभाग ३-४ मधील नागरिकांनी पुन्हा एकदा भाजपला कडवट धडा शिकवण्याचा निर्धार केल्याचे सभेतील वातावरणावरून प्रकर्षाने दिसून आले.

सत्तेत असूनही भाजपच्या नगरसेवकाचा या प्रभागांत वारंवार पराभव होत असल्याने त्यांनी विकासकामांना जाणीवपूर्वक ब्रेक लावल्याचा आरोपही सभेत करण्यात आला. निवडणुकीच्या तोंडावर अचानक ''विकास करू'' असे सांगणारे उमेदवार जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत, अशी टीका करण्यात आली. कधीच न दिसणारे, सामाजिक कामात शून्य सहभाग असलेले उमेदवार लादण्याचा भाजपचा प्रयत्न सुज्ञ मतदारांना रुचत नाही, असा सूर वक्त्यांनी व्यक्त केला.

सभेत अतुल ठाकूर यांच्या आजवर केलेल्या विकासकामांची पुस्तिका सादर करण्यात आली. त्यात रस्ते, पाणीपुरवठा, नाली, स्वच्छता, नागरिकांच्या दैनंदिन समस्या सोडवणे, तातडीची कामे त्वरित मार्गी लावणे अशा त्यांच्या उल्लेखनीय कामांचा आढावा देण्यात आला. ही पुस्तिका पाहताच विरोधकांची बोलती बंद झाल्याचे दृश्य सभागृहात पाहायला मिळाले. कोरोना काळात जीवाची पर्वा न करता लोकसेवा करणारे संतोष पवार यांच्या सामाजिक वारशातून उमेदवारी मिळालेल्या प्रमिला पवार यांनीही विकासासाठी स्वत:ला पूर्णपणे झोकून देण्याचा निर्धार व्यक्त केला.

नगराध्यक्षपदासाठी महाविकास आघाडीने भावना घाणेकर यांची निवड केली आहे. सिडको, जेएनपीटी, नगरपालिका आणि प्रकल्पग्रस्तांच्या लढ्यात नेहमी अग्रस्थानीराहणाऱ्यायारणरागिणींची निवड जनतेत उत्साहाचे वातावरण निर्माण करणारी ठरली. तर भाजपने स्वतःच्या निष्ठावान पदाधिकाऱ्यांना डावलून, कधीच राजकारणात नसलेल्या व्यक्तीच्या पत्नीला उमेदवारी दिल्याने भाजपमध्ये तीव्र नाराजी पसरली असल्याची टीका सभेत झाली.

सभेदरम्यान माजी आमदार मनोहर भोईर, नरेश रहालकर, गोपाळ पाटील, भूषण पाटील, गणेश शिंदे आदींनी प्रभाग ३ व ४ च्या जाणीवपूर्वक झालेल्या विकासदुर्लक्षावरून भाजपवर जोरदार हल्ला चढवला. अतुल ठाकूर यांनी आपल्या विकासकामांचा सविस्तर आढावा घेत नागरिकांचा विश्वास संपादन केला, तर प्रमिला पवार यांनी समाजकार्यासाठी स्वतःला संपूर्णपणे वाहून घेण्याची तयारी दर्शवली.

सभेत अतुल ठाकूर यांनी आणखी एका महत्त्वाच्या प्रश्नाचा पर्दाफाश केला. नगरपालिकेने ज्या ठिकाणी फायर स्टेशनसाठी आरक्षित जागा ठेवली आहे, त्या जागेवरच आज कचरा साठवला जात आहे. या कचऱ्यावर गुरेढोरे तुडवून तो अस्ताव्यस्त करतात आणि त्याची दुर्गंधी परिसरातील नागरिक व प्रवाशांना सहन करावी लागत आहे. नगरपालिकेच्या या ढिसाळ आणि बेपर्वा कारभारामुळे नागरिकांचे हाल होत असल्याची माहिती त्यांनी सभेत दिली. उरणच्या सर्वांगीण आणि शाश्‍वत विकासासाठी महाविकास आघाडी कटिबद्ध असल्याचे जाहीर करत, नगराध्यक्ष पदासाठी भावना घाणेकर आणि सर्व प्रभागातील आघाडीच्या उमेदवारांना मशाल, तुतारी व हाताचा पंजा या निशाणीवर मतदान करून विजयी करण्याचे आवाहन सभेतून करण्यात आले.



### ‘उरणच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध’

उरणच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी महाविकास आघाडी कटिबद्ध असल्याचे आश्वासन आघाडीच्या नेत्यांनी सभेतून जाहीर केले. तालुक्याचा विकास आघाडीच्या माध्यमातून होऊ शकतो, याचा मतदारांना विश्वास आहे. त्यामुळे महाविकास आघाडीच्या उमतेदवारांना मतदारांकडून वाढता पाठिंबा मिळत असल्याचे चित्र सध्या उरण तालुक्यात दिसून येत आहे. नगराध्यक्षपदासाठी भावना घाणेकर आणि सर्व प्रभागातील आघाडीच्या उमेदवारांना मशाल, तुतारी व हाताचा पंजा या निशाणीवर मतदान करून विजयी करण्याचे आवाहन यावेळी उपस्थित नेत्यांनी जाहीर सभेतून केले.

## महिला मतदार ठरवणार शहराचा नगराध्यक्ष

**नेरळ** : माथेरान नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक होत असून, पालिका निवडणुकीसाठी एकूण ४०५५ मतदार यांच्यापैकी महिला मतदार या पुरुष मतदार यांच्यापेक्षा तब्बल २५७ एवढ्या जास्त आहेत. पालिका निवडणुकीसाठी बनवण्यात आलेल्या दहापैकी आठ प्रभागांत महिला मतदार यांची संख्या अधिक असल्याने महिला मतदार माथेरान शहराचा नगराध्यक्ष ठरवणार आहेत. माथेरान गिरीस्थान नगरपरिषद निवडणुकीसाठी एकूण ४०५५ मतदार आहेत, त्यात महिला मतदार यांची संख्या ही २१५६ असून, पुरुष मतदार यांची संख्या १८९९ इतकी आहे. त्यामुळे नगरपरिषद निवडणुकीत महिला मतदार यांची संख्या तब्बल २५७ ने जास्त आहे. हे लक्षात घेता पालिका निवडणुकीत महिला मतदार माथेरानचे नगराध्यक्ष ठरवणार असून दिसून येत आहेत. त्यातही पालिका निवडणुकीसाठी जे दहा प्रभाग राज्य निवडणूक आयोगाने निर्माण केले आहेत. त्या प्रभागातील मतदार संख्येत तब्बल आठ प्रभागात महिला मतदार यांची संख्या पुरुष मतदार यांच्यापेक्षा अधिक आहे. पालिका निवडणुकीत सर्वाधिक मतदार प्रभाग सहामध्ये ५३९ मतदार आहेत, तर सर्वात कमी मतदार हे प्रभाग चारमध्ये असून, त्या प्रभागातील मतदारांची संख्या २६४ एवढी आहे. तर माथेरान पालिकेच्या प्रभाग तीन आणि प्रभाग चारमध्ये पुरुष मतदार यांची संख्या जास्त आहे. त्या व्यतिरिक्त अन्य आठ प्रभागात महिला मतदारांची संख्या पुरुष मतदार यांच्यापेक्षा अधिक आहे.

## सहकार क्षेत्रातील मार्गदर्शक हरपला

### आर.एस. पाटील यांना भाई जयंत पाटील यांची आदरांजली

| खोपोली | प्रतिनिधी |

खालापूर तालुक्यातील तसेच संपूर्ण रायगड जिल्ह्यात सहकार चळवळीतील दिशादर्शक म्हणून ओळखले जाणारे ज्येष्ठ नेते दिवंगत आर.एस. पाटील यांच्या निधनाने सहकार क्षेत्रास मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन व्यक्त करण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस तथा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष भाई जयंत पाटील यांनी गोरठण येथील त्यांच्या निवासस्थानी भेट दिली.



यावेळी बोलताना भाई जयंत पाटील म्हणाले की, ''आर. एस. पाटील हे माझे सहकार क्षेत्रातील खरे मार्गदर्शक होते. त्यांच्या समर्पणशील कार्यामुळे अनेक उपक्रमांना दिशा मिळाली. पक्षासाठी आणि सहकार क्षेत्रासाठी त्यांनी दिलेलं अमूल्य योगदान सदैव स्मरणात राहील.''

दिवंगत पाटील यांच्या पश्चात सुधीर पाटील, मोहन पाटील, सचिन पाटील, अशोक पाटील आणि अनंता पाटील यांनी त्यांची परंपरा आणि कार्य पुढे न्यावी, अशी आशा व्यक्त करत ''कुटुंबियांनी त्यांचा आदर्श पुढे नेणे हीच खरी त्यांना वाहिलेली श्रद्धांजली ठरेल,'' असे प्रतिपादन भाई जयंत पाटील यांनी केले.

या सांत्वनपर भेटीवेळी शेकापचे खालापूर तालुका चिटणीस किशोर पाटील, खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम, खोपोली शिळफाटा व्यापारी असोसिएशनचे राजेश अभाणी, जयंत पाठक तसेच इतर मान्यवरांनीही श्रद्धांजली वाहिली.

## रिक्षाचालकाला अज्ञातांनी लुटले

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल शहरातील मिडल क्लास हौसिंग सोसायटीच्या मैदानाशेजारी एका रिक्षा चालकाला दोघा अज्ञात इसमांनी जबर मारहाण करून लुटल्याने शहर पोलीस ठाण्यात दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिडल क्लास हौसिंग सोसायटीच्या मैदानाबाहेरील झाडाखाली रिक्षा चालक पंकज गजानन म्हात्रे (२२) हे रिक्षा थांबवून मैदानाच्या पूर्वेकडील बाजूला रिक्षातच विश्रांती घेत असताना स्कुटीवरून आलेल्या दोघांनी एका अल्पवयीन मुलास मारझोड केली. रिक्षाच्या मागच्या बाजूला कुणाला तरी मारहाण होत असल्याचे लक्षात येताच पंकज रिक्षातून उतरून त्या दोघांना जाब विचारू लागल्याने हल्लेखोरांनी पंकज म्हात्रे यांनाच जोरदार मारहाण केली.

## खारआंबोळीत सामुदायिक शेती




| मुरुड जंजिरा | प्रतिनिधी |

एकीकडे कोकणात शेतीचा कल कमी होत असताना रायगडमध्ये मुरुड तालुक्यात खारआंबोळी गावात २५० गावकऱ्यांनी देवळासमोरील शेतीत भात लावणी पारंपरिक गीते बोलत जुलैला पेरणी केली होती. त्याची कापणी केल्यानंतर शनिवारी सामुदायिक भातबांधणी करून शेतात रचून ठेवले, अशी माहिती माजी सरपंच मनोज कमाने यांनी दिली.

गावागावातील मतभेद विसरून गावच्या शेतात हाक दिल्याबरोबर पुरुष सकाळी ७ वाजल्यापासून कामाला येतात. बांधणीचे काम लवकर व्हावे म्हणून पारंपरिक पद्धतीने आजही काम करण्यात येत आहे. गावातील मंडळी कुशल कामगार असून, बाहेर दिवसाला एक हजार मजुरी घेतात. परंतु, भातझोडणीच्या कामाला स्वतःहून हजार राहतात. तालुक्यात तीन हजार हेक्टर जमिनीवर भात शेती केली जाते.भात पीक हे मुख्य पीक आहे. खारआंबोळी गावची शेती सर्वात शेवट लावतात. त्यामुळे गावची शेती लावून झाल्यावर उरलेले राब गावकऱ्यांना देण्यात येतात, असा सार्वजनिक हिताचा विचार हा गाव जपतो.

## अंजप येथे अखंड हरिनाम सप्ताह

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील अंजप गावामध्ये श्री गणेश प्रतिष्ठान यांच्यावतीने अखंड हरिनाम सोहळा आयोजित करण्यात आला होता. गेली दहा वर्ष या मंडळाच्यावतीने हा अखंड हरिनाम ज्ञान यज्ञ सोहळा अविरतपणे सुरू आहे.

बालयोगी गणेश नाथ महाराज भीमाशंकर यांच्या कृपाशीर्वादाने गुरुवर्य विजय महाराज पाटील व गुरुवर्य भिकाजी महाराज पडवळ यांच्या मार्गदर्शनाखाली श्री गणेश प्रतिष्ठान अंजप येथे ज्ञानयज्ञ सोहळा गेली दहा वर्षे साजरा होत आहे. या निमित्ताने श्रींचे अभिषेक, काकडा, ज्ञानेश्वरी पारायण, प्रवचन, यानंतर दिंडी सोहळा, हरिपाठ, दीपोत्सव, कीर्तन तसेच दिंडी सोहळा, प्रदक्षिणा हा संपूर्ण गावांमध्ये वारकरी संप्रदायातील महाराजांच्या उपस्थितीत दिंडी सोहळा पार पडला. या दिंडी सोहळ्यासाठी तरुणवर्ग, महिला, पुरुष गावातील सर्वांनी सहभाग दर्शवला होता. दीपोत्सवानिमित्त परिसरातील अनेक मान्यवर उपस्थित होते. रात्रीचे कीर्तन संदीप महाराज यादव यांनी केले. काल्याचे कीर्तन सुरेश महाराज पाटील रायगड भूषण यांचे झाले. श्री गणेश प्रतिष्ठान अंजप कमिटीचे अध्यक्ष हरिश्चंद्र मिणमिणे, उपाध्यक्ष भालचंद्र थोरवे, खजिनदार मोहन डायरे, सहखजिनदार लक्ष्मण माळी, सचिव संजय मिणमिणे, श्री गणेश प्रतिष्ठान मंडल, पंजाब कार्यकारिणी कमिटी आणि अंजप ग्रामस्थ मंडळ यांच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## पनवेल-वावंजे रस्त्याची दुरवस्था

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल-वावंजे रस्त्याचे मे २०२५ मध्ये करण्यात आलेले नूतनीकरण केवळ दोन महिन्यांत पावसाच्या पाण्यात वाहून जाऊन खराब झाल्याने स्थानिक नागरिक आणि वाहनचालक त्रस्त आहेत. टेंभोडे व पाले बुद्रुक परिसरात डांबरी रस्ता अक्षरशः वितळल्याने मोठ्या प्रमाणात खड्डे तयार झाले. या कामाच्या दर्जाबाबत गंभीर शंका उपस्थित होत असून, संबंधित ठेकेदाराने काम नियमबाह्य केले असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.



याच पार्श्वभूमीवर ववळवली येथील नागरिक विश्वास पेटकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, भिंगारी (पनवेल), तसेच संबंधित स्थानिक अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीत त्यांनी रस्त्याची झालेली दुरवस्था, कामाचा अल्पकालीन दर्जा आणि शासनाच्या निधीचा झालेला अपव्यय याबाबत चौकशी करण्याची मागणी केली आहे.

दरम्यान, संबंधित अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार, वावंजे रस्त्यावरील टेंभोडे आणि पाले बुद्रुक परिसरातील भाग काँक्रिटीकरण करण्याची प्रक्रिया सुरू होणार असल्याचे सांगितले आहे. तसेच ठेकेदाराला केवळ १० टक्के रक्कमच अदा करण्यात आली असल्याची माहिती समोर येत आहे. तथापि, या भागात सध्या सुरू असलेले पॅचवर्क काँक्रिटीकरणाच्या वेळी पुन्हा उखडले जाणार असल्याने जनतेच्या पैशाची नासधूस होत असल्याची नागरिकांची तक्रार आहे.

## पनवेल परिसरात मृतदेह

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल शहर परिसरात एका वृद्ध इसमाचा मृतदेह आढळून आला असून, त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल पोलीस करत आहेत. या इसमाचे अंदाजे वय ५५ ते ६० वर्षीय, रंग सावळा, उंची ५ फूट ५ इंच, चेहरा उभट, अंगाने मजबूत, डोक्याचे केस काळे-पांढरे, दाढी मिशीचे केस पांढरे वाढलेले, डाव्या हाताच्या कोपराजवळ जुनाट जखमा असून, अंगात काळसर रंगाची फुल पॅन्ट व निळ्या रंगाचा हाफ बाह्याचा टीशर्ट व पायात निळ्या रंगाचे शूज घातलेले आहेत. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक प्रियांका शिंदे यांच्याशी संपर्क साधावा.

### दत्तनामाच्या गजरात चौलनगरी दुमदुमली | वार्डे गुरुजी नवनाथ आरती मंडळाचा स्तुत्य उपक्रम

# सलग सहाव्या वर्षी दत्तटेकडीला परिक्रमा

| चौल | प्रतिनिधी |

‘दिगंबरा दिगंगरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा... जगत् वंद्य अवधूत दिगंबर..’च्या जयघोषात चौल-भोवाळे येथील पर्वतनिवासी दत्त मंदिरातून दत्तमहाराजांच्या पादुकांवर अभिषेक घालून दत्तगुरुंचे गुरव प्रभाकर आगलावे यांच्या हस्ते आरती करुन पालखी परिक्रमणेला गुरुवारी (दि. २७) दुपारी तीन वाजता सुरुवात झाली. यावेळी शेकडो भाविकांच्या उपस्थितीत पालखीवर होणारी फुलांची उधळण, ठिकठिकाणी सुवासिनींकडून करण्यात आलेले औक्षण, सोबत टाळ-मृदुंगाचा गजर अन् अव्याहतपणे सुरु असलेल्या दत्तनामाच्या गायनाने चौलनगरी दुमदुमून वातावरण भक्तीमय झाले होते.

वार्डे गुरुजी नवनाथ आरती मंडळ चौल यांच्या मार्गदर्शनाखाली दत्तमहाराजांची प्रतिमा आणि पादुका पालखी परिक्रमा आयोजित करण्यात आली होती. यावर्षीचे पालखी परिक्रमेचे हे सहावे वर्ष होते. या पालखी परिक्रमेत शेकडोंच्या संख्येने भाविक सहभागी झाले होते. पर्वतनिवासी दत्तात्रेयांचे स्वयंभू स्थान असलेल्या संपूर्ण भोवाळे डोंगराला यावेळी पायी प्रदक्षिणा घालण्यात आली.



दिगंबरा, दिगंबरा, श्रीपाद वल्लभ दिगंबराचा अखंड जयघोष, पादुका आणि मूर्तीवर होणारी पुष्पवृष्टी, मंदिरात केलेली विविधरंगी फुलांच्या माळांची आकर्षक सजावट आणि याची देही याची डोळा हा नयनरम्य सोहळा पाहण्यासाठी ठिकठिकाणी मुख्य रस्त्यावर भाविकांची उसळलेली गर्दी यामुळे चौलनगरी भक्तीमय वातावरणात भारावून गेल्याचे चित्र दिसून आले. यावेळी सुवासिनींकडून दत्तगुरुंचे औक्षण करण्यात आले. दुपारी तीन वाजता पालखी मंदिरातून मार्गस्थ झाली. स्वामी समर्थ मंदिरमार्गे, पुढे सराई, सोमेश्वर मंदिर, हनुमानपाडा, गायचोळे अशी मार्गक्रमणा करीत भोवाळे येथून दत्तमंदिरात सायंकाळी सातच्या सुमारास पालखीचे प्रस्थान झाले. दरम्यान, पहिल्या टप्प्यात सोमेश्वर मंदिरात पालखी विश्रांतीसाठी काही वेळ ठेवण्यात आली. पालखी परिक्रमेदरम्यान शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र म्हात्रे, चौल ग्रा.पं. माजी उपसरपंच अजित गुरव, नागाव सरपंच हर्षदा मयेकर, माजी सरपंच निखिल मयेकर, रेवदंडा सरपंच प्रफुल्ल मोरे, सचिन राऊळ, शेकापचे निलेश खोत, चौलमळा गावचे अध्यक्ष रवींद्र घरत, सागमळा गावचे अध्यक्ष राजेंद्र ठाकूर, तुलाडदेवी-गणपती मंदिर अध्यक्ष सुधाकर म्हात्रे, पाचकळशी समाज अध्यक्ष रमेश म्हात्रे, सिद्धेश शेणवईकर आदी मान्यवरांनी उपस्थित राहून पालखीचे दर्शन घेतले.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी दत्तमंदिराचे गुरव प्रभाकर आगलावे, आशिष वासुदेव, सचिन राऊत, अरुण टेकाळकर, संदीप नागावकर, निकेश घरत, राकेश नाईक, अनिकेत नाईक आणि वार्डे गुरुजी नवनाथ आरती मंडळ, चौलच्या सभासदांनी मेहनत घेतली. उत्तरोत्तर या सोहळ्यास भाविकांची गर्दी वाढत असल्याचे चित्र दिसून आले. दत्तभक्तांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळेच हा सोहळा यशस्वी पार पडला, असा विश्वास वार्डे गुरुजी नवनाथ आरती मंडळाच्या सभासदांनी व्यक्त केला.



### सुवासिनींकडून औक्षण

दत्त पालखीचे ठिकठिकाणी सुवासिनींकडून औक्षण करण्यात आले. यावेळी पालखी मार्गात अनेक ठिकाणी रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. दत्तभक्तांनी पालखी परिक्रमेदरम्यान पालखीवर फुलांची उधळण केली. त्यामुळे संपूर्ण परिसर दत्तमय झाल्याचे चित्र होते.

### ११ डिसेंबरला मंदिर प्रदक्षिणा

दत्तमंदिराला १०८ प्रदक्षिणा घालण्याचा सोहळा गुरुवार, दि. ११ डिसेंबर रोजी होणार असल्याचे वार्डे गुरुजी नवनाथ आरती मंडळाच्यावतीने सांगण्यात आले असून, जास्तीत जास्त भाविकांनी या सोहळ्यास उपस्थित राहून तो यशस्वी करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या सोहळ्याच्या अधिक माहितीसाठी दत्तभक्त निकेश घरत ७६६६०७९९५३ यांच्याशी संपर्क साधावा.

# निवडक

## मोफत नेत्रचिकित्सा शिबीर

**माणगाव** : तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत वारकचे सरपंच वैष्णव साठे व डॉ. हळदीपूरकर चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने विघवली विभाग हायस्कूल विघवली येथे रविवार, दि.३० नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी ३ यावेळेत मोफत नेत्रचिकित्सा शिबीर आयोजित करण्यात आले आहे. तरी, गरजूंनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. या शिबिरात मोफत नेत्रचिकित्सा, मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया व गरजुंना मोफत चष्मे वाटप करण्यात येणार आहेत. मोतीबिंदू शस्त्रक्रियेकरिता रुग्णाची येण्या-जाण्याची सोय, राहणे व जेवणाची मोफत व्यवस्था आहे. मोतीबिंदू असणाऱ्या रुग्णाने रेशनकार्ड व आधारकार्डची झेरॉक्स प्रत तसेच मोबाईल नंबर शिबिरामध्ये येताना सोबत आणावे, शस्त्रक्रियेकरिता शिबिराच्या दिवशी दुपारी तीननंतर रुग्णाला पाली येथे नेण्यात येऊन लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पाली येथे रुग्णावर मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येईल, असे आयोजकांतर्फे सांगण्यात आले आहे. या शिबिराच्या अधिक माहितीसाठी शिबीर संयोजक दत्तात्रय ठाकूर ८०८७७७६५०९, अमित सापळे ७७१५९३६३४३, प्रमोद शिंदे ९१६८७७७२९९, सचिन उभारे ९२७२७१७९८६, प्रवीण जाधव ९३५९०४०९५२, भरत सुतार ७५१७३६१८४७, नरेश कोळी ९५७९११३००६ यांच्याकडे संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## ज्येष्ठ नागरिक मंडळाचा वर्धापन दिन



**उरण** : मुळेखंड ज्येष्ठ नागरिक मंडळाचा पाचवा वर्धापन दिन नुकताच पार पडला. सकाळी सातपासून रात्री अकरा वाजेपर्यंत विविध उपक्रमाने भरगच्च असे कार्यक्रम या मंडळाच्या वतीने करण्यात आले. सकाळी सत्यनारायणाचे महापूजा, महिलांसाठी हळदी कुंकू कार्यक्रम, भजन, सांस्कृतिक कार्यक्रम, गाव परिसरातील विविध क्षेत्रांमध्ये कार्य करणाऱ्या गुणवंतांचे तसेच दहावी, बारावी व त्यापुढील पदवी उच्चशिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा कार्यक्रम, ब्रास बँड, पैठणी लकी ड्रा, दुपारी व रात्री महाप्रसाद असे विविध कार्यक्रम ठेवण्यात आले होते. या वर्धापन दिनानिमित्त उरण परिसरातील सामाजिक कार्यात सहभागी असणारे सामाजिक कार्यकर्ते समाजसेविका अनिता घरत, ग्रुप ग्रामपंचायत चाणजेचे सरपंच अजय म्हात्रे, माजी सरपंच जितेंद्र घरत, करंजा ज्येष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष प्रकाश थळी, राजन घरत, जितेंद्र विठ्ठल म्हात्रे, श्याम मोरे, गाव अध्यक्ष हितेश म्हात्रे, उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. मुलानी आदी मान्यवर उपस्थित होते.



## संविधान दिनाचा प्रेरणादायी उत्सव

**माणगाव** : माणगाव शहरातील शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुधाकर नारायण शिपुरकर व गणेश यशवंत वाघरे इंग्रजी माध्यमाच्या शाळेत संविधान दिवस उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात साजरा करण्यात आला. आजच्या दिवशी विद्यालयाचा परिसर विद्यार्थ्यांच्या देशभक्तीच्या घोषणा, शिक्षकांच्या प्रेरणादायी मार्गदर्शन आणि संविधानाविषयी जागरूकता निर्माण करणाऱ्या उपक्रमांनी भारावून गेला होता. संविधान वाचन आणि शपथ घेण्याचा सोहळा साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून करण्यात आली. त्यानंतर मुख्याध्यापिका मनिषा मोरे यांनी विद्यार्थ्यांना भारताच्या संविधानाचा उगम, महत्व आणि त्यामागील मानवी मूल्यांची सखोल माहिती देत प्रेरणादायी भाषण केले. संपूर्ण सभागृहात शांतता पसरलेली असताना विद्यार्थ्यांनी एकदिलाने संविधानाची शपथ घेतली. ''भारतीय संविधानाचे पालन करणे आणि राष्ट्रहित जपणे'' या प्रतिज्ञेने सर्वांच्या मनात देशाबद्दलची कर्तव्यभावना दृढ झाली. माणगाव शहरात भव्य प्रभात फेरी काढण्यात आली. शपथविधीनंतर संपूर्ण माणगाव शहरात भव्य अशी प्रभात फेरी काढण्यात आली. प्रभात फेरी पाहण्यासाठी रस्त्यांवर उभे राहिलेले नागरिकही विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध दिमाखदार संचलनाने भारावून गेले. अनेकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना शुभेच्छा दिल्या.

## समीर म्हात्रेंना कोकणरत्न पुरस्कार



**उरण** : सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, पत्रकार आणि उरण तालुक्यातील कळंबुसरे ग्रामपंचायतीचे सदस्य समीर शंकर म्हात्रे यांना स्वतंत्र कोकणराज्य अभियानातर्फे कोकणरत्न पदवी पुरस्कार जाहीर झाला आहे. कोकणरत्न पदवी प्रदान सोहळा शनिवार, दि. १३ डिसेंबर रोजी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत मुंबई मराठी पत्रकार भवन, आझाद मैदाना जवळ, मुंबई येथे स्वतंत्र कोकणराज्य अभियानाचे संस्थापक अध्यक्ष संजय कोकरे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून, वरिष्ठ पत्रकार आणि संपादक सचिन कळझुनकर यांची उपस्थिती लाभणार आहे.

## ठाकूर स्कूलमध्ये संविधान दिन



**चिरनेर** : आवरे येथील जानकीबाई जनार्दन ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल येथे भारतीय संविधान दिन हा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यासाठी भारतीय संविधान हे सर्व विद्यार्थ्यांनी एका सुरा-तालात व लयीत म्हटले. तसेच लोकशाही कशा पद्धतीने असावी, लोकांनी योग्य मार्गाचा कशा पद्धतीने अवलंब करावा यासाठी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी काही पथनाट्यपर संदेश दिला. यावेळी विविध वेशभूषा करून विद्यार्थ्यांनी यात महत्त्वाचा सहभाग दर्शविला. यामध्ये शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद लाभला.

# श्रमसंस्कार शिबीर स्वावलंबी जीवनाचा मार्ग

## प्रा.डॉ. सोनाली पाटील यांचे प्रतिपादन




**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

जे.एस. एम. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सात दिवसीय विशेष निवासी तथा श्रमसंस्कार शिबीराचे आयोजन दि. २६ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत सारळ या ठिकाणी आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे श्रमसंस्कार शिबीर हे विद्यार्थ्यांच्या स्वावलंबी जीवनाचे व व्यक्तिमत्त्व विकासाचे उत्कृष्ट माध्यम आहे, असे प्रतिपादन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सोनाली पाटील यांनी केले. श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील व उपाध्यक्षा डॉ. साक्षी पाटील यांनी शिबिरार्थींना श्रमसंस्कार शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी सारळ गावच्या माजी सरपंच ॲड. अमृता नाईक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सोनाली पाटील, उपप्राचार्य व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण गायकवाड, प्रा. अश्विनी आठवले, डॉ. पंकज घरत, प्रा. जयेश म्हात्रे, प्रा. निलम म्हात्रे, प्रा. अदिती दामले, सारळ माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका भारती पाटील, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक संतोष मढवी, शाळेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे उपप्राचार्य व रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रविण गायकवाड यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात शिबिराचा उद्देश व शिबिरातील विविध उपक्रमांची रूपरेषा सांगितली.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या ॲड. अमृता नाईक यांनी शिबिरार्थींना शुभेच्छा दिल्या. त्या म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी या शिबिराच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा व समाजकार्यास हातभार लवावा.

प्राचार्या डॉ. सोनाली पाटील म्हणाल्या की, आजच्या या संगणकीय व तांत्रिक युगातून व मोबाईलच्या मोहपाशातून सुटका करून मेंदूला वेगळी चालना देण्यासाठी हे श्रमसंस्कार शिबीर एक उत्कृष्ट माध्यम आहे, त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी शैक्षणिक उपक्रमाबरोबर सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा.

सारळ माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका भारती पाटील यांनी सर्व विद्यार्थ्यांना शिबिरातील विविध उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या व शिबिरासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अश्विनी आठवले यांनी केले.

## मनोज मिरजकर यांना बंधुशोक



**माणगाव** : नगरपंचायत हद्दीतील साईनगर येथील रहिवासी मनोज मिरजकर यांचे थोरले बंधू रमेश जगन्नाथ मिरजकर यांचे रविवार, दि. २३ नोव्हेंबर रोजी अल्पशा आजाराने राहत्या घरी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७७ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर माणगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा दशक्रिया विधी मंगळवार, दि.२ डिसेंबर रोजी सोनभैरव मंदिर खांदाड-माणगाव येथे, तर उत्तरकार्य विधी शुक्रवार, दि.५ डिसेंबर रोजी होणार आहेत.

## शहिदी समागम उत्साहात

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

त्याग आणि समर्पणाचे प्रतीक हिंद-दि-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागमनिमित्त विशेष किर्तन आणि गुरु का लंगर कार्यक्रम शनिवार दि.२९ नोव्हेंबर २०२५ सकाळी ९ ते सायंकाळी ४ या वेळेत गांधी मैदान,एच.पी.पेट्रोल पंप शेजारी मुंबई-गोवा महामार्ग, नाणोरे फाटा, माणगाव याठिकाणी उत्साहात साजरा झाला.

या समागम कार्यक्रमास शीख बांधव-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यवर, विद्यार्थ्यांचा रायगड सिख सेवा चॅरिटेबल ट्रस्ट माणगाव यांच्यावतीने सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला

माणगावशहरातीलनागरिकांनी या कार्यक्रमाच्या निमित्ताने एकत्र येऊन स्मरणोत्सवाचे आयोजन केले होते. धार्मिक स्वातंत्र्य, मानवता आणि सत्यासाठी प्राण अर्पण करणाऱ्या महान योद्ध्याच्या बलिदानाची ही प्रेरणादायी आठवण सर्व समाजात आदराने साजरी करण्यात येत असते. सन १६७५ मध्ये मुघल अत्याचारांविरुद्ध आणि काश्मीरी पंडितांच्या संरक्षणासाठी उभे राहताना गुरु तेग बहादुरजींनी दिल्लीच्या चांदणी चौकात आपले मस्तक अर्पण केले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कॅप्टन निर्मलसिंग रंधावा, गुरविंदर सिंह सोडी, वरिंदर सिंग बर्मन, गुरुविंदर सिंह भाटिया व सहकारी यांनी परिश्रम घेतले.



मुरुड शहरात आगामी काळात होणाऱ्या नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली रुट मार्च काढण्यात आला.
(छायाचित्र : राजीव नेवासेकर)

## साने गुरूजी स्मारकात वैज्ञानिक उपक्रम

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**



रायगड जिल्ह्यातील माणगाव येथील वडघर येथे असलेल्या साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकामध्ये साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्टचे जैवविविधता संवर्धन व संशोधन केंद्र आणि आयआयटी बॉम्बे यांच्या संयुक्त विद्यमाने पाणी, ऊर्जा इत्यादी मूलभूत क्षेत्रांमध्ये शाश्वत विकासासाठी तंत्रज्ञान लक्ष केंद्रित मार्गदर्शक प्रकल्पाला समाजाभिमुख करण्यासाठी लिव्हिंग लॅबचे लोकार्पण करण्यात आले.

याप्रसंगी साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक अध्यक्ष प्रमोद निगुडकर, जैवविविधता संवर्धन आणि संशोधन केंद्र अध्यक्ष संजय मंगला गोपाळ, जवाहर नागोरी, विष्णू प्रभुदेसाई, सुरेखा दळवी, आंबेडकर कॉलेजचे प्राचार्य बोराळे, अल्लाउद्दीन शेख, रवी देसाई, दीपक क्षीरसागर, केतन मजदेकर तसेच टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट सोल्यूशन्स सेलचे उन्नत महाराष्ट्र अभियान कक्ष आयआयटी बॉम्बेचे प्रकल्प प्रमुख राजाराम देसाई, शेप फाऊंडेशनचे प्रसाद कुलकर्णी, सातारा रिन्यूएबल्सचे आनंद टेंबे तसेच विश्वस्त सिरत सातपुते आदी मान्यवर उपस्थित होते. शेप फाऊंडेशनचे प्रसाद कुलकर्णी यांनी वीज न लागणारा भाजी व फळे साठवण्यासाठी सब्जी कूलर याबाबत माहिती पुरवून पर्यावरणपूरकता तसेच ऊर्जा व पाण्याची बचत करण्यासंदर्भात समाजजागृतीचे आवाहन केले. पिण्याच्या पाण्याची अल्ट्रा फिल्ट्रेशन पध्दतीबाबत प्रसाद कुलकर्णी यांनी आरओद्वारे पाण्याचा वापर केल्यास प्रचंड प्रमाणात पाण्याची नासाडी होते. यामध्ये झिंक, तांबे, लोखंड तसेच अन्य क्षार नष्ट झाल्याने मृत पाण्याचा बाटलीबंद पाणी म्हणून वापर केला जात असल्याने हल्ली या खनिज व क्षारांचा समावेश पिण्याच्या पाण्यामध्ये जाणीवपूर्वक केला जात आहे. सर्वोच्चन्यायालयानेआरओच्या वापराबाबत आक्षेप घेतले असून, ग्रामीण भारतातील पाणी पिण्यायोग्य असल्याने बंदीसदृश्य कठोर भूमिका घेतल्याचे यावेळी सांगितले.

## बीसीटी लॉ कॉलेजमध्ये ‘संविधान गौरव दिन’

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

तालुका विधी सेवा समिती, पनवेल यांच्या माध्यमातून बीसीटी लॉ कॉलेज, खांदा कॉलनी येथे संविधान गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून सहावे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर तथा अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी, पनवेल आर.एन. चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

याप्रसंगी न्यायाधीश चव्हाण यांनी भविष्यात न्यायालयीन क्षेत्रात काम करताना विद्यार्थ्यांनी कोणता व्यवहार्य आणि कृतिशील दृष्टिकोन ठेवावा, तसेच न्यायालयीन प्रक्रियेत व्यावहारिकतेचे महत्त्व काय आहे, याबाबत सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. जनार्दन भगत शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनीही विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. तसेच तालुका विधी सेवा समितीच्या रिटेनर ॲड. स्वाती सोनवणे, पॅनल ॲड. दिपाली बोहरा आणि पी.एल.व्ही. शैलेश कोंडसकर यांनी संविधान गौरव दिनाच्या विविध पैलूंबद्दल माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी भारतीय संविधान आणि त्याचे विविध पैलू यावर पोस्टर सादरीकरण प्रमुख मान्यवरांसमोर केले. कार्यक्रमास तालुका विधी सेवा समिती, पनवेलचे पॅनल ॲड. इंद्रजीत भोसले, ॲड. नागेश हिरवे, ॲड. विकी दुसिंग, ॲड. प्रज्ञा भगत तसेच वरिष्ठ लिपिक हेमंत आंबेतकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## पनवेल येथे श्रीदत्त जन्मोत्सवे

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल येथील नवनाथ मंदिर येथे सालाबादप्रमाणे यंदाही श्रीदत्त जन्मोत्सव सोहळा होणार संपन्न आहे. यानिमित्ताने गुरुवार दि. ४ डिसेंबर रोजी संध्या. ५.३० वा. ते ६.३० वा. महाआरती, संध्या. ६.३० वा. ते ७.३० वा. महाप्रसादाची वेळ : रात्री ८ वा., भजन संध्या रात्री ८.३० वा, गुरु. होणार आहे. रवि. दि. ३० डिसेंबर रोजी श्री गजानन भजन मंडळ, धाकटा खांदा (रात्री ८ वा.) बुवा दत्तात्रेय नामदेव भगत, मृदुंग समीर भगत, चालक कृष्णा म्हात्रे, अजित भगत, हरीभाऊ म्हात्रे, हनुमान भगत, गजानन भगत, रामचंद्र शेळके, महालक्ष्मी प्रासादिक भजन मंडळ (वारणे) कर्जत (रात्री ९ वा.) बुवाः गणपत बुवा फुलावरे, मृदुंगः भरत फुलावरे, चालकः गोटीराम ठोंबरे, रामचंद्र फुलावरे, सोम. दि. १ डिसेंबर रोजी श्री विठ्ठल प्रासादिक भजन मंडळ, नावडे गायकः विकासयुवा खानावकर, राहुलबुवापाटील, अक्षयबुवाखुटारकर, निलेशबुवा म्हात्रे, पखवाजः प्रवीण पाटील (वाजे), तबलाः अरुण म्हात्रे, संगीत साथ : शंकरबुवा म्हात्रे, महेश पाटील, चालक केसरी नाथा पाटील, मंगळ. दि. २ डिसेंबर, श्री गजानन भजन मंडळ, रोडपाली बुवाः रामचंद्र गायकर, मृदुंगः सिद्धेश गायकर, साथ संगतः अभिमन्यू घरत, निखिल ठाकूर, राहुल चौधरी, दिवेश मोरे, चालकः गजानन पाटील, शुक्राचार्य ठाकूर, असे दररोज कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

## चारशे वर्षांनंतरही शिवरायांचा जगात डंका : घरत

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**



रायगड किल्ल्यावर शिवशंभू प्रतिष्ठानतर्फे शिवरायांच्या विचारांना बळकटी देण्यासाठी जनचळवळीची मोहीम सुरू केली आहे, ती अतिशय महत्त्वाची आहे. शिवरायांच्या विचाराला धक्का लागणार नाही, अशाच प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान रचले. अठरापगड जाती-जमातींतील जनतेला सुखासमाधाने जगता यावे, असाच विचार बाबासाहेबांनीही केला, परंतु आजचे सरकार संविधान पायदळी तुडवीत आहे. एकंदरीत, देशातील सध्याचे वातावरण पाहता लोकशाही वाचविण्याची गरज आहे, असे कामगार नेते आणि काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत म्हणाले.

भारताची सध्याची सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थिती पाहाता येथील सर्वसामान्यांना आपल्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी संविधान जनतेत रुजवणे गरजेचे आहे. या विचारानेच संविधान दिनानिमित्त २५ व २६ नोव्हेंबरला शिवशंभू स्वराज्य मोहीम राबवण्यात आली.

यावेळी चवदार तळ्यावर बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना देण्यात आली. तसेच राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब यांना पाचाड येथे मानवंदना देण्यात आली. बुधवारी (दि.२६) छत्रपती शिवाजी महाराज यांना वारकरी व सर्व धर्मांतील जनतेकडून मानवंदना देण्यात आली आणि समतेचा संदेश आणि शिवरायांची शपथ देण्यात आली. यावेळी काँग्रेसच्या रायगडच्या प्रभारी राणीताई अग्रवाल, सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन, धनाजी गुरव, कीर्तनकार फडतरे महाराज, भारतमहाराज जाधव, कैलास देसाई आदी मान्यवरांसह एम.जी. ग्रुपचे सहकारीही उपस्थित होते.

## किडनी दान करुन दिला पुनर्जन्म | गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी

# आईने वाचवला मुलाचा जीव

**। महाड । प्रतिनिधी ।**




दीर्घकालीन मूत्रपिंडाच्या आजाराने ग्रस्त ३३ वर्षीय पुरूषाला त्याच्या आईला किडनी दान केली असून, मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये यशस्वी किडनी प्रत्यारोपण करण्यात आले. प्रत्यारोपणाच्या काही दिवसांतच, त्याला ॲटिपिकल हेमोलाइटिक युरेमिक सिंड्रोम (एएचयूएस) जो एक दुर्मिळ अनुवांशिक विकार आहे ज्यामध्ये मूत्रपिंडातील लहान रक्तवाहिन्यांमध्ये रक्ताच्या गुठळ्या तयार होतात. मेडिकव्हर हॉस्पिटलमधील नेफ्रोलॉजिस्ट डॉ. अमर कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली टीमने वेळीच निदान आणि प्रगत उपचाराने रुग्णाचा जीव वाचविला.

महाड येथील ३३ वर्षीय रुग्ण सूरज पवार २०२४ मध्ये जेव्हा मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये आला तेव्हा त्याला सतत मळमळणे, चेहऱ्यावर सूज येणे, लघवीला फेस येणे आणि केवळ सहा महिन्यांत १४ किलो वजन कमी होणे अशा समस्या सतावत होत्या. कामावर जाणे, कुटुंबासह जेवणे किंवा मित्रांसोबत वेळ घालवणे यासारख्या साध्या दैनंदिन कामांमुळेदेखील त्याला थकवा येत होता.

रुग्णाला तीन वर्षांपासून उच्च रक्तदाबाची समस्या होती तसेच त्याला मूत्रपिंडाच्या आजाराचा कोणताही कौटुंबिक इतिहास नव्हता, धूम्रपान किंवा मद्यपानाचे व्यसन नव्हते आणि हानिकारक औषधांच्या सेवनासारखा कोणताही वैद्यकीय इतिहास नव्हता. तरीही त्याचे मूत्रपिंड निकामी होत राहिले, ज्यामुळे तो डायलिसिसवर अवलंबून राहिला आणि शेवटच्या टप्प्यातील मूत्रपिंडाच्या आजाराच्या भावनिक आणि शारीरिक परिणामांशी झुंजत राहिला. त्याच्या आईने तिचे एक मूत्रपिंड दान करण्यासाठी पुढाकार घेतला. ७ एप्रिल २०२४ रोजी यशस्वी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्यात आली.

डॉ. अमर कुलकर्णी (नेफ्रोलॉजिस्ट) म्हणाले, अनुवांशिक चाचणीने रुग्णाला एक दुर्मिळ (एएचयूएस) विकाराचे निदान झाले. ॲटिपिकल हेमोलिटिक युरेमिक सिंड्रोम ही एक दुर्मिळ स्थिती आहे जिथे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती चुकून स्वतःच्या रक्तवाहिन्या आणि मूत्रपिंडाचे नुकसान करते. रुग्णामध्ये प्रत्यारोपणानंतर लगेचच हा दुर्मिळ आजार दिसून आला, ज्यामुळे परिस्थिती खूपच गंभीर झाली.

जेव्हा माझी आई माझ्यासाठी किडनी देणार आहे हे कळालं, तेव्हा माझ्या आयुष्यात पुन्हा एकदा आशेचा निर्माण झाला. पण शस्त्रक्रियेनंतर पुन्हा गुंतागुंत सुरू झाली आणि तेव्हा मला खूप भीती वाटू लागली. मेडिकव्हर हॉस्पिटलमधील डॉक्टरांच्या कौशल्यामुळे आणि त्यांच्या प्रयत्नांमुळे मला जगण्याची दुसरी संधी मिळाली, असे रुग्ण सूरज पवार याने सांगितले.

# जि.प.च्या शाळा सुरुच ठेवाव्यात

## • शौकत मुकादम यांची मागणी



| चिपळूण | प्रतिनिधी |

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा या ग्रामीण भागामध्ये आहेत. त्या बंद करण्याचे पाऊल शासनाने उचलू नये. कारण आर्थिक दुर्बल घटक व गरीबातील गरीब विद्यार्थी ग्रामीण भागातील प्राथमिक शाळेमध्ये शिक्षण घेत आहे. पट संख्या जरी कमी-जास्त असली तरी, ग्रामीण भागामध्ये इयत्ता पहिली ते सातवी ही प्राथमिक शाळा असणे आवश्यक आहे. कारण सर्वच पालकांची मुले शहरालगत येऊन पहिलीपासून इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेऊ शकत नाहीत.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरामध्ये येऊन शिक्षण घ्यायचे असले, तर त्यांना शहरालगत भाडयाने रहावे लागते. मात्र हे गरीब विद्यार्थ्यांच्या पालकांना परवडणारे नाही.

तरी यावर उपाययोजना काढून ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळा या चालू राहिल्याच पाहिजेत, अशी मागणी माजी सभापती शौकत मुकादम यांनी केली आहे.

ग्रामीण भागातील जिल्हा परिषेदेच्या मराठी शाळा सुरु राहिल्या पाहिजेत. काही झाले तरी ग्रामीण भागातील प्राथमिक मराठी शाळेतील शिक्षकांची संख्या कमी करु नये. कारण, यामध्ये विद्यार्थ्यांचे नुकसान होईल. शिक्षणाचे धोरण जे ग्रामीण भागामध्ये पुर्वीपासून सुरु आहे त्याच पद्धतीने सुरु ठेवावे, अशी मागणी पंचायत समितीचे माजी सभापती शौकत मुकादम यांनी महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाकडे केली आहे.

### महागडे शिक्षण गरीबाला न परवडणारे

शासनाच्या माध्यमातून गरीब व द्रारिद्रय रेषेखालील लाडकी बहीण, संजय गांधी निराधार योजना अशा अनेक योजना व सुविधा गरीबांसाठी शासनाच्या माध्यमातून राबिवल्या जात आहेत. कारण वरील योजना या आर्थिकदृष्टया निकर्ष लावून राबिवल्या जातात, अशा पालकांची मुले शहरामध्ये येऊन महागडे शिक्षण घेऊ शकतात का? असा प्रश्न मुकादम यांनी उपस्थित केला आहे. पालकांना सवलती व ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेचे शिक्षण बंद केलेत तर विद्यार्थ्यांची अधोगती होईल. कारण महागडे शिक्षण हे गरीबाला परवडणारे नाही.

# दिशादर्शक फलकांजवळ सिग्नल बसविण्याची गरज

| कोलाड | प्रतिनिधी |

मुंबई-गोवा महामार्ग राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील सर्व दिशादर्शक फलकांजवळ सिग्नल नसल्यामुळे रात्रीच्या अंधारात रस्ता क्रॉस करतांना विरुद्ध बाजूनी येणारी वाहने दिसत नाही. यामुळे वाहन चालकांसहित प्रवाशांच्या जिवाला धोका निर्माण झाला असून या सर्व ठिकाणी सिग्नल बसविण्याची गरज निर्माण झाली आहे.

मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम गेली अठरा वर्षांपासून सुरु असून अद्यापही काम अपूर्ण स्थितीत आहे. या मार्गांवरील इंदापूर, रातवड, तळवली, कोलाड, खांब, वाकण, नागोठणे या ठिकाणी दिशादर्शक फलक आहेत. परंतु या ठिकाणी रात्रीच्या अंधारात वाहन चालकांना वाहनांची दिशा बदलताना विरुद्ध बाजूने येणारी वाहने दिसत नसल्याने काही वाहने डिवाडरवर आदळून अनेक अपघात होत असून अनेकांचे नाहक बळी जात आहेत. याला जबाबदार कोण? अशी संतप्त प्रतिक्रिया प्रवासी वर्गातून व्यक्त करण्यात येत आहे. महामार्गांवर अनेक ठिकाणी उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाले आहे. तर काही ठिकाणचे काम अद्यापही बाकी आहे. परंतु, ज्या उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाले; ते वर-खाली असल्यामुळे या ठिकाणी सिग्नल लावणे गरजेचे आहे. तसेच या मार्गावर सुकेळी खिंडीत रस्त्याला असणारी झाडे-झुडपे व वेडी वाकडी वळणे यामुळे रात्रीच्या वेळी वाहन चालकांना तारेवरची कसरत करावी लागते. या गोष्टीकडे त्वरित लक्ष देऊन योग्य त्या ठिकाणी सिग्नल लावण्यात यावे, अशी मागणी प्रवासी वर्गातून व्यक्त करण्यात येत आहे.

### महामार्गांवर अपघातांचा धोका वाढला

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३० नोव्हेंबर

१)श्री.सभाष चिंतामाण वैशंपायन
दि.३०-११-१९५१
श्रीबाग-२,अलिबाग

२)श्रीम.उषा रामचंद्र लाड
दि.३०-११-१९४४
तळकरनगर, अलिबाग

३)श्री.यशवंत मोरश्वर भागवत
दि.३०-११-१९४१
बालाजी नाका, अलिबाग

४)श्री.अरूण बाळकृष्ण कुवळेकर
दि.३०-११-१९५२
चेंढरे-अलिबाग

५)श्रीम.विजया नारायण नागवेकर
दि.३०-११-१९५२
रामनाथ, अलिबाग

# अंमली पदार्थ विक्रेत्यांना अटक

**ठाणे** : ठाणे गुन्हे शाखेच्या पथकाने एमडी या अंमली पदार्थांची विक्री करण्यासाठी आलेल्या दोघांना अटक केली आहे. त्यांच्याकडून १ कोटी ९२ हजार रुपये किंमतीचा अंमली पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला आहे. ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुम्बरे यांच्या आदेशानुसार पोलिसांकडून शहरात अमली पदार्थ विरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. यामध्ये अमली पदार्थ विक्री करणाऱ्यांविरोधात पोलिसांकडून कारवाई करण्यात येत आहे. याच मोहिमेतंर्गत ठाणे गुन्हे शाखेचे पोलीस उप आयुक्त अमरसिंह जाधव, ठाणे गुन्हे शाखा शोध २ चे सहाय्यक पोलीस आयुक्त विनय घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे अमली विरोधी पथकाने मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत पथकाने १ कोटी ९२ हजार रुपये किंमतीचा अंमली पदार्थाचा साठा जप्त केला आहे. तसेच सचिन सुभाष चव्हाण आणि रवि शामवीर डागुर यांच्यासह आणखी सहा जणांना अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी कापूरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# ग्रामीण नाट्य चळवळ कायम ठेवू



| चिरनेर | प्रतिनिधी |

अष्टगंध कला मंचाच्या प्रत्येक कलाकारासाठी तीर्थक्षेत्र असणाऱ्या या रंगभूमीची सेवा करण्यासाठी, नाट्य चळवळ कायम ठेवू, असे प्रतिपादन अष्टगंध कला मंचाचे अध्यक्ष अशोक म्हात्रे यांनी केले. अष्टगंध कला मंचाच्या वतीने पाली-परळी येथे कलाकारांसाठी दोन दिवसांच्या सहलीचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. त्यावेळी अशोक म्हात्रे हे कलाकारांना संबोधित करताना बोलत होते. यावेळी अष्टगंध कलामंचाचे सचिव तथा रंगकर्मी दत्तात्रेय घरत, नाटककार हसूराम पाटील नाटककार धनेश्वर म्हात्रे यांनीही कलाकारांना मार्गदर्शन केले. तर कार्यक्रमाप्रसंगी ज्येष्ठ रंगकर्मी गजानन म्हात्रे अष्टगंध कलामंचाचे सहसचिव रमेश कोळी, दिगंबर कोळी, रोशन घरत, गजानन ठाकूर, जय किसन मोकल, प्रसाद कडू, चेतन पाटील, प्रज्योत पाटील तसेच अन्य कलाकार उपस्थित होते.

# जेल नाका येथे तिहेरी अपघात

**रत्नागिरी** : रत्नागिरी शहरातील जेल नाका या वर्दळीच्या ठिकाणी शनिवारी (दि.२९) सकाळी तीन वाहनांचा तिहेरी अपघात झाला. या अपघातामुळे परिसरात काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. मिळालेल्या माहितीनुसार, या तिहेरी अपघातात एक पिकअप व्हॅन, कंटेनर आणि एक चारचाकी वाहनाचा समावेश आहे. अपघाताचा जोर मोठा असल्याने तिन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. या अपघातामध्ये सुदैवाने कोणतीही जीवितहानी किंवा गंभीर दुखापत झालेली नाही. मात्र, अपघातामुळे जेल नाका परिसरातील मुख्य मार्गावर वाहनांच्या रांगा लागल्याने वाहतुकीवर परिणाम झाला होता.

# वाघ्रण येथे किल्ले स्पर्धांचे बक्षीस वितरण



| वाघ्रण | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत वाघ्रण आणि ग्रामस्थ मंडळाच्या संयुक्त विद्यमाने दिवाळी २०२५ रांगोळी आणि किल्ले स्पर्धे तील विजेत्यांचा बक्षीस वितरण समारंभ बुधवारी (दि.२६) रात्री ९ वाजता संपन्न झाला. रांगोळीमध्ये प्रथम प्राजक्ता म्हात्रे यांना पंच रविंद्र पाटील तर द्वितीय क्रमांक सुवर्णा पाटील यांना बळवंत गावंड तर तृतीय रसिका पाटील व खुशी पाटील यांना बाळ कृष्ण पाटील व अक्षदा म्हात्रे यांच्या हस्ते बक्षिसे वाटप करण्यात आली.

तर किल्ले स्पर्धेत प्रथम क्रमांक कृतार्थ पाटील यांस सरपंच राजेंद्र पाटील यांनी तर द्वितीय क्रमांक रुद्र पाटील यांस डॉ . कृष्णकांत पाटील आणि तृतीय मित पाटील यांस पंच प्रफुल पाटील यांनी सन्मानित केले. त्याचप्रमाणे खारपेढांबे गावांतील रांगोळी प्रथम क्रमांक जास्मीन पाटील तर द्वितीय रुत्वी पाटील यांना देखील बक्षिसे वाटप करण्यात आली. तर रांगोळी उत्तेजनार्थ पारितोषिके अनुक्रमे विभक्ती पाटील, प्रियांका पाटील व स्वरा पाटील तर विशेष उत्तेजनार्थ भक्ती पाटील व हर्षा पाटील यांना देण्यात आली. तसेच रांगोळी आणि किल्ले स्पर्धेतील ५० हून अधिक सहभागी विद्यार्थी, युवक, मुली व महिलांना समारंभपूर्वक उपस्थितांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

# डिलिव्हरी बॉयची हत्या

**मुंबई** : अंधेरी येथे डिलिव्हरी बॉय मोहित स्वामीच्या हत्येप्रकरणी दोघांना अंधेरी पोलिसांनी अटक केली. रोहित पाल आणि मनोजकुमार विश्वनाथ सोनी अशी त्या दोघांची नावे आहेत. स्वामी हा पत्नी सोबत अंधेरी येथे राहत होता. तो डिलिव्हरी बॉयचे काम करायचा. दोन दिवसांपूर्वी मरोळ पाइपलाइन येथील मोकळ्या जागेवर मोहित हा जखमी अवस्थेत आढळून आला. त्याला उपचारासाठी कूपर रुग्णालयात दाखल केले. तेथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. परिमंडळ १० चे पोलीस उपायुक्त दत्ता नलावडे यांनी अधिकाऱ्यांना तपासाच्या सूचना दिल्या. तपासासाठी एकूण १० पथके तयार करून पोलिसांनी आरोपीला उत्तर प्रदेशतून ताब्यात घेतले.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. ३० ते ०६ डिसेंबर २०२५

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

## अचानक धन प्राप्ती होईल

**मेष :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुमची मुले बरीच प्रगती करतील. ज्यामुळे तुमचे मन आनंदित राहील. आर्थिक रूपात प्रगती करण्याची संधी तुम्हाला मिळेल आणि परदेशातील संपर्कांने तुम्हाला चांगला लाभ प्राप्त होईल. तसेच, तुम्हाला अचानक धन प्राप्ती ही होऊ शकते. नातेवाईकांकडून आणि सहयोगींकडून तुम्हाला सहयोग ही मिळेल. हा सप्ताह करिअरला उच्चता देणारा आहे. म्हणून प्रत्येक संधीला आत्मसात करण्याचा प्रयत्न करा. तुम्ही कुटुंबातील बऱ्याच जबाबदाऱ्यांना पूर्ण कराल. ज्यामुळे तुमच्या प्रतिष्ठेत वृद्धी होईल. तसेच तुमचा समाजात मानसन्मानही वाढेल आणि तुम्ही एक प्रसिद्ध व्यक्ती म्हटले जाल. तुम्हाला काम आणि आराम यामध्ये संतुलन ठेवण्याची आवश्यकता असेल. कारण, तुम्हाला शारीरिक समस्यांचा सामना करावा लागू शकतो **महिलांना-** मांसपेशी आणि नसांच्या संबंधित समस्या येऊ शकतात. विवाहित व्यक्तींसाठी सुरूवात अधिक चांगली नाही ते जोडीदाराच्या क्रोधाला बळी पडण्याची शक्यता आहे. तुमची आर्थिक स्थिती काही आव्हानात्मक राहील. **शुभदिनांक** - ३०,०२.

## प्रेमजीवनात गोडवा येईल

**वृषभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहाची सुरूवात आरोग्यसंबंधित अनुकूल राहील. तथापि, तुम्हाला वेळोवेळी डॉक्टरांच्या सल्ल्याची आवश्यकता असेल. म्हणून आरोग्याची काळजी घ्या आणि लहानमोठ्या समस्यांकडे दुर्लक्ष करू नका. या काळात प्रेम जीवनात उत्तम फळांचा अनुभव घ्याल. काही गोष्टींना घेऊन तुमच्या दोघांमध्ये वाद होऊ शकतो. परंतु, तुम्ही सांभाळून चालले तर विभिन्न आव्हाने आणि संकटे असूनही तुमचे प्रेमजीवन चांगले चालत राहील. तुमच्या प्रियकर किंवा प्रियसीला तुम्ही बरोबरीचा दर्जा दिला तर तुमच्या प्रेमजीवनात गोडवा येईल. विवाहित लोकांना आपल्या जीवनसाथीच्या आरोग्याची काळजी घ्यावी लागेल आणि सासरच्या लोकांशी चांगले संबंध ठेवावे लागतील. तुम्ही आणि तुमच्या जीवनसाथीमध्ये प्रेमाची भावना वाढेल. मुलांसाठी हा काळ बराच अनुकूल राहील आणि ते शिक्षणात तसेच काही क्रिएटिव्ह क्षेत्रात आवड निर्माण करतील. **महिलांना-** कौटुंबिक जीवनात नजर टाकली असता कुटुंबातील लोक अध्यात्मिक गोष्टीत अधिक लक्ष देतील. तथापि काही लोकांसोबत विरोधाभासाची स्थिर्ती बनलेली राहील. **शुभदिनांक** -०३,०४.

## कार्यक्षेत्रात प्रगती कराल

**मिथुन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात धन संबंधित वाद कुटुंबातील शांती भंग करू शकतो. प्रोफेशनल कोर्सची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना उत्तम यश मिळेल. वित्तीय निर्णय घेण्याआधी बरेच विचार करावे लागतील. कारण आर्थिक दृष्टिकोनाने हे दिवस सामान्य राहील. सुरूवातीस करिअरसाठी काही आव्हानात्मक राहू शकते. म्हणून तुम्हाला कठीण परिश्रम करावे लागेल. या वेळी तुम्ही नवीन व्यवसाय सुरु करण्यापासून सावध राहिले पाहिजे. मुलांसाठी हा काळ त्यांचे स्वास्थ्य प्रभावित राहू शकते. पूर्वार्ध कौटुंबिक जीवनासाठी अनुकूल नाही आणि आई वडिलांचे आरोग्य ही प्रभावित राहील. परंतु उत्तरार्धात नंतर स्थिती बऱ्यापैकी अनुकूल होईल. विद्यार्थ्यांसाठी हा कालावधी अनुकूल असेल आणि त्यांना परदेशातील यूनिवर्सिटीमध्ये ॲडमिशन मिळू शकते. तथापि, करिअरच्या दृष्टिकोनातून तुम्हाला पद प्राप्ती होऊ शकते. आपल्या कार्यक्षेत्राची स्थिती तुमच्या बाजूने येईल आणि तुम्ही प्रगती कराल. प्रेम जीवनासाठी कालावधी अनुकूल राहील आणि तुमचे प्रेमजीवन उत्तम होईल. **महिलांना-** तुम्हाला बरेच सांभाळून चालावे लागेल. अन्यथा वित्तीय संकटाचा सामना करावा लागू शकतो. पैसा जपून वापरा. **शुभदिनांक**-०५,०६.

## विचारपूर्वक निर्णय घ्या

**कर्क :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला आरोग्याची प्राप्ती होईल आणि उत्तम स्वास्थ्याचा तुम्ही आनंद घ्याल. तुम्हाला या गोष्टीची काळजी घ्यायची आहे की, वेळेनुसार ध्यान आणि योग करत राहा आणि व्यायाम करा म्हणजेच लठ्ठपणा आणि मधुमेह अशा समस्यांपासून तुम्ही मुक्त राहाल. प्रेमजीवनात बदल येऊ शकतात आणि काही नाते संपण्याच्या मार्गावरही येऊ शकतात. खूप विचारपूर्वक निर्णय घ्या. कारण, बरेच निर्णय तुमच्या जीवनाचे कठीण निर्णय असतील. जर तुम्ही विवाहित आहात तर दाम्पत्य जीवनात तणाव राहू शकतो. दाम्पत्य जीवनात होणारे गैरसमज दूर करा आणि एकमेकांसोबत सामान्य व्यवहार करा. हेच तुमच्यासाठी लाभदायक असेल. **महिलांना-** या सप्ताहात अंतिम दिवस दाम्पत्य जीवनासाठी चांगले राहतील. तथापि तुमच्या संतानसाठी ही दिवस बरेच चांगले राहील आणि ते प्रत्येक कार्यात प्रगती करतील. त्यांच्या संस्कारात वृद्धी होईल आणि ते मोठ्यांचा सन्मान करतील. कौटुंबिक दृष्टीकोनाची गोष्ट केली तर वेळ आव्हानात्मक राहील. **शुभदिनांक** - ३०,०२.

## यशामुळे मनोबल वाढेल

**सिंह :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहाची सुरूवात चांगली राहील आणि कुटुंबात नवीन सदस्याचे आगमन होऊ शकते. जर तुम्हाला कुटुंब जोडून ठेवायचे असेल तर, तुम्हाला काही समझोता करावा लागेल. विद्यार्थ्यांसाठी हे दिवस यश देणारे असेल आणि स्पर्धा परीक्षेतही यश मिळाल्याने तुमचे मनोबल वाढलेले असेल. तुम्हाला तुमचे आर्थिक जीवन बदलण्याची आवश्यकता असेल. कारण हे चढ-उताराने भरलेले असू शकते. धन लाभासाठी तुम्हाला अधिक प्रयत्न करावे लागतील. कार्यक्षेत्रात तुम्ही आपल्या कामावर मुख्य रूपात केंद्रित राहाल. हे तुमच्या प्रदर्शनाला उत्तम बनवण्याच्या कामाला येईल. करिअरच्या दृष्टिकोनाने हा कालावधी तुमच्यासाठी उत्तम राहील. तुम्हाला आपल्या तब्येतीकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. संतुलित दिनचर्येचे पालन केले पाहिजे. **महिलांना-**तुम्हाला पित्तसंबंधित शारीरिक समस्या होण्याची शक्यता आहे. प्रेमजीवनात काही दीर्घकालीन बदल होऊ शकतात. ज्यामुळे तुम्ही एक आदर्शवादी प्रेमीच्या रूपात आपली ओळख बनवाल. गैरसमज होणार नाहीत, या गोष्टीची काळजी घावी लागेल. **शुभदिनांक** - ०१,०४.

## उत्तम स्वास्थ्याचा आनंद घ्याल

**कन्या :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात दाम्पत्य जीवनात ऊन सावली चालू राहील. थोड्या आव्हानांसोबत तुमचे दाम्पत्यजीवन पुढे चालेल. तुम्हाला तुमच्या जीवनसाथीसोबत खांद्याला खांदा लावून पुढे चालले पाहिजे. तसेच कौटुंबिक जीवनात ही अडथळे येऊ शकतात. आईचे स्वाथ्य प्रभावित राहू शकते. हे दिवस विद्यार्थ्यांसाठी कठीण मेहनत करण्याचे संकेत देत आहे. तुम्हाला तुमच्या धैयाला प्राप्त करण्यासाठी एकाग्र होवून प्रयत्न करावे लागतील. वित्तीय गोष्टींमध्ये तुम्हाला काही संघर्ष करावे लागू शकतात आणि दुसरीकडे खर्चात वृद्धी होईल. तथापि आपल्या बचतीवर लक्ष द्या आणि धन संबंधित गुंतवणूक विचारपूर्वक करा. सुरूवात करिअरसाठी सामान्य रूपात शुभ राहील. तुम्ही कुठल्या मोठ्या व्यावसायिकासोबत राहून कामही करू शकतात. तुम्ही स्वास्थ्यबाबतीत बरेच भाग्यशाली असाल आणि उत्तम स्वास्थ्याचा आनंद घ्याल. फक्त तुम्हाला तुमची दिनचर्या नियमित ठेवावी लागेल. **महिलांना-**प्रेम आयुष्य उत्तम असेल. जर तुम्ही विवाहित आहात तर वैवाहिक लोकांसाठी हे दिवस संधींनी भरलेले राहू शकते. **शुभदिनांक** - ०२,०३.

## आर्थिक आवक वाढेल

**तुळ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुमच्या जीवनसाथीला त्यांच्या कार्यक्षेत्रात काही मोठे यश प्राप्त होऊ शकते. काही वेळेसाठी एकमेकांपासून दूर राहावे लागू शकते. परंतु याने तुमच्या नात्यामध्ये घनिष्टता येईल, संबंध मधुर होतील. या राशीतील विद्यार्थ्यांना यावेळी काही मोठी संधी प्राप्त होऊ शकते. तुमच्यासाठी हे दिवस बरेच उत्तम सिद्ध होईल. कारण तुमचे प्रयत्न यश अर्जित करतील. आर्थिक दृष्टिकोनातून हा कालावधी बरेच अनुकूल आहे. धन आवक सातत्याने वाढत राहील. ज्यामुळे तुम्ही बरेच प्रसन्न राहाल. तुम्ही वाहन खरेदी करू शकतात. करिअरच्या दृष्टिकोनाने हा कालावधी प्रगतिशील सिद्ध होईल आणि तुमच्या करिअरमध्ये बदल होतील. स्थान परिवर्तन होण्याची ही शक्यता आहे. तुम्हाला आपल्या मित्रांचे सहयोग प्राप्त होईल, जे तुम्हाला पुढे जाण्यासाठी प्रेरित करेल. **महिलांना-** कौटुंबिक जीवनासाठी हे दिवस बरेच अनुकूल सिद्ध होईल. परिवाराला सामाजिक रूपात सन्मान आणि संपन्नता प्राप्त होईल. **शुभदिनांक** - ०३,०५.

## यश प्राप्तीसाठी परिश्रमाची गरज

**वृश्चिक :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुमचे स्वस्थ कमजोर राहण्याची शक्यता आहे. तुम्हाला अपचन, वायू रोग, डोकेदुखी, गुढगेदुखी, कांजण्या तसेच थकवा अशा समस्या त्रास देऊ शकतात. उत्तम आरोग्य आयुष्यातील सर्वात मोठे धन आहे म्हणून आपल्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या प्रति कुठलाही निष्काळजीपणा करू नका. तुमच्या प्रेमजीवनात स्थिरता येईल. या कालावधीत आयुष्य जगण्याची कला शिकण्याची संधी मिळेल. जर तुम्ही विवाहित आहात तर, दाम्पत्य जीवनासाठी सुरूवात काही नाजूक राहील आणि तुमच्या जीवनसाथीच्या स्वास्थ्यात समस्या येऊ शकतात. तथापि मध्यात बऱ्यापैकी स्थिती चांगली होईल आणि तुम्ही दाम्पत्य जीवनात पुढे जाल. तुमच्या मुलांना आयुष्यात यश प्राप्तीसाठी अधिक परिश्रम करावे लागतील. **महिलांना-** तुमच्या मुलाचे या कालावधीत विवाह होऊ शकते. कौटुंबिक जीवनासाठी कालावधी बऱ्यापैकी चांगले राहील आणि तुम्ही बराच वेळ तुमच्या कुटुंबातील लोकांसोबत घालवाल. ज्यामुळे आपसी संबंध उत्तम होतील. **शुभदिनांक** - ०२,०५.

## महत्वपूर्ण निर्णय घ्याल

**धनु :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला चांगल्या आरोग्याकडे घेऊन जाईल. वेळोवेळी काही मानसिक समस्या समोर येऊ शकतात. परंतु काही मोठी समस्या होण्याची स्थिती दिसत नाही. प्रेम जीवनात या कालावधीत बराच आराम मिळेल आणि जे लोक सिंगल आहेत त्यांच्या आयुष्यात नवीन व्यक्ती येऊ शकतो. जर तुमचे कुणासोबत ब्रेक अप झाले असेल, तर ती व्यक्ती पुन्हा तुमच्या आयुष्यात येऊ शकते. जर तुम्ही विवाहित आहेत तर दाम्पत्य जीवनासाठी या कालावधीत अधिक उत्तम असेल. तुम्ही तुमच्या जीवनसाथीसोबत आयुष्यात पुढे जाल आणि भविष्यासाठी महत्वपूर्ण निर्णय घ्याल. तुमच्या जीवनात आकर्षण राहील. तुमच्या कुटुंबात कुठल्या गोष्टीला घेऊन वाद होण्याची शक्यता आहे. म्हणून धैर्याने काम करा. कुटुंबात कुणाचा विवाह किंवा संतानचा जन्म होण्याने आनंद येईल. विद्यार्थ्यांना कठीण संघर्षानंतर यशाची प्राप्ती होईल. **महिलांना-**आर्थिकबाबतीत या कालावधीत बरेच चांगले राहू शकते. तुम्ही बचत करण्यातही समर्थ व्हाल. या कालावधीत सुरूवातीत कुठले नवीन कार्य सुरु करू शकता. तुम्हाला प्रगतीच्या अनेक संधी प्राप्त होतील. **शुभदिनांक** - ३०,०३.

## आर्थिक लाभ होईल

**मकर :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुमचे स्वास्थ्य चांगले राहू शकते. फक्त काही लहान आणि किरकोळ समस्या तुम्हाला येऊ शकतात. तुम्ही आपल्या प्रियकर/प्रियसीसोबत उत्तम अनुभवांचा आनंद घ्याल. तुमचा जोडीदार ही तुमच्या भावनांना समजेल आणि जर तुम्ही कुणाला प्रपोज करणार असाल तर, तुम्हाला त्यात या कालावधीत यश मिळेल. दाम्पत्य जीवन बरेच मधूर राहील आणि तुमचे तुमच्या जीवनसाथीसोबत ताळमेळ चांगले असण्याने तुम्ही वैवाहिक जीवनाचा आनंद घ्याल. तथापि, तुम्हाला आपल्या जीवनसाथीच्या आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे. ज्यांना अपत्य नाही, त्यांना या कालावधीत संतान प्राप्ती होऊ शकते. **महिलांना-** ज्यांना मुले आहेत त्यांची प्रगती होईल. या कालावधीत तुम्हाला प्रॉपर्टीच्या संबंधित बरेच चांगले लाभ मिळू शकतात. तुमचे कौटुंबिक जीवनही बऱ्यापैकी आरामात पूर्ण होईल. घरात नवीन सदस्याचे आगमन होऊ शकते. शिक्षणाच्या क्षेत्रात मिश्रित परिणामांची प्राप्ती होईल. तुम्ही जितकी मेहनत कराल, तितकाच तुम्हाला आर्थिक लाभ होईल. **शुभदिनांक** - ०२,०४.

## कामाचे कौतुक होईल

**कुंभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात विद्यार्थ्यांसाठी हा कालावधीत चांगले राहू शकते. नोकरीच्या शोधात असलेल्या लोकांना बऱ्याच मेहनतीनंतर नोकरी मिळू शकते. शिक्षणा संबंधित परदेश यात्रा होण्याची शक्यता आहे. आर्थिकबाबतीत हा कालावधी सामान्य राहील. एकापासून अधिक स्त्रोतांनी तुमची कमाई होईल. तथापि खर्चही कायम राहतील. या कालावधीत तुम्ही कुठलाही नवीन व्यवसाय करू नका. तुम्हाला नोकरीत परिश्रम करण्याचा सल्ला दिला जातो. निश्चित रूपाने तुम्ही या कालावधीत आपल्या ऊर्जेचा योग्य वापर करण्यास यशस्वी व्हाल. करिअरमध्ये विदेशी स्त्रोतांनी चांगला लाभ मिळेल आणि तुमच्या कामासाठी तुमचे कौतुक होईल. तुम्हाला आपल्या मनासारख्या स्थानावर स्थानांतरण मिळू शकते. या कालावधीत चांगल्या गोष्टी होण्याचे संकेत देते. **महिलांना-** या कालावधीत तुमच्यासाठी बऱ्याच अंशी चांगले राहील. तथापि तुम्हाला स्वास्थ्य संबंधित मिश्रित परिणामांची प्राप्ती होईल. जुन्या काही आजारातून तुम्हाला मुक्ती मिळेल. **शुभदिनांक** - ०३,०४.

## शिक्षण क्षेत्रात यश मिळेल

**मीन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्हाला कौटुंबिक जीवनात ऊन सावलीची स्थिती राहील. तसेच, वडिलांच्या आरोग्यविषयक समस्या येऊ शकतात, त्यांची काळजी घेणे गरजेचे आहे. तुमच्या घरामध्ये बदल होऊ शकतात आणि तुम्हाला तुमच्या जवळच्या लोकांपासून लांब जावे लागू शकते. तुमच्या कुटुंबात काही शुभ कार्य होण्याचीही शक्यता आहे. विद्यार्थ्यांना चांगल्या गुणांची प्राप्ती होईल आणि ते उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात बरेच चांगले प्रदर्शन करण्यात यशस्वी राहतील. उत्तरार्धात स्वास्थ्य लाभ मिळेल. सुरवातीत स्थिती चढउताराने भरलेली राहील म्हणून तब्बेतीची काळजी घेणे गरजेचे आहे. प्रेमजीवनात कठीण प्रसंग येऊ शकतात. परंतु, तुमचे प्रेम मजबूत असल्याने कितीही कठीण आव्हाने आली तरी तुम्ही दोघे चांगल्या प्रकारे परिस्थितीचा सामना करू शकाल. प्रेम विवाहाची इच्छा ठेवणाऱ्या लोकांना जास्त रिस्क घ्यावी लागेल आणि खूप प्रयत्न करावे लागतील. **महिलांना-** वैवाहिक जीवन हे आनंदी राहील आणि कुठलीही मोठी समस्या येणार नाही. **शुभदिनांक** - ०५,०६.

# उरण वाहतूक पोलिसांची गस्त वाढली



## नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांचे 'प्रबोधन'

| उरण | प्रतिनिधी |

उरण नगरपालिका निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने शहरात शांतता आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच वाढत्या वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी उरण वाहतूक पोलिसांनी कंबर कसली आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात अचानक वाढलेल्या वर्दळीला नियंत्रित करण्यासाठी पोलिसांनी गस्तीत मोठी वाढ केली असून, नियम मोडणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाईसोबतच विशेष प्रबोधनात्मक सत्रे आयोजित केली आहेत.

उरण वाहतूक पोलिसांनी यावेळी केवळ दंड न आकारता, वाहनचालकांना त्यांच्या चुकांची जाणीव करून देत, सुरक्षिततेचे महत्त्व समजावून सांगितले. दारू पिऊन वाहन चालवणे पूर्णपणे टाळावे, वाहन चालवताना मोबाईलचा वापर करू नये, रस्त्यावर कुठेही वाहने उभी करून वाहतुकीस अडथळा निर्माण करू नये, भरधाव वेगाने वाहन चालवणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल अशा सुचना पोलिसांनी दिल्या

वाहतूक पोलिसांनी वाहनचालकांना अपघातग्रस्त व्यक्तींना मदत करण्याच्या ममानवतावादीफ भूमिकेवर विशेष भर दिला. अपघातानंतरचा पहिला तास किती महत्त्वाचा आहे, हे समजावून सांगण्यात आले. अपघातग्रस्त जखमींना तात्काळ जवळच्या रुग्णालयात घेऊन जावे. अपघाताची माहिती त्वरित पोलीस यंत्रणेला द्यावी: यासाठी १०० किंवा ११२ या क्रमांकावर फोन करावा. जवळच्या वाहतूक चौकीला/पोलीस स्टेशनला कळवावे. रुग्णवाहिका बोलावण्यासाठी १०८ किंवा १०३३ या क्रमांकावर संपर्क साधावा. सर्वांनी आपली वाहने सावकाश चालवून इतरांचा आणि स्वतः चा जीव सुरक्षित ठेवावा असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे. उरण शहरातील प्रमुख रस्ते, चौक आणि बाजारपेठांच्या परिसरामध्ये विशेष पथके तैनात करण्यात आली आहेत. पोलीस निरीक्षक/उपनिरीक्षक यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, निवडणुकीपूर्वी आणि नंतरही शहराची वाहतूक व्यवस्था सुरळीत राखण्यासाठी नागरिकांनी वाहतूक नियमांचे स्वयंस्फूर्तीने पालन करावे. हे अभियान यापुढेही कठोरपणे सुरू राहणार असल्याचे उरण वाहतूक पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे यांनी स्पष्ट केले आहे.



# टिपणीस महाविद्यालयात संविधान दिन साजरा

| नेरळ | प्रतिनिधी |

नेरळ ममदापुर येथील मातोश्री टिपणीस महाविद्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला,त्यावेळी विद्यार्थ्यांना संविधानांमधील परिष्ट यांचे वाचन करून दाखावण्यात आले.

संविधान दीनानिमित्त मातोश्री सुमती चिंतामणी टिपणीस कला आणि वाणिज्य महाविद्यालय येथे संविधान स्वीकृती दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आले यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन प्रा.अशोक भोईर यांना निमंत्रित करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. नंदकुमार इंगळे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अनंत घरत,डी एल. एल. ई विभाग प्रमुख अमोल सोनवणे, प्राध्यापक वृंद प्रतिनिधी प्रा. सागर मोहिते उपस्थित होते.या कर्यक्रमाची सुरुवात संविधान उद्देशीकेच्या सामूहिक वाचनाने झाली. प्रमुख वक्ते म्हणुन प्रा. अशोक भोईर मार्गदर्शन केले. भोईर यांनी यावेळी विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाचे शुक्ष्म पैलू या विषयावर मार्गदर्शन केले.महाविद्यालयातील ११० विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. या शिवाय संविधान दीना निमित्त विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा आणि पोस्टर मेकिंग स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- सर्वप्रकारचे विवाह/आजार, संतानप्राप्ती/सोनेतारणावर बिनव्याजी कर्ज/शेतकरी/निराधार विधवा महिलांना दरमहा ३०००/-ठेवीदारांना दरमहा ८,०००/- घरबसल्या कायमस्वरुपी लाखो कमविण्यासाठी डॉ. नथुराम धायाशेठ मोकल, इंटरप्रायझेस शिहू (पोयनाड-नागोठणा) रायगड ४०२१०६/८२६३८९०४२३(वेळ ठरवूनच)
- SALE OF BAGAYATI WADI. 13 GUNTHE, @26 Lakh per Guntha, 200 Mtr. (meter) from. sea Beach. Village-THAL, Gunjal Ali, Alibag, M. 8779805353
- नागाव येथे घरी राहून कामासाठी कपलची आवश्यकता आहे. कामाचे स्वरूप : जेवण बनवणे, घरकाम, गार्डन व स्विमिंग पूलची देखभाल.सुविधा :केअरटेकर रूम, किचन काउंटर, टीव्ही. पगार : रु २५,००० /- प्रति महिना. अधिक माहितीसाठी संपर्क : 7875866555, 8408829555
- विकणे आहे - अलिबाग-कुरुळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क :९६२३८४९३४९
- कॉम्प्युटर ग्राफीक्स डियायनर, डिटीपी ऑपरेटर व मशिनवर काम करण्यासाठी मुले/मुली पाहिजेत. स्लॅष ग्राफिक्स, अलिबाग ९८२३६५०५५१
- अलिबागमध्ये समर्थ मठ, पिंपळभाट ,गोंधळपाडा, रेवस बायपास , विद्यानगर परिसरामध्ये २ BHK प्रशस्त रूम असलेला, २ टॉयलेट असलेला, पार्कंग असलेला, रेडीपोझिशन फ्लॅट त्वरीत विकत घेणे आहे. फ्लॅट दहा वर्षापेक्षा जास्त जूना नको. फ्लॅट ग्राऊंड फ्लोअर किंवा टॉप फ्लोअर नको एजंटचे स्वागत आहे मो. ७७५८९७५४०७
- फिशिंग मच्छिमारी व्यवसायासाठी सेकंडहॅण्ड ३५० ते ४०० पॉवर इंजिन असलेली बोट विकत घेणे आहे मो. ९९२३०३६१५६
- नाश्ता स्टॉलवर कामासाठी मदतनीस बाई पाहिजे. ७०६६१३८३६८
- पी.एन.पी. बिल्डींग नं.३ १ला मजला ४०० sqft रूम भाड्याने देणे आहे. डॉक्टर / मेडिकल फॅसेलिटी प्राधान्य - ९७६३३१७७३३.
- वॉन्टेड :- अलिबागमध्ये सकाळी नऊ ते बारा स्वयंपाक करणेसाठी बाई. पाच हजार मो.८५३०३०९७६५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनांची मिळकती त्यांचे मालक १. वाळकु गोविंद गोरे, २ . चंद्रकांत वाळकु गोरे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन:-**
**मौजे चेवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| | | हे-आर- पॉ | रु-पै |
| ४४ | २ | ४-३४-००<br>पो.ख. ०-६२-०० | ३-४४ |

वर नमूद मिळकतीपैकी खरेदी देणार यांचे मालकीचे क्षेत्र १-३५-००, पो.ख. ०-३०-०० हे-आर-पॉ, आकार १-०७ रु-पै या पैकी खरेदी दिलेले क्षेत्र १-२०-०० हे-आर-पॉ बाबत

या मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

मोबाईल:-
०९३२६२३६९२३
०९६८९६९९५९५

**ॲड. प्रवीण शांताराम खडे़**
पत्ता:- २, ''लक्ष्मी सदन'', जुने एस.टी.स्टॅण्ड,
मु.पो. नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी पुढील वर्णनाची निवासी सदनिका मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक (१) श्री. सचिन धिरजलाल मकाणी व (२) सौ. सविता सचिन मकाणी यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या निवासी सदनिका मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे,

**:: मिळकतीचे वर्णन ::**

मौजे गोंधळपाडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील सर्व्हे नं. १६/१, १६/४, १६/७, १६/८, १७/३, १७/४ या मिळकतींवर बांधण्यात आलेल्या इंद्रप्रस्थ संकुलामधील क्लस्टर-१, इमारत नं. २, एफ-विंग मधील रेज्ड पहिल्या मजल्यावरील निवासी सदनिका नं. २०२, क्षेत्रफळ ४०७ चौ.फुट, ज्यासी ग्रामपंचायत वेश्वी मालमत्ता क्रमांक ९०९/एफ/२०२.

सदरहू वर्णन केलेली निवासी सदनिका मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याची व ती निवासी सदनिका मिळकत आमचे अशिलांस कायमस्वरूपी विकण्याचा पुर्ण हक्क व अधिकार असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर निवासी सदनिका मिळकतींत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम. ओ. यु. करार, ताबे कब्जा वहीवाटी, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर निवासी सदनिका मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गुहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ३०/११/२०२५

सही /-
**ॲड. अनिकेत एच. गुरव**
पत्ता : श्रीबाग नं.२, अलिबाग, जि. रायगड
ऑफीस : डॉ. केळकर क्लिनीक शेजारी,
शिवाजी चौक, ता.अलिबाग, जि.रायगड
मोबाईल नं. : ९८५०४०२०५०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळिवण्यात येते की, खाली नमुंद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे भालगुल, ता.सुधागड, जि. रायगड. येथील जमीन मिळकत.**
**मिळकतीचे वर्णन**

| जमिन मालकाची नांवे | सं.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| श्रीम. रेवती मधुकर म्हात्रे | ३६/४/अ/१ | ०-४३-०<br>पैकी<br>०-२०-०० | ०८-०० |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हीतसंबंध नाही व असल्यास त्यानी ते जाणीवपुर्वक सोड्न दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- ३०/११/२०२५

खरेदीदारांतर्फे,
**राठोड एण्ड एसोसिएट्स**
२८६अ राठोड सदन ऑफिस नं.७ पाली, ता. सुधागड,
जि. रायगड. मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०


## विकणे आहे.

सुधागड, केवनाळे-पोलादपूर व नागोठणा-रोहा तालुक्यांतील गावांतील.

| | |
|---|---|
| १. | मौजे पाली शॉप नं. १ परमार कॉम्प्लेक्स एस टी स्टॅन्ड समोर तळ मजला शॉप ५४४ चौ. फुट |
| २ | मौजे पाली ओसवाल कॉम्प्लेक्स गणेश सोसायटी पहिला मजला ६०० चौ. फुट ब्लॉक |
| ३ | मौजे पाली श्री. बल्लाळ विनायक अपार्टमेंट ब्लॉक नं. ६, १२ व १३ |
| ४ | मौजे पाली यशवंत भवन दुसरा मजला ब्लॉक ४५४ चौ. फुट |
| ५ | मौजे महागाव गट नं.७४ क्षेत्र ८१ आर |
| ६ | मौजे खांडसई स. नं. २२/२ क्षेत्र २७ हे. आर |
| ७ | मौजे भावशेत गट नं. २४८ क्षेत्र ०-३२-४ हे.आर |
| ८ | मौजे पोटलज खु. गट नं.२४९ क्षेत्र १६४ हे.आर |
| ९ | मौजे पोटलज खु. गट नं. २६२ क्षेत्र १९४ हे. आर |
| १० | मौजे नाडसूर गट नं. ७६१ क्षेत्र २८ हे. आर |
| ११ | मौजे पिंपळोली स. नं.१/१७ क्षेत्र ०-७१-७० हे.आर |
| १२ | मौजे दिघेवाडी गट नं. १८७ क्षेत्र १-२३-८० हे. आर |
| १३ | मौजे कोशिंबळे स. नं. १०/३ क्षेत्र ०-०१-०० हे. आर |
| १४ | मौजे कोशिंबळे स. नं. १०/४ क्षेत्र १-३३-०० हे. आर |
| १५ | मौजे कोशिंबळे स. नं. २१/३ क्षेत्र ०-६१-०० हे.आर |
| १६ | मौजे कोशिंबळे स. नं. १४/६ क्षेत्र ०-८७-०० हे. आर |
| १७ | मौजे कोशिंबळे स. नं. ७/२ क्षेत्र ०-२१-८० हे. आर |
| १८ | मौजे कोशिंबळे स. नं. ९९/३ क्षेत्र ०-६१-०० हे. आर |
| १९ | मौजे गोमाशी गट नं. ५९६ क्षेत्र ०-८३-०० हे. आर |
| २० | मौजे गोमाशी गट नं. ५६२ क्षेत्र ०-१९-०० हे. आर |
| २१ | मौजे आतोणे स. नं. ५१०/१ क्षेत्र २-०२-८४ हे.आर |
| २२ | मौजे आतोणे स. नं. ४८६ क्षेत्र १-१४-०० हे. आर |
| २३ | मौजे आतोणे स. नं. ४८३ क्षेत्र २-८१-८० हे. आर |
| २४ | मौजे चिखलगाव स.नं.५६/४ क्षेत्र १-१५-९० हे.आर- उन्हेरे कुंडाजवळ |
| २५ | मौजे केवनाळे, ता.पोलादपूर, जि. रायगड. गट नं.२७३ क्षेत्र ३१६ आर |
| २६ | मौजे केवनाळे, ता.पोलादपूर जि.रायगड. गट नं. ता.३६६ क्षेत्र १०५ आर |
| २७ | मौजे केवनाळे, ता. पोलादपूर,जि. रायगड. गट नं. ता.३९० क्षेत्र ९२ आर |
| २८ | मौजे नागोठणे ता. रोहा, जि. रायगड ओमकार बिल्डींग शॉप नं. २ व ३ सलग्न |

**भाड्याने देणे आहे.**
पाली-सुधागड गावांतील गांधी चौक मेन रस्त्याला लागून असलेली दुकाने

| | |
|---|---|
| १ | मौजे पाली राठोड सदन शॉप नं. ६ व शॉप नं. ८ |
| | इच्छूक पार्टीने खालील मोबाईल नंबरवर दुपारी ४ ते ६ वेळेत संपर्क करावा. |

**श्री. सरदारमल जोरावरमल राठोड स्टॅम्प व्हेंडर**
६९९ जमना निवास पाली ता. सुधागड, जि. रायगड.
मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळिवण्यात येते की,

ज्याअर्थी १.रोहिणी तुकाराम जाधव, २. वनिता एकनाथ जाधव, ३. श्री. प्रशांत एकनाथ जाधव, २ व ३ राहणार राम मंदिर जवळ, राम मंदिर हक लाईन समोर, छत्रपती को. ऑप. सोसायटी, रुम नं. ५७, घाटकोपर पश्चिम, मुंबई ४०००८६ ४ सुचिता संदिप कदम, राहणार : ४०३, विरार महादेव मंदिर, काटागाम, सुरत, पो. काटागाम, सुरत शहर, जि. सुरत, गुजरात. ३९५००४ ५ प्राची प्रणित डांगे राहणार- रुम नं. ३१०, ३रा मजला, वदर अपार्टमेंट, जी-वदानी रोड, विरार वेस्ट, वसई, पालघर. ४०१३०५ ६. रंजिता रोहितभाई भालिया, राहणार ११८, पटेल पार्क, ताडवाडी, वारियाव, जि. सुरत, गुजरात ३९४५२० ७. निकीता राजू पाटील राहणार फ्लॅट नं. ६०५, इ-२०, स्वप्नपुर्ती सेक्टर-३६, खारघर, पो. खारघर, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२१० यांच्या मालकी वहिवाटीच्या मौजे पिटसईकोंड, ता. तळा, जि. रायगड. येथिल खालीलप्रमाणे सविस्तर वर्णन केलेली जमिन मिळकत आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे-पिटसईकोंड, ता. तळा, जि. रायगड येथिल**

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक/गट | हिस्सा क्रमांक | एकूण क्षेत्र पोटखराब्यासह हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| १. | १३७ | १ | ०-६२.०० | ००-२५ |

वर नमूद केलेली मिळकत सर्व मालकी हक्कांसहीत सदर मिळकतीचे मालक श्रीमती. रोहिणी तुकाराम जाधव व इतर, यांच्या कडून आमचे अशिल श्री.जिगनु सदु जाधव राहणारः श्री मलंग रोड, शिव मंदीर शेजारी नेवाळी, कल्याण पुर्व व श्री. निकेश गोपिनाथ पाटील, कु. अनमोल अशोक पाटील राहणारः मु.पो. तोंडरे, ता. पनवेल, जि. रायगड. यांनी कायम स्वरुपी खरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

त्याअर्थी सदर मिळकतींमध्ये अगर त्यांचे कोणत्याही भागांवर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेहि हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारास कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत आमच्या वरीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील श्रीमती. रोहिणी तुकाराम जाधव व इतर यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकती खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. २८/११/२०२५.

**श्री. मथुर शिवराम कुंभारकर,**
ॲडव्होकेट पत्ताः मु. चिंध्रण, पो. देविचापाडा,
ता. पनवेल पनवेल -४१०२०८, जि. रायगड.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे नांदगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक दिपक बाळाराम कांबळे यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे नांदगाव, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १८३ | १/२/ग | १-२०-०० | ०-९० |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथव रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ३०/११/२०२५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.९४२२०६८७५५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत तिचे मालक श्रीम. वंदना प्रविण श्रीखंडे व इतर, रा. आषाणे, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे आषाणे, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| ४० | १/ब | ०.४०.०० | ०.१९ |

पैकी अविभक्त हिश्याचे विक्री केलेले क्षेत्र ०.४.४ (हे.आर.पॉ.)

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. ३०/११/२०२५

**ॲड. कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस, एलएल.
बी प्रभात अपार्टमेंट रूम नं. ४ दुसरा मजला
सुनिल चिक्कीजवळ ता.कर्जत जि.रायगड
मो.नं.९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १११/११ | एकूण क्षेत्र ०-०६-३० हे.आर. | ०.०६ |
| १११/२ | एकूण क्षेत्र ०-१६-१० हे.आर. | ०.९१ |
| १११/८ | एकूण क्षेत्र ०-११-०० हे.आर. | ०.०८ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :- ३०/११/२०२५

**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः-हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो.कामार्ली, ता.पेण.जि.रायगड पिन नं. ४०२१०७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चेवणे, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ६६/१/अ/२/ड | एकूण क्षेत्र १-४७-४६ हे.आर. | ०.७५ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :- ३०/११/२०२५

**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो.कामार्ली, ता.पेण.जि.रायगड पिन नं. ४०२१०७

जा.क्र.२५४५/२५

**चौकशीची जाहीर नोटीस**
**नियम ७ अ प्रमाणे**

सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय
कल्पतरू इमारत पोस्ट ऑफिसजळ,
अलिबाग जि.रायगड

अर्ज क्रमांक :- ४२६/२०२५ दि.१७/११/२५
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :- ''दुर्गरत्न प्रतिष्ठान'' बाबत.

श्री किशोर गोविंद घुडुप ....... अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की,

सहायक धर्मादाय आयुक्त रायगड विभाग रायगड हे वर नमूद केलेला नोंदणी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
(अ) जंगम मिळकत :- (वर्णन) रोख रक्कम १,०००/- रुपये
(ब) स्थावर मिळकत : (वर्णन) काही नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावाची असेल अगर त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाल बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहिनिशी व मी सहायक धर्मादाय आयुक्त रायगड अलिबाग यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १७.११.२०२५ रोजी दिली.

सही/-
**अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**रायगड विभाग, रायगड**

## जाहिर नोटिस

नि ८/ड

**अलिबाग येथिल मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात**

दिवाणी चौकशी अर्ज क्र.१६१/२०२५

१. श्रीम. श्वेता सुनिल गावंड
२. श्री. सुजित सुनिल गावंड अर्जदार
३. श्री. सर्वेश सुनिल गावंड

विरुद्ध

कोणीही नाही

तमाम जनतेस नोटिसीने कळविणेत येते, सुनिल अनंत गावंड यांचे मृत्यु पश्चात खाली नमुद मिळकतीवर वरील अर्जदारांच्या व्यतिरीक्त अन्य कोणीही वारस नाहीत. असल्यास ही जाहीर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसात आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी दाखल करावी. अन्यथा वर नमुद अर्जदारांना तसा वारस दाखला देण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या कोणाच्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

| क्र. | मिळकतींचे वर्णन |
|---|---|
| १. | मौजे अलिबाग, ता.अलिबाग येथील, न.पा. अलिबागचे हद्दीतील सिटी सर्वे नं. ११४६, ११४६/१, ११४५सी/२, ११४५बी/२, ११४५बी/१, ११४५अे/२, के-११४५के/बी (स.नं.१४८/१अे) यावरील निवासी सदनिका क्र.बी/५, क्षेत्र ५९१ चौ फुट, पहिला मजला, ओमसागर कॉम्पलेक्स, ब्राम्हणआळी, त्यास न.पा.अलिबाग घर मिळकत क्र.ALB000001608 (जुना मालमत्ता क्र. १३४४/१B) सदरहू मिळकतीमधील ५०% अविभाज्य हिस्सा. |
| २. | मौजे वेश्वी, ता.अलिबाग, जि.रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ७४/१ एकूण क्षेत्र ०-३४-६० हे. आर., आकार ७.९५ पैसे या मिळकतीपैकी सुनिल अनंत गावंड यांच्या मालकीची ०-०२-५० हे.आर, आकार रु.०.६५ पैसे शेतजमीन मिळकत |
| ३. | मौजे सहाण ता.अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग २४५/१, क्षेत्र ०-१८-२०, पो.ख.०-०२-८० एकूण क्षेत्र ०-२१-०० हे. आर., आकार ४.३३ पैसे ही जमीन मिळकत व सदरच्या मिळकतीवर असलेले ग्रामपंचायत सहाण घर मिळकत क्र.३९०, क्षेत्र २५६ चौ. फुट |
| ४. | कार क्र. -MH-06/CD-6996 Grand I10 NIOS |
| ५. | मोटारसायकल क्र. MH-06/BJ-4289, UNICORN |
| ६. | मोटारसायकल क्र. MH-06/N-278, HERO HONDA |

सदरची नोटिस आज दि.२९/११/२०२५ रोजी सही व शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली.

**न्यायालयिन शिक्का**

**सही**
**वरिष्ठ/कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय**
**व.स्तर अलिबाग**

**सही/-**
**(सहाय्यक अधिक्षक )**
**दिवाणी न्यायालय**
**व. स्तर अलिबाग**


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५




## राशीभविष्य

- **मेष** : 'अति घाई, संकटात नेई' हे लक्षात ठेवा. विचारानं रहायला हवं. आप्तेष्टांकडून दिलासा मिळेल.
- **वृषभ** : दैनंदिन कामाचा ताण राहील. आर्थिक व्यवहारात फसवणूक संभवते. सरकारी कामं होतील.
- **मिथुन** : आर्थिक प्राप्तीचे नवे मार्ग सापडतील. आत्मविश्वास वाढीस लागेल. मानसिक स्वास्थ्य राहील.
- **कर्क** : ग्रहमानाची अनुकूलता राहील. खडलेल्या कामांना गती मिळेल. विद्यार्थ्यांना स्पर्धांमध्ये यश मिळेल.
- **सिंह** : नोकरीत बदलाचे प्रयत्न होतील. बेरोजगारांना दिलासा मिळेल. विवाहाचे प्रस्ताव मार्गी लागतील.
- **कन्या** : अकारण वादविवाद टाळवे. हितशत्रूंच्या कारवाया वाढीस लागतील. ताण-तणाव वाढतील.
- **तूळ** : प्रयत्नातील सातत्य कामी येईल. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राहील. व्यवसायात अनुकूलता लाभेल.
- **वृश्चिक** : आर्थिक बाबतीत दिलासा मिळेल. महत्त्वाचे करार मार्गी लागतील. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **धनु** : सरकारी कामं रखडतील. विवाहाच्या प्रयत्नात अडचणी येतील. भावंडांशी मतभेद टाळायला हवेत.
- **मकर** : महत्त्वाच्या घडामोडींमुळे दिलासा मिळेल. आध्यात्मिकतेकडे ओढा राहील. बाकी चिंता नसावी.
- **कुंभ** : प्रापंचिक प्रश्नांनी अस्वस्थ व्हाल. व्यवसायात समस्या संभवतात. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल.
- **मीन** : महत्त्वाचे निर्णय विचारानं घ्यावे. कारकिर्दीत महत्त्वाच्या संधी लाभतील. कलांचा विकास होईल.

## ३० नोव्हेंबर
दिनविशेष

- १८५८ : ज्येष्ठ भौतिकशास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस यांचा जन्म.
- १९१० : सुप्रसिद्ध कवी बा. भ. बोरकर यांचा जन्म दिवस.
- १९३५ : ज्येष्ठ लेखक आनंद यादव यांचा जन्म.
- २०१३ : कृष्णा नदीच्या पाणीवाटपाचा विवाद मिटवण्यासाठी स्थापलेल्या दुसऱ्या लवादाने अलमट्टी धरणाची उंची वाढवण्यास मान्यता दिली.
- २०१५ : दिल्ली अर्ध मॅरेथॉन शर्यतीत भारतीय गटात नितेंद्र रावत आणि ललिता बाबर यांना विजेतेपद.

## आता आले स्मार्ट कपडे
न्यू टेक

तंत्रज्ञानामुळे सध्या सगळं काही स्मार्ट होत आहे. माणसाच्या प्रत्येक समस्येवर तंत्रज्ञानाने उत्तर शोधलं आहे. आता हिवाळा सुरू झाला आहे. हळूहळू थंडी वाढत जाणार आहे. देशातल्या बऱ्याच भागांमध्ये पारा शून्य अंशांपेक्षाही खाली जातो. मग आपण थंडीपासून बचाव करणारे कपडे घालतो. स्वेटर, शाली, जॅकेट्स, मफलर, थर्मल वेअर असं बरंच काही घालावं लागतं. पण आता कॅनडामधल्या इंजिनिअर्सच्या एका टीमने स्मार्ट कपडे तयार केले आहेत. हे कपडे घातल्यानंतर मोबाईल ॲपचा वापर करून तापमान नियंत्रित करता येणार आहे. 'स्कीनकोर' असं या स्मार्ट कपड्यांचं नाव आहे. हे कपडे म्हणजे पूर्ण बाह्यांचा टी शर्ट आणि पँट आहे. या कपड्यांमध्ये ५६ ग्रॅमची बॅटरी बसवण्यात आली आहे. यामुळे आठ तासांपर्यंत कपडे गरम राहू शकतात. मोबाईलच्या चार्जरने ही बॅटरी चार्ज करता येते. या कपड्यांमुळे शरीराच्या विशिष्ट अवयवांना जास्त ऊब मिळते. शरीराचं तापमान वाढू लागलं की यातले सेंसर्स ऊब देणं बंद करतात. थंडी वाजायला लागली की सेंसर्सचं काम पुन्हा सुरू होतं. हे स्मार्ट कपडे घातले की इतर गरम कपडे घालण्याची गरज पडणार नाही.

## योजा काही सोपे उपाय
आरोग्यमंत्र

हल्ली अनेकांना युरिक ॲसिडचा त्रास सतावत असल्यामुळे त्यावर उपयुक्त ठरणाऱ्या काही घरगुती उपायांची माहिती आपण घेत आहोत.
✲ यासाठी आहारात आंबट चवीच्या फळांचा अवश्य समावेश असावा. सिट्रस फ्रूट्स युरिक ॲसिडचे खडे वा स्फटिकं वितळवून या त्रासदायक ॲसिडची शरीरातील पातळी कमी करण्यास मदत करतात. अर्थातच या फळांच्या सेवनाचा अतिरेक नको. ✲ पाण्यात छोटी वेलची मिसळून प्यायल्यानं शरीरातील युरिक ॲसिडचं अतिरिक्त प्रमाण कमी होतं तसंच कोलेस्टेरॉलची पातळीही कमी होईल ✲ ग्लासभर पाण्यात दीड चमचा बेकिंग सोडा मिसळून प्यायल्यास युरिक ॲसिड नियंत्रणात येण्यास मदत होते. ✲ ओव्याचं सेवन केल्यास युरिक ॲसिडच्या अतिरिक्त मात्रेसह शरीरातील सूज कमी करतो. युरिक ॲसिडचं प्रमाण नियंत्रित करण्यासाठी दिवसातून दोन ते तीन चमचे ओवा खावा. ✲ सफरचंदातील घटक युरिक ॲसिड नियंत्रित करतात. म्हणून हा त्रास असणाऱ्यांनी दररोज एक सफरचंद खायला हवं. ✲ लिंबाचा रस युरिक ॲसिडचं वाढतं प्रमाण नियंत्रित करतो. म्हणूनच सकाळी रिकाम्या पोटी लिंबूचा रस पिण्याचा चांगला फायदा होतो. दिवसातून किमान चार-पाच वेळा लिंबू-पाणी प्यायल्यासही हा त्रास कमी होण्यास मदत होते. ✲ चेरी आणि डार्क चेरीमध्ये फ्लेव्होनॉइड्स नावाचे घटक असतात. यामुळे युरिक ॲसिड्मुळे होणारा शारीरिक त्रास कमी करण्यास मदत होते.



## ऑफिसमध्ये स्मार्ट दिसा
फॅशन पॅशन

✲ चुडीदारपेक्षा सलवार आरामदायी असते. सलवारमुळे हालचाल करणं सोपं जातं. यातही वेगवेगळे प्रकार उपलब्ध आहेत. पटियाला सलवार घालता येईल. एम्ब्रॉयडरीवाल्या कुर्त्यांवर प्लेन सलवार शोभून दिसेल. बारीक चणीच्या युवती पटियाला पँट घालू शकतात. स्लिट पँटवरही कुर्ते शोभून दिसतात. ✲ सलवार घालण्याचा कंटाळा आला असेल तर पलाझो किंवा सिगारेट पँट हा सुद्धा चांगला ऑप्शन आहे. लांब कुर्त्यांसोबत या प्रकारचे बॉटम्स छान दिसतात. ✲ ऑफिसमध्ये फॉर्मल कपडे घातले जात नसतील तर तुम्ही जीन्सवर कुर्ते घालू शकता. जीन्ससोबत शॉर्ट कुर्ते छान दिसतात. ✲ ऑफिसमध्ये साडीही नेसता येईल. कॉटन, जॉर्जेट, शिफॉन आणि क्रेप साड्या ऑफिसमध्ये छान दिसतात. ✲ ऑफिसमध्ये छानशी पादत्राणं कॅरी करता येतील. कोल्हापुरी चप्पल, मोजडी, चप्पल्स खूप छान दिसतात. वेगवेगळ्या रंगाच्या आणि पॅटर्नच्या चप्पल कॅरी करता येतील.

### पंचांग

रविवार, ३० नोव्हेंबर २०२५
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, मार्गशीर्ष शु. १०, चंद्रराशी : मीन, नक्षत्र : उ. भाद्रपदा, योग : वज्र, सिद्धी, सूर्योदय ६.५७, सूर्यास्त ५.५८

### फॉरवर्ड्स

ताल्लुकात की कीमत चुकाते रहते हैं...

उनके झुठ पर भी मुस्कुराते रहते हैं...!

### फॅशन पॅशन

दोस्तांनो, आता थंडी जाणवू लागली आहे. थंडीमध्ये स्वेटर्स, स्वेटशर्टस, जॅकेट्स, स्कार्फ, कोट बाहेर पडतात. अशाच विविध प्रकारच्या कपड्यांचा वापर करून तुम्ही स्टायलिश दिसू शकता.
✲ लेअरिंग हे हिवाळ्यातल्या स्टायलिंगचं गमक आहे. कार्डिगन्स, डेनिम शर्टस, स्कार्फ, लाईट जॅकेट्स, हुडीज, ब्लेझर आणि विंड ब्रेकर्सचा खुबीने वापर करता येईल. स्लीव्हलेस जॅकेट्सचा ट्रेंड सध्या जोरात आहे. खूपच थंडी असेल तर ग्लोव्ह्ज घालता येतील. हॅट, कॅप्समुळेही तुमचा लूक उठून दिसेल. (क्रमश:)

## गुंतवणूक क्षेत्रातील संधी
करिअरवाटा

आजकाल गुंतवणुकीबाबत बऱ्याच प्रमाणात जागरूकता निर्माण झाली आहे. त्यात शेअर बाजार, म्युच्युअल फंडातील गुंतवणुकीकडे कल वाढताना पहायला मिळत आहे. देशात तसंच जगभरात अनेक स्टॉक एक्स्चेंज आहेत. त्यांद्वारे दररोज अरबो रुपयांच्या देव-घेवीचे व्यवहार केले जातात. इतक्या मोठ्या व्यवहाराच्या, विस्तारलेल्या क्षेत्रात कारकिर्दीच्याही विपुल संधी उपलब्ध आहेत. त्यादृष्टीने विविध फायनान्शियल कोर्सेस उपलब्ध आहेत. हे अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्यांना बँकांमध्ये इन्व्हेस्टमेंट बँकर्स, रिलेशनशीप मॅनेजर आदी पदांवर काम करण्याची संधी मिळते. या शिवाय इन्शुअरन्स कंपन्यांमध्ये वेल्थ मॅनेजर व्यतिरिक्त ॲनालिस्ट, पोर्ट फोलियो मॅनेजर, सर्व्हिलान्स, कंम्प्लायन्स, रेग्युलेशन मॅनेजर, डिजिटल कंटेन्ट डेव्हलपर्स तसेच रिस्क मॅनेजर अशा विविध पदांवर काम करणं शक्य होतं. या क्षेत्रात सुरुवातीस ॲनालिस्ट म्हणून काम करण्याची संधी दिली जाते. या क्षेत्रातील अनुभव येण्यासाठी ॲनालिस्टची असोसिएट या पदावर नियुक्ती केली जाते. असोसिएट म्हणून उत्तमरित्या जबाबदारी पार पाडल्यावर व्हाईस प्रेसिडेंट म्हणून पदोन्नती मिळू शकते. पुढे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर आणि मॅनेजिंग डायरेक्टर अशा पदांवर पदोन्नती होत जाते. या क्षेत्रात कारकिर्दीची सुरुवात करण्यासाठी कोणत्याही कंपनीच्या माध्यमातून करणं उचित ठरेल.



## नको म्हणताना
खेचाखेची

आपल्याकडे एखाद्या गोष्टीला नको कसं म्हणतात?

१. बघुया काय होतं
२. थोड्या वेळाने सांगतो
३. घरी विचारावे लागेल
४. काही नक्की नाही
५. हे इथेच राहू द्या, मी परत येतो...

### वेगळं काही

अमेरिकेतल्या डर्बी शहरातल्या वॉलमार्टमध्ये खरेदी करणाऱ्या लोकांना एक वेगळाच अनुभव आला. इथे नेहमीप्रमाणेच लोक खरेदीसाठी आले होते. त्याच वेळी इथे आलेल्या प्रत्येक ग्राहकाचं बिल आपण भरणार असल्याचं एका माणसाने जाहीर केलं. ही घोषणा ऐकल्यानंतर सर्वांच्या चेहऱ्यावर आश्चर्याचे भाव उमटले. ही व्यक्ती कोण आहे, असा प्रश्न सर्वांना पडला. त्या व्यक्तीने आपण सांताक्लॉज असल्याचं सर्वांना सांगितलं. या व्यक्तीने आपली ओळख सांगितली नाही. पण सांताक्लॉज बनून त्याने सर्वांची बिलं चुकती केली. ख्रिसमसच्या आधीच या सांताक्लॉजने सर्वांना भेटी दिल्या. हा माणूस कोण होता? आणि त्याने असं का केलं असावं, हे अजून गुलदस्त्यातच आहे.

## आधार उपयुक्त ॲप्सचा
जाणून घ्या

सध्याचा जमाना स्मार्टफोनचा आहे. त्यामुळे अनेक बाबी सुकर झाल्या आहेत. स्मार्टफोनच्या वापरात महिलाही मागं नाहीत. त्यादृष्टीने विचार करायचा तर सध्या वेगवेगळी बिलं भरण्यापासून दैनंदिन आयुष्याचं नियोजन करण्यापर्यंतच्या बहुसंख्य कामांसाठी ॲप्स उपलब्ध आहेत. शिवाय आरोग्य, सुरक्षा, मनी मॅनेजमेंट, पालकत्व याबाबतची ॲप्स डाऊनलोड करू शकता. अशा उपयुक्त ॲप्सविषयी...
✲ मासिक पाळीशी संबंधित समस्या जाणून घेण्यासाठी तसंच त्यावर लक्ष ठेवण्यासाठी पिरिएड्स ट्रॅकर ॲप्स आहेत. गुगल प्ले स्टोअरवर अशी ॲप्स सापडतील. नेमकी गरज ओळखून योग्य ॲप डाउनलोड करता येईल.
✲ गरोदरपणाच्या काळात कोणती काळजी घ्यावी, इंजेक्शन्सच्या वेळा कोणत्या, बाळाची प्रगती नीट होत आहे ना या प्रश्नांची उत्तरं स्वतंत्र ॲप्समध्ये मिळू शकतात. अशा ॲप्सच्या माध्यमातून डॉक्टरांच्या संपर्कात राहता येतं.
✲ सहलीच्या ठिकाणाची माहिती मिळवण्यापासून विमान, ट्रेनची तिकिटं बुक करण्यापर्यंत प्रत्येक गोष्ट ॲपच्या साहाय्याने होऊ शकते. अशी ॲप्स डाऊनलोड करावी. यामुळे सहलीच्या योजना आखताना इतरांची मदत घ्यावी लागणार नाही.



## सुडोकू ३५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | २ | | ८ | | ५ | | | |
| ५ | | | | | ७ | २ | | |
| | ३ | ७ | ९ | | २ | | | |
| ८ | | | | | | ५ | ३ | ६ |
| ७ | | | | १ | | | | ४ |
| ६ | ९ | ३ | | | | | | २ |
| | | | ४ | | १ | ३ | २ | |
| | | ४ | ३ | | | | | १ |
| | | | २ | | ६ | | ४ | ९ |

टीप -
✲ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✲ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✲ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ३४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ७ | ४ | ५ | ९ | ३ | २ | ८ | १ |
| १ | ९ | ३ | ६ | २ | ८ | ५ | ७ | ४ |
| ५ | २ | ८ | ७ | १ | ४ | ६ | ३ | ९ |
| ४ | ६ | ५ | ८ | ३ | २ | ९ | १ | ७ |
| ९ | ८ | २ | ४ | ७ | १ | ३ | ६ | ५ |
| ३ | १ | ७ | ९ | ६ | ५ | ८ | ४ | २ |
| २ | ४ | ९ | १ | ८ | ६ | ७ | ५ | ३ |
| ८ | ३ | १ | २ | ५ | ७ | ४ | ९ | ६ |
| ७ | ५ | ६ | ३ | ४ | ९ | १ | २ | ८ |

## शब्दकोडे क्रमांक ३५

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ३ | | ४ | ५ | | | ६ | | ७ | ८ |
| | | | | | | ९ | | | १० | | | ११ | |
| १२ | १३ | | १४ | | १५ | | | १६ | | | | | |
| १७ | | | १८ | १९ | | २० | | | | | २१ | | २२ |
| | | | | २३ | | | | | | २४ | | | |
| २५ | | | २६ | | | २७ | २८ | | २९ | | | ३० | |
| | | | | | ३१ | | | | | | | | |
| ३२ | | | | | | | | ३३ | | | | | |
| | | | | | ३४ | | | | | | ३५ | | |
| ३६ | | ३७ | | ३८ | | | | | | ३९ | | | |
| ४० | | | | ४१ | | | | | ४२ | | | ४३ | ४४ |
| | | ४५ | ४६ | | | | | ४७ | | | | ४८ | |
| ४९ | ५० | | | | ५१ | | ५२ | | | | ५३ | | |
| | | | ५४ | | | | | | | | ५५ | | |

**आडवे शब्द :-**
१) सांगा कसं जगायचं सारं काही स्वत:साठी सलाम ह्या कवितांचा कवी, ज्यांचे नुकतेच निधन झाले
६) द्वेष, सूडाची भावना
९) मच्छर
१०) मूल, बालक
११) भूपती
१२) श्रीरामाचे वडील
१५) इंद्राणी, इंद्राच्या पत्नीचे नाव
१६) झाड किंवा दूषण लावणे १७) पद्धत
१८) रममाण, निमग्न
२०) त्वचेचा पापुद्रा
२१) उसाचा रस काढण्याचे यंत्र
२३) खिशातील चौकोनी वस्त्र
२४) निवासस्थान
२५) तीर कमान
२७) भटक्या, न भिता रात्री भटकणारा
३१) हाताचा कोना
३२) स्वीकारणे
३३) गीत
३४) कमीतकमी
३५) उंच-सखल नसलेले
३७) पादत्राण
३९) लोकांचा घोळका
४०) अंगारखा
४१) प्रेत
४२) पावसाची झड
४३) शरम
४५) तळपायाचा एक भाग
४७) चांदणी
४८) नियम, व्रत, लक्ष्य
४९) नगारा वाजविणारा
५२) सकटनिकट, न निवडता एकत्र.
५४) कमालीची शुष्कता
५५) धावणे.

**उभे शब्द :-**
१) रावणाच्या पत्नीचे नाव
२) नगर
३) झाकणाचे पात्र
४) नसता संबंध जोडणे (वा.प्र.)
५) सत्वांश
६) कडबा चारा इ.गुरांचे खाणे
७) पुष्कळ
८) गणितातील उणे
१०) बोलणारा पक्षी
१३) अनेक शतके
१४) एकावर एक रचलेले, स्तर
१६) रोपे तयार करण्याचा मळा
१९) युवक
२१) पदार्थ ढवळण्याचे छोटे साधन
२२) हृदय (हिं.)
२४) पात्याचे तीक्ष्णता
२६) वावडी
२८) पंख, दुसरा
२९) वरपांगी
३०) अत्यंत हळू हळू
३३) दुष्ट, भांडखोर
३५) पूर्ण ऐक्य
३६) रसाळ, रसपूर्ण
३७) विश्वातील सर्व भाग
३८) सततचा मागणीचा हट्ट
३९) सोन्याचा धागा
४२) मध्यम प्रमाण
४४) जमा करणे, गोळा करणे
४६) बुद्धिबळातील प्रधान
४७) धातूचा धागा
५०) गोमाता
५१) वजन
५२) मोठी उथळ वाटी
५३)गाडीचे छत.

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | ज | ता | गा | य | त | | न | म | स्का | र | | ध | नी |
| म | ग | र | | म | नु | ष्य | ग | ण | | सा | च | णे | |
| दा | | क | म | ल | जा | | र | का | ना | | रा | | रा |
| र | स | | श | | | कृ | पा | | च | र | च | री | त |
| | म | न | क | व | डा | | ल | स | णी | | र | | सा |
| र | ज | त | | न | ल | द | | दा | | गो | | भा | र |
| स | दा | | वा | च | न | | वा | स | व | | वे | | |
| वा | र | स | दा | र | | स | | र्व | | सा | डे | सा | ती |
| न | | र | वा | | दा | सा | नु | दा | स | | वा | | |
| | वा | | दी | न | वा | णा | | यो | | चा | क | व | त |
| ज | न | क | | व | न | | स | ग | ळी | क | डे | | ड |
| ना | र | ळ | | नी | ल | म | | तु | | र | | पो | क |
| बा | | प | रा | त | | | मा | झा | | मा | ल | | सा |
| ई | सा | | जा | | स | म | ता | | ध | नी | | खा | र |

**आज आर्थिक अडचणींमुळे कुटुंबांना निव्वळ जगण्यासाठीही कर्ज घ्यावे लागत आहे. शहरी गरिबांचे जीवन नेहमीच अनिश्चित राहिले आहे; परंतु आता कनिष्ठ मध्यमवर्ग अडचणीत सापडत आहे. घरभाडे, किराणा सामान, शाळेची फी, वाहतूक आणि वैद्यकीय सेवा उत्पन्न यावरील वाढत्या खर्चामुळे पगारदार व्यक्तींनाही जगण्यासाठी कर्ज घ्यावे लागते. त्यामुळे राहणीमानावर होणारा खर्च हे भविष्यातील नाही, तर सध्याचे संकट आहे.**

# शहरे महाग, जनता गरीब





**कैलास ठोळे**

लाखो लोक दैनंदिन जीवनात सततच्या आर्थिक तणावाचा सामना करत आहेत. भारतीय कुटुंबांना दीर्घकाळापासून सावध बचत करणारे मानले जात होते. ते विक्रमी पातळीवर कर्ज घेत आहेत. रिझर्व्ह बँकेच्या आर्थिक स्थिरता अहवालानुसार, भारतातील घरगुती कर्ज २०२४ च्या अखेरीस जीडीपीच्या ४२ टक्क्यांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. २०१५ मध्ये हा आकडा सुमारे २६ टक्के होता. सरासरी दरडोई कर्ज फक्त दोन वर्षांमध्ये २३ टक्क्यांनी वाढले आहे. ते राष्ट्रीय उत्पन्नाच्या दुप्पट दराने वाढले आहे. २०२३ मध्ये ३.९ लाख रुपयांवरून मार्च २०२५ मध्ये ४.८ लाख रुपयांपेक्षा अधिक झाले आहे. या कर्जामध्ये अंदाजे ५५ टक्के रक्कम क्रेडिट कार्ड देयके, वैयक्तिक कर्जे, वाहन कर्जे आणि सोने कर्जे यासारख्या अनिवासी किरकोळ कर्जांचा समावेश आहे, तर पारंपारिक गृह कर्जे एकूण घरगुती कर्जाच्या फक्त २९ टक्के आहेत. शिक्षण, गृहनिर्माण किंवा लहान व्यवसायांसाठी घेतलेले कर्ज भविष्यातील संपत्ती निर्माण करतात; परंतु उपभोगासाठी घेतलेले कर्ज उत्पादक नसते. कुटुंबे आपल्या उत्पन्नाचा जास्त भाग वैयक्तिक कर्जे आणि क्रेडिट कार्ड बिल भरण्यासाठी खर्च करत असल्याने अनेकांकडे बचत किंवा गुंतवणूक करण्यायोग्य पैसे शिल्लक राहत नाहीत. किराणा सामान, वीज बिल, शाळेची फी किंवा आरोग्यसेवा यासारख्या दैनंदिन खर्चासाठी कर्ज घेणाऱ्यांची संख्या वाढत आहे. शहरी राहणीमानाचा खर्च वाढत आहे आणि कर्ज या खर्चांचा सामना करण्याची यंत्रणा बनले आहे. आणखी एक चिंताजनक घटक म्हणजे घरगुती आर्थिक बचतीतील घट. सध्याची जीवनशैली टिकवून ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात कर्ज घेत असल्याने पगारदार तसेच तरुणांमध्ये बचतीचे प्रमाण कमी रहात आहे.

एका 'आयआयटीयन'ने अलीकडेच 'एक्स'वर पोस्ट केले होते, की भारतात राहणीमानाचा खर्च वाढत आहे. अगदी लहान, टियर-३ शहरांमध्येही हे होत आहे. निम्न आणि मध्यम वर्ग कसे जगतील किंवा पुढील काही वर्षांमध्ये कसा टिकाव धरतील, असा प्रश्न आहे. अशा वेळी फक्त मूलभूत फळे, भाज्या आणि दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंना मागणी असेल. आपल्याकडे मूलभूत गरजेच्या काही बाबी फारच जास्त महाग वाटतात. हे संकट भारतातील एक प्रमुख राजकीय मुद्दा का नाही? सामान्य, कष्टकरी भारतीयांच्या दैनंदिन चिंता कोण समजून घेत आहे? प्रश्न अनेक आहेत, पण समाधानकारक उत्तर मिळत नाही. अलिकडेच न्यूयॉर्क शहरात, जोहरान ममदानी महापौरपदाची निवडणूक जिंकले. सत्तेत असलेले बहुतेक भारतीय राजकारणी टाळतात, तेच त्यांनी केले. त्यांनी या संकटावर प्रकाश टाकला. त्यांची मोहीम न्यूयॉर्कच्या कामगार वर्गाच्या भौतिक वास्तवांभोवती बांधली गेली होती. स्थिर भाडे, सार्वत्रिक बालसंगोपन, मोफत सार्वजनिक बसेस, शहरात चालवल्या जाणाऱ्या किराणा दुकाने आणि श्रीमंतांवर जास्त कर या त्यांच्या मागण्या होत्या. ममदानींची अल्पसंख्य ही ओळख (भारतीय वंशाचा युगांडात जन्मलेला मुस्लिम) त्यांच्या मोहिमेच्या यशात एक महत्त्वाचा घटक होता. यामुळे मुस्लिम, दक्षिण आशियाई आणि स्थलांतरितांसारख्या कमी प्रतिनिधित्व असलेल्या गटांमधील मतदार एकत्र आले; परंतु २०२५ च्या न्यूयॉर्क शहराच्या महापौरपदाच्या निवडणुकीमध्ये ते त्यांच्या विजयाचे एकमेव कारण नव्हते. ते जिंकले. कारण ते त्यांच्या मतदारांच्या आर्थिक दुःखाबद्दल बोलले आणि त्यांच्या योजनांची रूपरेषा स्पष्ट करणारा अजेंडा सादर केला.

भारतात झालेली यासंदर्भातील चर्चा ममदानी यांच्या संबंधांवर आणि ओळखीवर केंद्रित आहे, तर राहणीमानाच्या खर्चाची धाडसी आणि स्पष्ट चर्चा त्यांच्या मोहिमेचा गाभा होती. भारताला ममदानींच्या सूत्राची नक्कल करण्याची गरज नाही. आपल्या शहरांची वेगळी ओळख असून स्वतःच्या मर्यादा आणि राजकीय संस्कृतीही आहेत. ममदानी आणि त्यांना निवडून देणाऱ्या मतदारांकडून आपल्याला प्रचारातील प्रामाणिकपणा शिकण्याची गरज आहे. त्यांनी कोणतेही टाळाटाळ करणारे डावपेच वापरले नाहीत. त्यांनी अस्पष्ट आश्वासने दिली नाहीत. त्यांनी संकटाला तोंड दिले, संभाषण सुरू केले आणि निर्वाहाच्या संकटाला राजकीय अजेंड्याचा केंद्रबिंदू बनवले. भारताकडे याचाच अभाव दिसतो. आता ममदानीनाही अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागेल. प्रचारापेक्षा शासन करणे अधिक कठीण असते. भारतीय शहरी राजकारण जे करण्यात अयशस्वी ठरले आहे, ते त्यांनी आधीच केले आहे. त्यांनी राहणीमानाचा खर्च हा एक कायदेशीर, तातडीचा आणि मध्यवर्ती मुद्दा बनवला आहे. त्यांनी आर्थिक दुःख ही सार्वजनिक चिंता मानली, ते वैयक्तिक ओझे मानले नाही. भाडे, अन्न, इंधन आणि वेतन याबद्दल स्पष्टपणे बोलणारे उमेदवार जगभरातील लोकांमध्ये प्रतिध्वनी बनत आहेत.

याच सुमारास भारतात रिझर्व्ह बँकेने उघड केले आहे, की लहान कर्जदार दैनंदिन खर्च भागवण्यासाठी कर्ज घेत असताना मोठे कर्जदार कर्ज घेऊन मालमत्ता बांधत आहेत. मोठे कर्जदार विशेषतः घरांसाठी कर्ज घेत आहेत. या लोकांचा क्रेडिट स्कोअर ७२० च्या वर आहे, तर लहान कर्जदारांचा स्कोअर ७२० च्या खाली आहे. रिझर्व्ह बँकेने आपल्या आर्थिक स्थिरता अहवालात म्हटले आहे, की गेल्या तीन वर्षांमध्ये भारतीय घरगुती कर्ज वाढले आहे. हे प्रामुख्याने कर्जदारांच्या संख्येत सतत वाढ झाल्यामुळे आहे. जून २०२४ मध्ये भारतीय घरगुती कर्ज जीडीपीच्या ४२.९ टक्के होते. हे इतर उदयोन्मुख देशांपेक्षा लक्षणीयरीत्या कमी आहे. अहवालानुसार, भारतात घेतलेल्या वैयक्तिक कर्जाचे मुख्य प्रकार म्हणजे वैयक्तिक कर्जे, क्रेडिट कार्ड, ग्राहकोपयोगी वस्तू, वाहने, दुचाकी, शिक्षण, शेती यासाठी घेतलेले आणि गृहकर्ज. उच्च श्रेणीतील कर्जदारांमध्ये दरडोई कर्जात वाढ आणि मालमत्ता निर्मितीसाठी कर्जाचा वापर यामुळे आर्थिक स्थिरता वाढण्याची अपेक्षा आहे, मात्र सामान्यजनांच्या एका कर्जाची परतफेड न झाल्यास सर्व कर्जे एनपीए होऊ शकतात. वैयक्तिक कर्ज किंवा क्रेडिट कार्ड बिल परतफेड करण्यात अयशस्वी झालात तर गृहकर्ज किंवा कार कर्जदेखील अडचणीत येऊ शकते. रिझर्व्ह बँकेच्या अहवालानुसार लहान कर्जावर थकबाकी दिली, तर बँका तुमच्या सर्व कर्जांना एनपीए मानू शकतात. बहुतेक थकबाकी वैयक्तिक कर्जे आणि क्रेडिट कार्डसारख्या असुरक्षित कर्जांमध्ये आहे. ज्यांनी या लहान कर्जांसह घरे किंवा कारसाठी मोठी कर्जे घेतली आहेत, त्यांना जास्त धोका आहे.

आज चीनचे सार्वजनिक कर्ज १४० टक्के इतके सर्वाधिक आहे. जागतिक स्तरावर, २०२४ च्या अखेरीस सार्वजनिक कर्ज जीडीपीच्या ९३ टक्के होईल. याचा अर्थ ते शंभर ट्रिलियन डॉलर्सच्या पुढे जाईल. ३० जून रोजी चीनचे कर्ज ते जीडीपी प्रमाण १४० टक्के होते, तर जपानचे १२० टक्के होते. उदयोन्मुख बाजारपेठा आणि युरोझोनचे कर्ज ते जीडीपी प्रत्येकी शंभर टक्के होते, विकसित देश ९० टक्के, अमेरिका ८५ टक्के, ब्रिटन ७०टक्के तर भारत ४३ टक्के होते. अनेक कर्जे घेणारे कर्जदार क्रेडिट कार्ड आणि वैयक्तिक कर्ज असलेल्या जवळजवळ अर्ध्या कर्जदारांकडे आधीच दुसरे किरकोळ कर्ज आहे. ही कर्जे बहुतेकदा गृहनिर्माण, वाहने किंवा दोन्हीसाठी मोठी असतात. या मोठ्या, सुरक्षित कर्जांपेक्षा लहान वैयक्तिक कर्जांना एनपीएचा धोका जास्त असतो. सर्वात जास्त डिफॉल्ट दर असुरक्षित कर्जांसाठी असतात. वैयक्तिक कर्जे किंवा क्रेडिट कार्ड शिल्लक व्यतिरिक्त इतर किरकोळ कर्जे असलेल्या कर्जदारांमध्ये डिफॉल्टचा धोका जास्त जोखीम हाताळण्यासाठी उचललेली पावले रिझर्व्ह बँकेने अलीकडेच बँका आणि एनबीएफसींसाठी कोणत्याही संभाव्य जोखमींना तोंड देण्यासाठी असुरक्षित कर्जांसारख्या काही किरकोळ कर्जांवर उच्च जोखीम वजन लादले आहे. यापैकी जवळजवळ दोन तृतीयांश कर्जे चांगल्या क्रेडिट गुणवत्तेची आहेत. पन्नास हजार रुपयांपेक्षा कमी वैयक्तिक कर्ज असलेल्या ११ टक्के कर्जदारांपैकी ६० टक्क्यांपेक्षा जास्त कर्जदारांनी २०२४-२५ मध्ये तीनपेक्षा जास्त वेळा कर्ज घेतले आहे. यातूनच शहरे वाढली पण लोक कर्जबाजारी तसेच गरीब झाले, असे म्हणता येते. ●●

---

**पुन्हा एकदा दुसऱ्या कसोटीमध्ये दक्षिण आफ्रिकेकडून आपल्या भारतीय क्रिकेट चमूचा दारुण पराभव झाला. असे वाटले होते की भारतीय क्रिकेट चमू कमबॅक करेल, पण आपल्या सर्व १४० कोटी जनतेच्या आशेवर पाणी फेरले गेले. ह्याला करणे कदाचित वेगवेगळी असतीलही. सध्या खूप मोठ्या टीकेच्या झोड उठत आहेत आणि हे साहजिकसुद्धा आहे. कारण की, आपल्या भारत देशात क्रिकेटवर प्रेम करणारे पूर्वीपासून फार अधिक आहेत.**

# अतिक्रिकेटमुळे तारांबळ

**अरविंद मोरे**




पूर्वी फार क्रिकेट खेळले जात नसे. जे पण खेळले जात होते ते भारत देशासाठी खेळले जात होते. त्यात कसोटी क्रिकेट आणि वनडे क्रिकेटचा अंतर्भाव होता आणि संपूर्ण लक्ष्य ह्या दोन खेळांवर राहायचे आणि हीच प्राथामिकता ही सर्वांची होती. परंतु आता तसे नाही. जेव्हा पासून आय.पी.एल.चा उदय झाला तेव्हापासून भारतीय क्रिकेटचा चेहरा मोहराच बदलला. आता प्राथमिकता ही आय.पी.एल. ला दिली जाते. कारणही तसेच आहे ते म्हणजे पैसा आणि प्रसिद्धी. एक वेळ क्रिकेट खेळाडूला कसोटी क्रिकेट किंवा वनडे क्रिकेटमध्ये वर्णी नाही लागली तर वाईट वाटणार नाही. परंतु त्याचे आय.पी.एल. खेळणे हे प्राधान्य आणि स्वप्न असते. इथे कुठेतरी देशाभिमान कमी पडतो आहे, असे दिसते आहे.

दुसरे कारण हे आहे की क्रिकेट हे अति झाले आहे. सतत क्रिकेटचा हंगाम सुरु असतो. त्यामुळे क्रिकेटपटुंवर शारीरिक आणि मानसिक अधिक ताण पडतो आहे आणि ह्याच कारणांमुळे आपल्या भारतीय क्रिकेट टीमने सध्या जबरदस्त मार दक्षिण आफ्रिकेकडून खाल्ला आहे.

सध्याचे युग हे जलद युग, वेगवान युग आहे. सर्वांना अगदी फास्ट हवं असतं. प्रत्येक प्रकारात अति गती निर्माण झाली आहे. पूर्वी पासूनच क्रिकेट हे फार मोजकेच देश खेळायचे कारण हेच होते की ह्या खेळाला पाच दिवस लागतात हा खेळ खूपच रटाळ आहे, कंटाळवाणा आहे. आता ह्या खेळात पण गती आली आहे. वनडे वरून हा खेळ २०-२० पर्यंत गेला. जसा हा खेळ वेगवान झाला त्याला प्रसिद्धी निर्माण झाली त्यात गोडी निर्माण झाली. हा खेळ खूपजणांना आवडू लागला आहे. ह्या धकाधकीच्या युगात मूळ कसोटीचा खेळ कुठे तरी मागे राहून गेला आणि आता क्रिकेट म्हणजे वनडे किंवा २०-२० हेच समजू लागलो. आता तर वनडे सुद्धा कंटाळवाणे होऊ लागलेत. आता फक्त २०-२० लाच अधिक पसंदी दिल्या जात आहे. ह्या २०-२० चे लोक अक्षरशः खूप दिवाने झाले आहेत.

अगोदर दोन इंनिंग्जसचा खेळ असायचा आता सगळीकडे मर्यादित षटकांच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात. त्यामुळे प्रत्येक क्रिकेट खेळाडूला आपले स्थान निश्चित ठेवण्यासाठी त्याला जलद गतीनेच क्रिकेट खेळावे लागत आहे. मुळात त्याला आता संयमाचा राहिलेला नाही. संपूर्ण क्रिकेट आता बदललेले आहे. कालपर्यंत आपली विकेट वाचविण्यासाठी क्रिकेट खेळल्या जात होत आता मात्र प्रत्येक चेंडू हा चौकार किंवा षटकार मारण्यासाठी खेळल्या जातं. कालपर्यंत आपण आऊट तर होणार नाही ही भीती होती आता मात्र फक्त फटाके मारणे हाच प्रकार राहिलेला आहे.



अगोदर पासूनच सर्व प्रकारात साधारणतः एकच टीम असायची. एखादा दुसरा बदल झाला तरच नाही तर मग टेस्ट, वनडे आणि २०-२० ला मात्र एकच टीम असायची. आता ह्या सर्व प्रकारात मात्र क्रिकेटपटूंची बरीच दमछाक व्हायला दिसते आहे. पूर्वी एव्हढा क्रिकेटचा सिझन नसायचा. आता मात्र बरेच सिझन असतात. ह्या तिन्ही फॉरमॅट मध्ये खेळायचे म्हणजे एक टीम असल्यामुळे बराच ताण खेळांडूंवर येतांना दिसत आहे. त्यांची एकग्रहता सुद्धा भंग पावते. त्यांना स्विच ओव्हर करायला कठीण जातं. ह्यात बरेच खेळाडू बऱ्याचदा गोंधळलेले आपल्याला आढळून येतात. कधी कधी चाटपटत असतात.

हल्ली बरीच मुलं क्रिकेट खेळायला लागली आहेत. अगदी शालेय जीवनापासून शालेय स्पर्धा आणि अकॅडमीत सुद्धा खेळताना दिसत आहे. पालक आणि मुलं दोघे पण ह्या खेळात रुची घेत आहे. लोकांमध्ये एक जागरूकता क्रिकेट विषयी आली आहे. काही तर करिअर सुद्धा ह्यात निवडण्याचे धाडस करीत आहेत. आता ग्रामीण भागात खेडोपाडी क्रिकेट गेले आहे आणि ज्यांना ज्यांना संधी मिळाली आहे त्यांनी संधीचे सोने केले आहे. ग्रामीण भागात खूपच खेळांडूंमध्ये गुणवत्ता आढळत आहे.

आपला देश १४० कोटी लोकसंख्येचा आहे. ह्यातून अकरा खेळाडूंची निवड करणे म्हणजे खूपच कठीण आणि जटील आहे. ह्यात खूप स्पर्धा निर्माण झाली आहे, अगोदर पण होतीच. पण आता फार अवघड असे काम झाले आहे. बरेच खेळाडूंचे स्वप्न प्रतीक्षा पाहूनच स्वप्न स्वप्नच राहिलेले आहे. बरेच खेळाडूमध्ये गुणवत्ता असून सुद्धा प्रतीक्षा करून करून त्यांचे आयुष्य गेलं आहे.

आपल्या भारत देशाने क्रिकेट विश्वात खूप मोठी प्रगती केली आहे, नाव कमविले आहे. खरोखर त्यांची प्रगती प्रशंसनीय आहे. खरोखर आपल्या भारत देशाला प्रगती करायची असेल, अपराजित राहायचे असेल तर भारताच्या तिन्ही फॉरमॅट मध्ये वेगवेगळ्या टीम असल्या पाहिजे. ह्या तिन्ही चमू आपापल्या प्रकारात अगदी निष्णात असतील. जसेकी, कसोटीवाली टीम, वनडेवाली टीम आणि २०-२० वाली टीम.

कसोटीवाली कसोटी खेळेल, वनडेवाली टीम वनडे खेळेल आणि २०-२० वाली २०-२० खेळेल. म्हणजे सध्या एकाच टीमवर ताण पडणार नाही त्यांना स्विच ओव्हर करण्यामध्ये त्रास होणार नाही. सर्वात महत्वाचे म्हणजे तिन्ही टीम मिळून किमान ३६ खेळाडू तयार असतील. ३६ क्रिकेटपटूंना आपले टॅलेंट दाखविण्यासाठी संधी मिळेल. सोबतच तरुणाईला चांगला रोजगारसुद्धा मिळेल.

टेस्ट मॅचसाठी सुनील गावस्कर, गुंडाप्पा विश्वनाथ, राहुल द्रविड व व्ही.व्ही.एस. लक्ष्मण सारखे चिवट फलंदाज एक भिंत म्हणून उभी राहील. तर दुसरीकडे युवराज सिंग, महेंद्रसिंग धोनी, सूर्यकुमार यादव, यशस्वी जैस्वाल, रवींद्र जडेजा, ऋषभ पंत व वैभव सूर्यवंशी सारखे तडफदार, चपळ तुफानी फटकेबाजी करणारे फलंदाज मिळतील. अगोदर कसा एकच डॉक्टर असायचा तोच सर्व रोग बरे करायचा आता मात्र प्रत्येक अवयवांना वेगवेगळे डॉक्टर आहेत. अगदी तसेच कसोटी, वनडे आणि २०-२० क्रिकेटची तज्ज्ञाचे चमू असतील जेणेकरून आपली भारतीय क्रिकेट टीम ही विश्वात अव्वल व अपराजित असेल. नाहीतर मग सारखे धक्के बसतच राहतील. ●●

---

# मराठी उमेदवार काळाची गरज



**निलेश साठे**

महाराष्ट्रातील राजकारणामध्ये केवळ मराठी उमेदवारच असावेत यासाठी मोठ्या प्रमाणावर काही समाजसेवकाकडून जनमत तयार केले जात आहे. आणि ते योग्य ही आहे. महाराष्ट्रातील राजकारणात कुठल्याही पक्षाने परप्रांतियांना तिकीट देऊ नये. कदाचित काही व्यक्ती चांगल्या असू शकतात. त्यांना महाराष्ट्राचं भलेही करायचं असेल, परंतु म्हणतात ना मुलीला माहेर नेहमीच प्रिय असते, त्याप्रमाणे एखादी व्यक्ती महाराष्ट्राच्या राजकारणात राहून स्वतःच्या राज्याचे का नाही भलं करणार? त्यांना तिकडचा कळवळा तर येणारच. म्हणूनच कोणत्याही पक्षाने तिकीट देताना परप्रांतीयांना तिकीट देता कामा नये महाराष्ट्रातील राजकारणात केवळ मराठी उमेदवारच असले पाहिजेत.

महाराष्ट्रातील राजकारणामध्ये कितीतरी परप्रांतीय लोक मोठ मोठ्या पदावर पोहोचलेले आहेत. पण, त्यांनी आपल्यासाठी काय केलं? हा संशोधनाचा विषय ठरावा. हे आपलं राज्य आहे इथे राज्यकर्तेही आपलेच हवेत. आणि तसेही आपले ताट भरलेले असेल तरच आपण एखाद्याला जेवायला ये, असे बोलवू शकतो आपलेच ताट रिकामे असेल, तर आपण समोरच्याला नाही बोलवू शकत. प्रत्येक राजकीय पक्षांनी या गोष्टीचा विचार करावा आणि योग्य तो निर्णय घ्यावा. तुमचे संबंध जोपासण्यापायी महाराष्ट्राच्या सर्वसामान्य जनतेला वेठीसधरू नये. अन्यथा इतिहास साक्ष आहे व्यापारी म्हणून आले आणि राज्यकर्ते बनले. आणि आता हे पण छोटे-मोठे व्यापारी बनूनच आलेत. राज्यकर्ते बनून आपल्याला गुलाम बनविण्यास मागे पुढे पाहणार नाहीत. मराठी माणसानेदेखील मतदान करताना याचा विचार करावा. आणि पक्षानेदेखील तिकीट देताना याचा सारासार विचार करावा.

आपल्या माणसाचे कधीही कान पकडता येतात. आपल्या माणसाला समजून घेता येऊ शकतं. आपल्या माणसाने व्यथा वेदना दिल्याच तर त्या विसरूनही जाता येतील; पण इतरांच्या वेदना ह्या संघर्ष घडवल्याशिवाय राहणार नाहीत. आता कुठेतरी मराठी माणूस एकत्र येऊन पाहात आहे. त्यांची अशी फटाफूट होऊ देऊ नका. राजकीय पक्षांनो फक्त आणि फक्त मराठी उमेदवारांनाच तिकीट देऊ करा. जर तुम्ही मराठी सोडून इतरांना तिकीट देत असाल, तर याचा अर्थ महाराष्ट्रात पात्र व्यक्ती नाहीत की काय असा होतो. महाराष्ट्रामध्ये अनेक व्यक्ती आहेत जे चांगलं काम करू इच्छितात, त्यांना संधी द्या. देशाची दशा आणि दिशा पाहता महाराष्ट्रातील राजकारणामध्ये केवळ मराठी व्यक्तीच पाहिजे ही काळाची गरज निर्माण झाली आहे. पक्ष कोणताही असो उमेदवार मराठीच हवा. राजकीय गोळा बेरीज करत असताना खरंतर धर्म जात पंथ आडवी येऊ नये; परंतु हल्लीची परिस्थिती पाहता महाराष्ट्रातील राजकारणामध्ये मराठी व्यक्तीच हवी आहे. स्थानिकच हवा. महाराष्ट्राच्या राजकारणात इतरांचा वावर वाढला तर आपली पावर गेलीच म्हणून समजा आणि एकदा का पावर गेली की फक्त काळाकुट्ट अंधार. आणि या अंधारातच महाराष्ट्राची वाताहत स्वतःच्या डोळ्यानी पाहण्याचं दुर्दैव मराठी माणसाच्या नशिबी लवकरच येणार. हीसुद्धा काळा दगडावरची रेघच. परिस्थिती आवाक्यात आहे, तोवरच निर्णय घ्या. राजकर्त्यांनो आणि मतदारांनो. विचार करा. निर्णय घ्या. अन्यथा.. ●●

# सार्वजनिक ग्रंथालये आणि स्पर्धा परीक्षा



स्पर्धा परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आजच्या काळात सार्वजनिक ग्रंथालये म्हणजे ज्ञानाचे मुक्त विद्यापीठच झाले आहे. घरातील वातावरणात अभ्यास करताना अनेकांना एकाग्रता, योग्य साधने, शांतता, आणि सततची प्रेरणा यांचा अभाव जाणवतो. अशावेळी सार्वजनिक ग्रंथालये अभ्यासकांसाठी योग्य पर्याय ठरतात. येथे उपलब्ध असलेले शांत वातावरण, अभ्यासाला पूरक जागा, तसेच आवश्यक संदर्भग्रंथांची उपलब्धता हे सर्व स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी अत्यंत उपयुक्त ठरते.

ग्रंथालयांमध्ये वाचनासाठी आरामदायी आसन व्यवस्था, स्वच्छ पिण्याचे पाणी, पुरेशी प्रकाशयोजना, हवा खेळती राहण्यासाठी यंत्रणा, असे अनेक सुविधा पुरवल्या जातात. काही ठिकाणी इंटरनेटसुद्धा उपलब्ध करून दिले जाते, ज्यामुळे ऑनलाइन सामग्री, व्हिडीओ लेक्चर्स किंवा शासकीय भरतीविषयक सूचनांपर्यंत सहज पोहोचता येते.

**संजय बोन्दार्डे**

ग्रंथालयातील ग्रंथपाल व कर्मचारी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा ओळखून वेळोवेळी नवीन पुस्तके, मार्गदर्शक, प्रश्नसंच, मासिके आणि विविध अभ्यास सामग्री उपलब्ध करून देतात. स्पर्धा परीक्षांसाठी चालणारे नवीन अभ्यासक्रम, बदललेली पद्धत, अद्ययावत प्रश्नपत्रिका याबाबतही ग्रंथालये विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करीत असतात. काही ग्रंथालये विद्यार्थ्यांसाठी अभ्यास गट, प्रश्नोत्तरे, विशेष कार्यशाळा अशा उपक्रमांचाही आयोजन करतात, जे विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी अत्यंत उपयुक्त ठरतात.

दरवर्षी हजारो विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करतात. घरच्या वातावरणात लक्ष विचलित होणे, योग्य साधने नसणे किंवा प्रेरणेचा अभाव जाणवणे हे सर्व सामान्य आहे. पण, ग्रंथालयातील एकत्रित अभ्यासाचे वातावरण विद्यार्थ्यांना सातत्य आणि शिस्त शिकवते. यामुळे त्यांच्या अभ्यासाचा दर्जा सुधारतो आणि स्पर्धा परीक्षेत यश मिळण्याची शक्यता वाढते.

राज्यातील अनेक जिल्हा ग्रंथालये शासनमान्य असून, तेथे स्पर्धा परीक्षांसाठी खास अभ्यास विभाग तयार केलेले आहेत. आधुनिक डिजिटल साधने, नवनवीन पुस्तके, प्रश्नपत्रिका संच, वृत्तपत्रे, मासिके, तसेच अभ्यासासाठी शांतगृह अशा सर्व सुविधा उपलब्ध असतात. काही ठिकाणी ग्रंथालय अधिकारी विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन सत्रे आयोजित करतात.

स्पर्धा परीक्षेच्या तयारीमध्ये सातत्य, योग्य माहिती आणि गुणवत्तायुक्त अभ्यास सामग्री या तीन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या असतात. सार्वजनिक ग्रंथालये ही तिन्ही गोष्टी विद्यार्थ्यांपर्यंत सहजपणे आणि कमी खर्चात पोहोचवतात. त्यामुळे आज सार्वजनिक ग्रंथालयांचे महत्त्व पूर्वीपेक्षा अनेक पटींनी वाढले आहे. अनेक यशस्वी विद्यार्थ्यांच्या कथा पाहिल्या तर त्यातील बहुतांशांनी ग्रंथालयाचा लाभ घेतलेला दिसतो. अशा ग्रंथालयांचा वापर करून अधिकाधिक विद्यार्थ्यांनी ज्ञानार्जन करावे, स्वतःच्या भविष्यात उज्ज्वल बदल घडवावा आणि समाजकल्याणात योगदान द्यावे, हीच अपेक्षा. **

# मी-तू पण एक झाले

**मुक्तांगण**

**प्रा. शाम जोगळेकर**

मो. ९२७३३४३१७७

मी-तू पण एक झाले, हा दिलीप रामदास मोकल यांचा कविता संग्रह, पेणच्या साहित्यसंपदा प्रकाशनने देखण्या रूपात प्रकाशित केला आहे. या कवितासंग्रहाला रमेश धनावडे यांची सविस्तर प्रस्तावना लाभली आहे. दिलीप यांच्या, अकाली पत्नीवियोगाचा रमेश यांनी उल्लेख केला आहे. संकटांवर मात करत आणि जीवनातील आव्हानांचा मुकाबला करत, साहित्य क्षेत्रात स्वतःला झोकून देऊन, दिलीप आपले जीवन आनंदात जगत आहेत. पत्नी वियोगाचे दुःख त्यांच्या कवितांतून दिसून येते. दिलीप मोकल यांच्या कवितांविषयीही रमेश यांनी सविस्तरपणे, सोदाहरण लिहिले आहे. त्यामधून दिलीप यांच्या काव्यगुणांचे दर्शन होते. प्रस्तावनेत शेवटी रमेश लिहितात, दिलीप मोकल यांच्या या कवितांचा पुष्पगुच्छ खूप सुंदर, आकर्षक आणि मनमोहक झाला आहे. या फुलांचा सुगंध वाचकांच्या मनात नक्कीच दरवळत राहील. वयाच्या उत्तरार्धात दिलीप यांनी सुरू केलेल्या, या साहित्य सेवेसाठी रमेश धनावडे यांनी त्यांना भरभरून शुभेच्छा दिल्या आहेत.

सुरुवातीला दिलीप यांनी आपले 'मनोगत' व्यक्त केले आहे. या काव्यसंग्रहामधील बहुतांश कवितांचे लेखन २०१५ ते २०२० या काळातील आहे. पत्नीच्या अकाली निधनानंतर काव्यप्रतिभा डळमळीत झाल्याचे त्यांनी नमूद केले आहे. या कविता संग्रहाला शिवाजी किसन खैरे यांनीही शुभेच्छा दिल्या आहेत. या पुस्तकात एकूण १०५ कविता समाविष्ट आहेत. या पुस्तकाचे सुंदर, रंगीत मुखपृष्ठ मनोमय मीडियाचे आहे.




या कविता संग्रहातील अनुक्रमणिका पाहिल्यास त्यामध्ये विषयांचे वैविध्य जाणवते. कवीला कोणताही विषय वर्ज्य नसतो, याची जाणीव होते. प्रत्येक विषयावर कवीचे काही म्हणणे असते आणि त्यामधून विशिष्ट अर्थ व्यक्त होत असतो, हे हा कविता संग्रह वाचताना जाणवते. माणूस, या कवितेत, माणूस हा भूतलावरील एकमेव बुद्धिमान प्राणी आहे. परंतु तो नम्र झाल्याशिवाय सद् गुणी ठरत नाही, असे कवीला वाटते. आयुष्य, या कवितेत कवीने आयुष्याचे महत्त्व सांगितले आहे. दिवसभरातील सूर्याचा प्रवास पाहिल्यास, त्याच्याशी तुलना करण्याचा मोह कवीला होतो. शेवटी कवी लिहितो,

**देहाने तू जाशील जरी,**
**सत्कीर्तीने तू जिवंत रहा**

हार, या कवितेत 'हार' या शब्दाचे विविध अर्थ लक्षात घेऊन,

**कवीने जणु काव्यहार गुंफला आहे.**
**शेवटी दोन्ही हार जिथे नरमती,**
**तो एक मृत्यू आहे**
**कोणती जीत आणि**
**कोणती हार?**
**जगी हेच सत्य आहे**

स्वभाव, या कवितेत जगातील वेगवेगळ्या व्यक्तींच्या स्वभावावर प्रकाश टाकला आहे. अर्थात परिस्थितीनुसार स्वभाव बदलतो, असेही कवीला वाटते. खोड, या कवितेत 'खोड' या शब्दाचे विविध अर्थ लक्षात घेऊन, कवीने काव्यरूपी गंमत केली आहे. शेवटी कवी म्हणतो, चंदनाचे खोड उगाळल्याशिवाय दरवळत नाहीआणि जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही. बदल, या कवितेत मानवी जीवनातील बदलाचे महत्त्व सांगितले आहे. 'दगड' ही देखील एक उत्तम कविता आहे. माणसाच्या वर्तनाशी दगडाची सुंदर तुलना केली आहे. अशी कविता वाचकाला अंतर्मुख करते. कागद, ही कविता कागदाची दैनंदिन जीवनातील विविध रूपे दर्शविणारी आहे. विविध कवितांतून व्यसनांचे दुष्परिणाम कवीने प्रभावीपणे मांडले आहेत. वाद्यांचा गजर, या कवितेतून विविध वाद्यांचे आणि संगीताचे अनोखे नाते स्पष्ट होते. स्मशान वैराग्य, ही कविता स्मशानात येणारा अनुभव, जो सामान्यपणे तात्कालिक असतो, व्यक्त करते आहे. कृषक देशाचा प्रधान, या कवितेत भारतातील शेतकऱ्याचे महत्त्व आणि तो कसा अन्नदाता आहे, हे नेमकेपणाने स्पष्ट केले आहे. पिकलेले पान या कवितेत पिकलेल्या पानाची कहाणी सांगताना त्याची मानवी जीवनाशी ही तुलना केली आहे,

**गळताना काय ते न्यावे,**
**रीत्या हातीच जाईन**
**आणिक जाता जाता**
**गुण तरुवराचे गाईन..(५४)**

एक विचार, या कवितेत समाजातील जाणवणाऱ्या तीव्र विसंगतींचा आढावा घेतला आहे. माझे घर, असे आपण म्हणतो पण प्रत्यक्षात त्यामध्ये अनेक लहान-मोठे प्राणी राहत असतात. 'हे घर कुणाचे' या कवितेत नेमकेपणाने मांडले आहे. देवा मला 'पाव', या कवितेत आजच्या काळात उपलब्ध असणारे, विविध प्रकारचे पाव आणि देवा मला 'पाव' यातला वैशिष्ट्यपूर्ण संबंध कवीने मांडला आहे. देवा शप्पथ खरे सांगतो, मी आता सुधारतोय या कवितांमध्ये दारूचे आणि कुसंगतीचे दुष्परिणाम स्पष्ट केले आहेत. तरीही कवी म्हणतो, माझ्यासहित तुम्हालाही मला सुधारलेलं पहायचं आहे

मी-अहम, फक्त माझेच जग?,

मी-अहंकार या कविता 'स्व'चे जग स्पष्ट करतात. सर्वधर्म समभाव, या कवितेत कवी म्हणतो स्वधर्माचे करावे पालनपरी दुसऱ्यास न दुखवावेलेकरे आपण एकेश्वराचीसर्व धर्म समभाव मनी हवे..(७२) आई, बाबा, बालपण, बालपणीचा काळ या कविता सर्वांनाच, आठवणींमध्ये घेऊन जातील. त्याविषयी अन्य कविताही या संग्रहात समाविष्ट आहेत. 'कोरोना काळातील कविता' यामध्ये एकूण आठ कविता समाविष्ट आहेत. मीच माझा रक्षक, ही कविता वाचकाला अंतर्मुख करते. या विविध कवितांतून कवी आपले मनोगत साध्यासोप्या शब्दांत मांडतो आहे. 'मी- तू पण एक झाले' हे शीर्षक स्व आणि अन्य, यामधील अद्वैत व्यक्त करते आहे. असे झाले तर जगातील अनेक प्रश्न सहजपणे सुटण्यास मदत होईल. या काव्यसंग्रहातील काही मुद्रणदोष खटकतात. पुस्तकाचे शेवटी कवीचा सचित्र परिचय करून दिला आहे. अधूनमधून या कविता चाळल्यास, त्यामुळे वाचकाला आनंद आणि शांती प्राप्त होईल. **

**पुस्तकाचे नाव : मी-तू पण एक झाले कवी : दिलीप रामदास मोकल प्रकाशक : साहित्यसंपदा प्रकाशन,पेण**
**प्रथम आवृत्ती : १ मे २०२५**
**पृष्ठे : ११८ स्वागत मूल्य : रु. २५०/-**

# अफजलखान वध : महाराष्ट्राच्या इतिहासातील सोनेरी पान!

**छत्रपतींच्या महाराष्ट्रात अफजलखानाच्या कबरीपुढे महाराजांचा भीम पराक्रम झाकण्याचा प्रयत्न होऊ लागला. याविरोधात हिंदुत्ववादी संघटनांनी गेली अनेक वर्षे लढा दिला, ज्याला अखेर यश आले. विद्यमान महाराष्ट्र सरकारने कबरीभोवतीच्या अनधिकृत बांधकामावर हातोडा फिरवला. अफजलखान वध हा महाराष्ट्राच्या इतिहासातील एक सोनेरी पान, ज्याचा समस्त जनतेला अभिमान वाटायला हवा; मात्र याच अफजलखानाच्या वधाचे पोस्टर लावले म्हणून २००९ साली मिरजेत दंगल उसळली.**



मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याला नुकतीच १७ वर्षे पूर्ण झाली. यानिमित्ताने सागरी सुरक्षा व्यवस्थेच्या घेण्यात आलेल्या लेखा-जोखामध्ये मुंबईचा सागरी किनारा अद्यापही असुरक्षित असल्याचे चित्र समोर आले. गेल्या काही वर्षांत देशात होणाऱ्या दहशतवादी हल्ल्यांचे प्रमाण कमी झाले असले तरी देशावरील दहशतवादी हल्ल्याचे सावट काही दूर झालेले नाही हे काही दिवसांपूर्वीच लाल किल्ल्याजवळ झालेल्या दहशतवादी हल्ल्यावरून आपल्या लक्षात आले असेल. त्यानंतर विविध ठिकाणी टाकण्यात आलेल्या छाप्यांमध्ये अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या. अतिरेक्यांचा भारतात अन्य ठिकाणीही बॉम्बस्फोट करण्याचा मानस होता. पाण्यात विष मिसळून मोठ्या प्रमाणात घातपात करण्याचा अतिरेक्यांचा कट उधळून लावण्यात पोलिसांना यश आले. या कारवायांत जिहादी मानसिकतेचे उच्चशिक्षित दहशतवादी पकडले गेले. भारताच्या इतिहासात जेवढ्या प्रमाणात दहशतवादी हल्ले भारताने सहन केले आहेत, जगाच्या पाठीवरील खचितच एखाद्या देशाच्या नशिबी ते आले असतील. दहशतवादाचे समूळ उच्चाटन कसे करावे याचे इतिहासातील उत्तम उदाहरण म्हणजे अफझलखानवध. शक्ती आणि सैन्यबळ याबाबत छत्रपती शिवाजी महाराजांपेक्षा कैकपटीने बलाढ्य असलेल्या अफझलखानाला शिवरायांनी काही मिनिटांत लोळवला तो युक्ती आणि उत्तम नियोजनाच्या बळावर. आज दहशतवादाचे समूळ उच्चाटन करायचे असेल तर इतिहासातील या सोनेरी पानाचे अध्ययन आणि अध्यापन देशाच्या सुरक्षा व्यवस्थेने करायला हवे. छत्रपती शिवाजी महाराजांनी दाखवलेल्या या भीमपराक्रमाला नुकतीच ३६६ वर्षे पूर्ण झाली यानिमित्ताने या सोनेरी पानाचे पुनर्वाचन करायला हवे!

उत्तरेत मोघलांनी आणि दक्षिणेत आदिलशहाने ताब्यात घेतलेले अनेक गड, किल्ले आणि प्रांत यांच्यावर छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या अफाट शौर्याने आणि प्रसंगी गनिमीकाव्याने ताबा मिळवला, त्यामुळे आदिलशहा शिवाजी महाराजांवर प्रचंड खवळला होता. महाराजांना रोखण्यासाठी कोणीच पुढे येईना. अखेर आदिलशहाच्या आईने म्हणजेच बडी बेगमने हस्तक्षेप करून भर दरबारात आदिलशहाच्या सरदारांना शिवाजी महाराजांना पकडून आणण्याचे आवाहन केले. महाराजांना कैद करून आणणाऱ्यास मोठे इनाम देण्याचेही घोषित केले. शिवाजी महाराजांना रोखण्याचे धाडस करणे म्हणजे मृत्यूला आव्हान देण्यासारखे असल्याने कोणीच पुढे येईना. अखेर त्यांतूनच एक उंच धिप्पाड आणि क्रूर सरदार पुढे आला ज्याचे नाव अफजलखान. शिवाजी महाराजांना पकडून आणण्याचा विडा अफजलखानाने उचलला. प्रतापराव मोरे, पिलाजी मोहिते या स्थानिक सरदारांसह सिद्धी हिलाल, मुसाखान, अंबरखान आणि याकूब खान यांसारखे पराक्रमी सरदार खानासोबत होते. याशिवाय बारा हजार घोडदळ, दहा हजार पायदळ आणि असंख्य तोफा आणि बंदुकांच्या शस्त्रसज्जतेसह खानाची स्वारी स्वराज्यावर चाल करून आली. खानाच्या स्वारीचे वृत्त लागताच छत्रपती शिवाजी महाराजांनी आपला मुक्काम घनदाट जंगलाचा वेढा असलेल्या दुर्गम प्रांतातील प्रतापगडावर हलवला. येताना त्याने बरीच लूट माजवली. पुरातन मंदिरे ही हिंदूंची शक्तिस्थाने आणि श्रद्धास्थाने असतात हे खानाला ज्ञात असल्याने त्याने मंदिरांचा विध्वंस करण्यास सुरुवात केली, तुळजापूरच्या भवानी मातेचा विध्वंस करून त्याने आपला मोर्चा पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराकडे वळवला. मंदिरावरील हल्ल्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजा त्याच्यावर आक्रमण करण्याचा प्रयत्न करतील असा त्याचा समज होता; मात्र खानाशी समोरासमोर भिडणे म्हणजे आगीत उडी घेण्याप्रमाणे असल्याने महाराजांनी यावेळी सावध पवित्र घेतला. खानाने वाईला आपला मुक्काम थाटला, आदिलशहाने त्याला याआधी वाईची सरदारकी दिलेली असल्याने तेथील परिसराचा त्याला बऱ्यापैकी अभ्यास होता, खानाला पराभूत करायचे असेल, तर शक्तीपेक्षा युक्तीनेच तो करता येईल हे महाराजांनी ओळखले आणि त्यांनी मानसशास्त्राचा वापर करत खानाचे त्यांना भय वाटत असल्याचा निरोप खानाकडे पाठवला. आपल्याला युद्ध करायचे नसून चर्चा करून तह करण्याचे प्रलोभन खानाला दिले. खानाने महाराजांना वाईला बोलावले. खान हा दगाफटका करण्यात सराईत असल्याचे महाराजांना चांगलेच ज्ञात असल्याने महाराजांनी आपण अत्यंत भयभीत झालो असल्याचे भासवत खानालाच प्रतापगडाच्या

**जगन घाणेकर**

पायथ्याशी बोलावले. एव्हाना महाराज भयभीत झाल्याच्या विधानावर त्याचा पूर्ण विश्वास बसला होता आणि प्रतापगडाच्या पायथ्याशी येण्याची त्याने सिद्धता दर्शवली. दोघांची भेट शामियान्यात होईल आणि दोघांनी सोबत कोणतेच शस्त्र बाळगू नये असे ठरले. सोबत १० अंगरक्षक असतील, त्यापैकी एक शामियान्याच्या बाहेर सेल आणि अन्य काही अंतरावर असतील. भेटीसाठी मार्गशीर्ष शुद्ध सप्तमीचा म्हणजेच १० नोव्हेंबर १६५९ चा दिवस निश्चित करण्यात आला.

अफजलखान श्रीमंती आणि शाही थाटाचा शौकीन असल्याने महाराजांनी त्याच्यासाठी विविध शोभिवंत वस्तुंनी सजवलेला भव्य शामियाना उभारला. या शामियानाच्या सौंदर्याने अफजलखान खूपच खुश झाला. सोबत शस्त्र न बाळगण्याचे ठरले असतानाही खानाने अंगरख्याखाली बिचवा लपवला होता. भेटीच्या वेळी खान दगा फटका करणार याची महाराजांना पूर्णपणे जाणीव असल्याने महाराजांनी अंगरख्याच्या आत चिलखत परिधान केली, हातात वाघनखे लपवली. शामियान्यात येतानाही अफजलखानाकडे पाहून भय वाटत असल्याचे दाखवत महाराज सुरुवातीला थोडे मागे सरसावले. महाराजांच्या या कृतीने खानाला पूर्णपणे गाफील केले. ज्यामुळे आलिंगनासाठी पुढे सरसावताना महाराजांच्या हातात वाघनखे आहेत याकडे खानाचे लक्षही गेले नाही, महाराजांना आलिंगन देताच खानाने त्यांना आपल्या काखेत दाबत महाराजांवर बिचव्याचा वार केला. त्याबरोबर महाराजांनी पूर्ण शक्तीनिशी खानाच्या पोटात वाघनखे खुपसून त्याचा कोथळा बाहेर काढत त्याची मिठीतून स्वतःची सुटका करवून घेतली. 'दगा दगा' करत खान आक्रोश करू लागला. त्याबरोबर खानाचा अंगरक्षक सय्यद बंडा पुढे सरसावला आणि त्याने महाराजांवर वार केला. तो वार जीवा महालाने स्वतःवर घेऊन महाराजांचा मार्ग मोकळा केला. जखमी खानाने पालखीत स्वार होऊन भोईंना तिथून निघण्यास सांगितले. तत्क्षणी संभाजी कावजीने भोईंचे पाय छाटले आणि खानाचे शीर धडावेगळे केले. महाराज किल्ल्यावर परतले. किल्ल्यांवरील तोफांनी खानाच्या सैन्यावर आक्रमण केले. स्वराज्याचे सैन्य आधीच दबा धरून बसलेले होते. खानाचे सैन्य पूर्णपणे बेसावध असल्याने मावळ्यांनी केलेल्या अचानक हल्ल्यामध्ये आणि तोफांच्या आक्रमणामध्ये खानाचे सुमारे ५००० सैन्य मारले गेले, ३००० सैन्याला पकडण्यात आले. शारीरिकदृष्टीने, बळाच्या आणि सैन्य-युद्धसामग्रीच्या तुलनेत महाराजांचे सैन्य अगदीच अल्प होते मात्र महाराजांकडे असलेली प्रचंड इच्छाशक्ती, त्यांचे युद्धकौशल्य, मानसशास्त्राचा वापर, संयम, अचूक नियोजन, सैन्यावरील प्रचंड विश्वास आणि तेवढ्याच ताकदीचे, महाराजांवर जीव ओवाळून टाकणारे स्वराज्याचे सैन्य या महाराजांकडील जमेच्या बाजू होत्या. त्यांच्या सामर्थ्यावर महाराजांनी दहशतवादावर विजय मिळवला. 'मरणान्ती वैराणी' या रामायणातील उक्तीनुसार शत्रूच्या मृत्यूनंतर शत्रुत्वाचाही शेवट होतो म्हणून महाराजांनी विशालगडाच्या पायथ्याशी अफजलखानाची छोटीशी कबर बांधली. या कबरीवर प्रतिदिन दिवाबत्ती करण्यासाठी निधीचे प्रयोजन केले. किती उदात्त विचार होते महाराजांचे हे या एका कृतीतून लक्षात येते. या छोट्याशा कबरीचा पुढे अफजलप्रेमींनी एक एकरात विस्तार केला. कबरीभोवती अनधिकृत बांधकाम करण्यात आले, कबरीला दर्ग्याचे स्वरूप दिले, लोक तिथे नवस करू लागले. अफजल खानाचे उदात्तीकरण सुरु झाले. पुढे-पुढे तर प्रतापगडावर शिवप्रताप दिन साजरा करण्यासही विरोध होऊ लागला. छत्रपतींच्या महाराष्ट्रात अफजलखानाच्या कबरीपुढे महाराजांचा भीमपराक्रम झाकण्याचा प्रयत्न होऊ लागला. याविरोधात हिंदुत्ववादी संघटनांनी गेली अनेक वर्षे लढा दिला, ज्याला अखेर यश आले. विद्यमान महाराष्ट्र सरकारने कबरीभोवतीच्या अनधिकृत बांधकामावर हातोडा फिरवला. अफजलखान वध हा महाराष्ट्राच्या इतिहासातील एक सोनेरी पान, ज्याचा समस्त जनतेला अभिमान वाटायला हवा; मात्र याच अफजलखानाच्या वधाचे पोस्टर लावले म्हणून २००९ साली मिरजेत दंगल उसळली. एका समाजाच्या भावना दुखावतील म्हणून तत्कालीन गृहमंत्र्यांनी अफजलखान वधाच्या पोस्टरवर अघोषित बंदी आणली. शालेय अभ्यासक्रमातील अफजलखान वधाची चित्रे काढून टाकण्यात आली. त्यानंतर ज्या ज्या ठिकाणी अफजलखान वधाचे चित्र उभारण्यात आले, पोलिसांकडून ते काढून टाकण्यास सांगण्यात आले, देवी देवतांची मंदिरे उध्वस्त करणाऱ्या, तलवारीच्या बळावर रयतेला लुटणाऱ्या अफझलखानाचा कोथळा काढून शिवरायांनी ज्या महाराष्ट्राला सुरक्षित केले त्या महाराष्ट्रातील एका समाजाच्या भावना दुखावतील म्हणून थेट इतिहासाशीच छेडछाड करण्याचा प्रयत्न करण्यात आला. आता मात्र इतिहासप्रेमी सरकार सत्तेत आहे. यंदा असे काही घडणार, अशी अपेक्षा ठेवायला काहीच हरकत नाही. **

## निवडक

### आयुषने मोडला रोहितचा विक्रम

**मुंबई :** लखनऊच्या स्टेडिअमवर सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीसाठी शुक्रवारी झालेल्या टी-२० सामन्यात मुंबईच्या आयुष म्हात्रेने ५३ चेंडूंत ११० धावा फटकावत धुवाधार खेळी केली आणि मुंबईला ७ गडी व १३ चेंडू राखून विदर्भावर विजय मिळवून दिला. ८ सणसणीत चौकार आणि सहा



उत्तुंग षटकारांनी आयुषची सजलेली ही खेळी रोहितचा विक्रम मोडणारी ठरली. प्रथमश्रेणी क्रिकेटमधील सर्व प्रकारच्या खेळांमध्ये शतक झळकवणारा आयुष हा सर्वांत तरुण क्रिकेटपटू ठरला आहे. अवघ्या १८ व्या वर्षी त्याने लखनऊच्या स्टेडिअमवर हे शिखर गाठले. आधी हा विक्रम रोहितच्या नावावर होता. रोहित शर्माने वयाची १९ वर्षे ३३९ दिवस पूर्ण झाले तेव्हा ही कामगिरी केली होती. या यादीत आता तिसऱ्या क्रमांकावर हाच विक्रम विसाव्या वर्षी करणारा उन्मुक्त चंद आहे. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीसाठी एलिट ग्रुप 'ए' साठी शुक्रवारी झालेल्या सामन्यात आयुषने झंझावाती खेळी केली.

### क्रीडा महोत्सवामुळे घडतात खेळाडू

**कासार्डे :** कासार्डे केंद्रातील बाल कला, क्रीडा व ज्ञानी मी होणार महोत्सवाचे उद्घाटन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कासार्डे तांबळवाडी येथे त्यांच्या हस्ते झाले. दीपप्रज्वलन, देवी शारदा व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. उद्घाटन प्रसंगी नामदेव बांदिवडेकर, प्रकाश पारकर, निशा नकाशे, गणेश पाताडे, समृद्धी राणे, प्रशांत राणे, प्रकाश तिर्लोटकर, श्रद्धा शेलार, सहदेव खाडये, प्रणय जोशी, आरोही जाधव, सुधाकर राणे, गजानन कोलते, संजय पवार, स्वाती पाताडे, योगेश कदम, किशोर कुडतरकर, नीलेश ठाकूर, जगदीश गोसावी, विनायक पाताडे, सुनील साईम, प्रज्ञान शिर्के उपस्थित होते. झाकीर शेख यांनी सूत्रसंचालन केले.

### हॉकी विश्वकरंडक जिकण्याची संधी

**नवी दिल्ली :** ज्युनियर विश्वकरंडक हॉकी स्पर्धा सुरु होत असून भारतीय संघ नऊ वर्षांनतर पुन्हा एकदा घरच्या मैदानावर विजेतेपद मिळवण्यास सज्ज झाला आहे. भारताने या स्पर्धेत दोनदा विजेतेपद मिळवलेले आहे. २०१६ मध्ये लखनऊमध्ये अजिंक्य ठरताना हरेंद्र सिंग हे प्रशिक्षक होते. हरेंद्र सिंग सध्या भारताच्या सिनियर महिला संघाचे मार्गदर्शक आहेत. भारताचा 'ब' गटात समावेश असून चिली, ओमान आणि स्वित्झर्लंड हे इतर संघ आहेत. पाकिस्तानने भारतातील या स्पर्धेत खेळण्यास नकार दिल्यानंतर त्यांच्या ठिकाणी ओमानला संधी देण्यात आली आहे. श्रीजेश यांचीही कसोटी दोन वेळचा ऑलिंपिक पदकविजेता गोलरक्षक ते प्रशिक्षक असा प्रवास केलेल्या पी. आर. श्रीजेश यांच्यासाठी ही स्पर्धा सर्वांत मोठी परीक्षा ठरणार आहे. भविष्यात वरिष्ठ संघाचे प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने ते आपली क्षमता सिद्ध करण्यास उत्सुक आहेत. मलेशियातील सुलतान ऑफ जोहर करंडक स्पर्धेत रौप्यपदक जिंकल्यानंतर संघाचा आत्मविश्वास उंचावलेला आहे. भारताने या अगोदर २००१ होबार्ट आणि २०१६ लखनौमध्ये झालेल्या स्पर्धेत विजेतेपद मिळवले होते. अर्जेंटिनाने २००५,२०२१ मध्ये विजेतेपद पटकावल्याने भारतासह दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक विजेतीपदे त्यांच्याकडे आहेत. पाकिस्तानने १९७९ मध्ये फ्रान्समधील व्हर्साय येथे विजेतेपद मिळवले होते.

### राज्य अजिंक्यपद मल्लखांब स्पर्धा सुरू



**डेरवण :** महाराष्ट्र हौशी मलखांब संघटना, रत्नागिरी जिल्हा मल्लखांब संघटना आणि एसव्हीजेसीटी. स्पोर्ट्स अकॅडमीच्या संयुक्त विद्यमाने डेरवण क्रीडा संकुलात ४१ वी मिनी, सब-ज्युनिअर, ज्युनिअर व सिनिअर गट राज्य अजिंक्यपद मल्लखांब स्पर्धा भव्य दिमाखात सुरू झाली आहे. उद्घाटन समारंभास डॉ. गणपत्ये, श्रीकांत पराडकर, सचिन मांडवकर, शरयू यशवंतराव, डॉ. सुभाष डोंगरे, श्रेयस मस्कर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील २२ जिल्ह्यांतील अंदाजे ५५० खेळाडूंचा सहभाग असून मुला-मुलींच्या एकूण ८ वयोगटांत सामने रंगणार आहेत. येथून राष्ट्रीय स्पर्धेसाठी संघाची निवड होणार असल्याने खेळाडूंमध्ये विशेष उत्साह आणि जिंकण्याची जिद्द पाहायला मिळत आहे.

### एशियन कॉन्टिनेंटल चॅम्पियनशिपसाठी आशिष सज्ज

**पुणे :** भारताचे अनुभवी अश्वक्रीडापटू आशिष लिमये येत्या इव्हेंटिंग एशियन कॉन्टिनेंटल चॅम्पियनशिपमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत. भारताच्या आंतरराष्ट्रीय अश्वक्रीडा क्षेत्रातील त्यांच्या सातत्यपूर्ण योगदानाची ही आणखी एक महत्त्वाची नोंद ठरणार आहे.

महाराष्ट्रातून आशिष लिमये हे भारताच्या इव्हेंटिंग सर्किटमधील




एक सातत्यपूर्ण नाव. त्यांनी यापूर्वी चीनमध्ये झालेल्या आशियाई स्पर्धांमध्येही भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. गेल्या चार वर्षांपासून ते जर्मनीमध्ये राहून ड्रेसाज, क्रॉस-कंट्री आणि शो-जम्पिंग या कौशल्यांवर युरोपातील नामांकित प्रशिक्षकांकडून विशेष प्रशिक्षण घेत आहेत. त्यामुळे या स्पर्धेत भारताला कसून तयारीचा मजबूत फायदा मिळेल अशी अपेक्षा आहे. लिमये सोबत शशांक कटारिया आणि शशांक कनुमुरी हे दोघेही भारताच्या इव्हेंटिंग टीममध्ये सहभागी होत आहेत. विशेष म्हणजे शशांक कनुमुरी हा एकेकाळी आशिष लिमये यांचा विद्यार्थी असून त्यांनी आपला स्पर्धात्मक प्रवास त्यांच्या मार्गदर्शनाखालीच सुरू केला होता. या त्रिकुटाच्या संयुक्त अनुभवावर भारताला पदक जिंकण्याची आणि आशियाई अश्वक्रीडा क्षेत्रात भारताची प्रतिष्ठा अधिक वाढविण्याची मोठी आशा आहे.

# भारताच्या कसोटी संघात बदलाची शक्यता

## ■ पराभवाच्या धक्क्यानंतर 'तीन नंबर'चा शोध; भारत 'अ' संघासोबत वेळ घालवणे आवश्यक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत दोन्ही कसोटी सामन्यात झालेल्या मोठ्या पराभवानंतर भारतीय कसोटी संघात काही देशांतर्गत क्रिकेटमधील अनुभवी खेळाडूंना स्थान मिळण्याची शक्यता आहे.

अजित आगरकर यांच्या नेतृत्वातील निवड समिती तिसऱ्या क्रमांकासारख्या महत्त्वाच्या स्थानाबाबत आपला दृष्टिकोन बदलण्यास तयार असल्याचे संकेत मिळत आहेत. गेल्या तीन दशकांत राहुल द्रविड आणि चेतेश्वर पुजारा यांनी तिसऱ्या क्रमांकाची भूमिका उत्कृष्टरीत्या निभावली. परंतु, आता हे स्थान अधिक स्थिर करण्याची गरज बनली आहे.




करूण नायर इंग्लंडमधील चार कसोटींत प्रभाव पाडण्यात अपयशी ठरला, तर बी. साई सुदर्शन याला ११ डावांत केवळ २७ च्या सरासरीने धावा काढता आल्या. विशेषतः उपखंडातील फिरकीपटूंविरुद्ध त्याच्या फलंदाजी तंत्रातील कमजोरी स्पष्टपणे दिसून आली. त्यामुळे त्याला कसोटीसाठी सज्ज होण्यासाठी अधिकाधिक देशांतर्गत क्रिकेट आणि भारत 'अ' संघासोबत वेळ घालवणे आवश्यक आहे. कसोटी क्रिकेटमध्ये चुका दुरुस्त करता येत नाही. त्यामुळे, या उच्च स्तरावर जेव्हा खेळाडू वारंवार त्याच चुका करततात, तेव्हा संघात बदल करणे अनिवार्य ठरते. सर्फराज खान आणि अभिमन्यू ईश्वरनसाठी दारे जवळजवळ बंद झाली आहेत.

मात्र, ऋतुराज गायकवाड, रजत पाटीदार आणि रिंकू सिंग या अनुभवी खेळाडूंनी पुन्हा आपले लक्ष वेधले आहे.

भारतीय संघाला सध्या तिसऱ्या क्रमांकावर एक सक्षम फलंदाज आणि पाचव्या क्रमांकासाठी एक मजबूत राखीव फलंदाजाची गरज आहे. तिसऱ्या क्रमांकासाठी ऋतुराज गायकवाड चांगला पर्याय ठरू शकतो.

या हंगामात दोन शतके आणि रणजीमध्ये ९० हून अधिकच्या सरासरीने धावा करून तो मानसिकदृष्ट्या पात्र दिसतो. दुसरा पर्याय रजत पाटीदार आहे.

अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील निवड समिती आता फलंदाजीतील महत्त्वाच्या 'नंबर तीन' क्रमांकासाठी नवे पर्याय शोधत आहे. राहुल द्रविड आणि चेतेश्वर पुजारा यांच्या निवृत्तीनंतर हा क्रमांक सध्या अस्थिर बनला आहे.

मधल्या फळीत करुण नायर आणि बी. साई सुदर्शन यांची कामगिरी समाधानकारक ठरलेली नाही. सुदर्शनला अधिक देशांतर्गत आणि भारत 'अ' क्रिकेट संघात खेळण्याची गरज असल्याचे मत आहे. त्यामुळे निवड समिती आता अनुभवी देशांतर्गत फलंदाजांकडे वळताना दिसत आहे.

ऋतुराज गायकवाड, रजत पाटीदार आणि रिकूं सिंह ही नावे चर्चेत असून स्मरण रविचंद्रन आणि यश राठोड हे नवखे पर्यायही लक्ष वेधून घेत आहेत. एका माजी निवड समिती सदस्यांनुसार, संघाने आता अष्टपैलूंपेक्षा तज्ञ फलंदाजांवर भर द्यावा. हार्दिक पंड्या व नितीश रेड्डी कसोटी क्रिकेटसाठी योग्य नसल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. रेड्डीची कसोटीतील कामगिरीही समाधानकारक नाही. १० कसोटींत त्यांची फलंदाजी सरासरी २६ इतकी आहे. त्यातही ऑस्ट्रेलियातील शतकामुळे आकडे बऱ्यापैकी फुगलेले आहेत. १५ डावांत त्यांनी केवळ ८६ षटके गोलंदाजी केली आहे. म्हणजे सरासरी सहा षटकेही एका डावात टाकलेली नाहीत.

### भक्कम फलंदाज

नंबर तीनसाठी ऋतुराज गायकवाड हा सध्या सर्वात मजबूत दावेदार मानला जात आहे. ४३ प्रथम श्रेणी सामन्यांत त्याने ४५ पेक्षा अधिक सरासरीने धावा केल्या आहेत. चालू हंगामात दोन शतके आणि रणजीत ९० पेक्षा अधिक सरासरी ही त्याच्या फॉर्मची साक्ष देणारी आहे. रजत पाटीदारबाबतही गांभीयनि विचार केला जात आहे.

### आरडीसीए आयोजित क्रिकेट स्पर्धा
# भेंडखळ क्रिकेट अकॅडमीचा अंतिम फेरीत प्रवेश

**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एकोणीस वर्षाखालील मुलांच्या एकदिवसीय ४० षटकांच्या निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत, भेंडखळ क्रिकेट अकॅडमी उरण संघाने उपांत्य फेरीच्या सामन्यात एजे स्पोर्ट्स क्रिकेट अकॅडमी संघावर ४८ धावांनी विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश मिळवला आहे.

उपांत्य फेरीच्या सामन्यात भेंडखळ संघाने नाणेफेकीचा कौल जिंकत प्रथम फलंदाजी करतांना ३९.५ षटकात १० गडी गमावत १८१ धावा फलकावर नोंदवल्या त्यामध्ये दक्ष पाटील यांनी सर्वाधिक ५१ श्लोक कोळी ४२ तर जिदनेश म्हात्रे यांनी २८ धावा काढून संघाला योगदान दिले.



एजे स्पोर्ट्सकडून साईराज जोशी, श्लोक साळुंके, अंश यादव यांनी प्रत्येकी दोन फलंदाज बाद केले.

प्रतिउत्तर देत एजे स्पोर्ट्स अकॅडमी संघाचा डाव ३६.२ षटकात सर्व गडी बाद १३३ ह्या धावसंखेवर आटोपला. प्रणित उलवेकर यांनी सर्वाधिक ४७ तर मिलन चौरसिया यांनी २७ धावा संघासाठी काढल्या. भेंडखळ संघाकडून तृषभ गावंड व अभिषेक वर्मा यांनी प्रत्येकी ३ तर विघ्नेश पाटील व जिदनेश म्हात्रे यांनी प्रत्येकी दोन फलंदाज बाद करत संघाला ४८ धावांनी दिमाखदार विजय मिळवून देत स्पर्धेच्या अंतिम सामन्यासाठी प्रवेश निश्चित केला आहे. संघाचे मुख्य प्रशिक्षक जावेद खान, हझीक नदीम, शरद म्हात्रे भेंडखळ क्रिकेट अकॅडमी उरण संघाचे अध्यक्ष संदिप पाटील सचिव मनोज भगत यांनी खेळाडूंनी मैदानावर केलेल्या कामगिरीवर आनंद व्यक्त करत अंतिम सामन्यासाठी संघाला शुभेच्छा दिल्या आहेत.

### रेसिंग सेन्सेशनमध्ये अतिकाने रचला इतिहास

**नवी दिल्ली:** भारताची उदयोन्मुख सेन्सेशन अतिका मीर हिने आंतरराष्ट्रीय कार्टिंग मालिकेत जागतिक दर्जाच्या पुरुष ड्रायव्हर्सना मागे टाकून पात्रता फेरीत चौथे स्थान पटकावले. या चॅम्पियनशिपच्या इतिहासात कोणत्याही महिला रेसरने मिळवलेले हे सर्वात मोठे यश आहे. फॉर्म्युला वन अकादमी आणि अक्सल जीपीच्या मार्गदर्शनाखाली सराव करणाऱ्या ११ वर्षांच्या जम्मू-काश्मीरच्या प्रतिभावान अतिका मीरने आपल्या रेसिंगच्या कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. पहिल्या दिवशी पात्रता फेरीत मिनी गटात अतिकाने चौथे स्थान मिळवले, जो एका महिलेसाठी या मालिकेतील विक्रमी उच्चांक आहे. अंतिम फेरीत अतिकाने चौथ्या स्थानावर रेस पूर्ण केली. पॉडियम फिनिश केवळ ०.०७ सेकंदांनी हुकला आहे.

# भाट्ये किनाऱ्यावर चालण्याची स्पर्धा

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

लायन्स क्लब ऑफ रत्नागिरीतर्फे भाट्ये किनाऱ्यावर चालण्याची स्पर्धा वॉकेथॉन आयोजित केली. या स्पर्धेतून रत्नागिरीकरांमध्ये जलद चालण्याच्या व्यायामाबाबतची जनजागृती करण्यात आली. वाढत्या मधुमेह आजाराबाबत लोकांमध्ये जागृती केली तसेच आजार टाळण्यासाठी व्यायाम, जलद चालणे, सायकलिंग याबाबत प्रबोधन करण्यात आले. या स्पर्धेकरिता समर्थ इन्व्हेस्टमेंट्सचे सहकार्य लाभले. स्पर्धेमध्ये जवळपास १२५ स्पर्धकांनी भाग घेतला. प्रत्येक वयोगटातील पहिल्या तीन विजयी स्पर्धकांना चषक, प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. सर्व सहभागींना प्रमाणपत्र देण्यात आली. या स्पर्धेसाठी अभिजित पड्याळ, प्रथमेश प्रभुदेसाईनी सहकार्य केले. संतोष बेडेकर, संजय पटवर्धन, शरद नागवेकर, मनोज सावंत, अभिजित सरदेसाई, प्रिया थिटे, अनिरुद्ध थिटे, सचिन पानवलकर, भाटकर उपस्थित होते. पुरुष गट- ४० वर्षांवरील गट- प्रथम- सागर लोखंडे, द्वितीय योगेश कदम, तृतीय जयेश शिवलकर, ५० वर्षांवरील गट- प्रथम- नीतेश शिरसाट, द्वितीय दिलीप ओसवाल, तृतीय सुरेश दाते, ६० वर्षांवरील गट- प्रथम- प्रमोद निरोखेकर, द्वितीय- गजानन भातडे, तृतीय अशोकचंद्र शेरे. महिला गट- ४० वर्षांवरील- प्रथम - केतकी लेले, द्वितीय निशिगंधा नवरे, तृतीय वैदेही कदम.

### खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेत
# महाराष्ट्राची पदकांची लयलूट

**। बिकानेर । वृत्तसंस्था ।**

खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेतील पाचव्या पर्वात सलग दुसऱ्या दिवशी महाराष्ट्राच्या खेळाडूंनी पदकांची लयलूट केली. वेटलिफ्टिंगमधील ६५ किलो वजन गटात पुणे विद्यापीठाच्या संजय लोखंडेने सुवर्णपदकाचा करिश्मा घडविला. जलतरणात दीपक पाटील, साहिल पवार यांनी रूपेरी यशाला गवसणी घातली आहे.

आहिल्यानगरमधील शेतकरी कुटुंबातील संजय लोखंडे याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करताना ६५ किलो वजन गटात १०७ किलो स्नॅच व १३७ किलो क्लीन अँड जर्क असे एकूण २४४ किलो वजन उचलून सुवर्ण पदक पटकावले.



अखिल भारतीय आंतर विद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सलग चार वर्ष प्रतिनिधित्व केले आहे. पदकापासून तो वंचित होता. अखेर खेलो इंडियाच्या मैदानात लोखंडेचे पदकाची स्वप्न साकार झाले. पाथर्डी बाबुजी आव्हाड महाविद्यालय तो कला शाखेत पदवीत्तर शिक्षण घेत आहे. प्रा. डॉ. विजय देशमुख, प्रा. सचिन शिरसाट यांचे मार्गदर्शन लाभले.

### मुंबई जिल्हा अजिंक्यपद खो-खो स्पर्धा २०२५-२६
# शिवनेरी, ओम साईश्वर, आर्य सेनाचा दमदार विजय

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई खो-खो संघटनेच्या मान्यतेने इन्स्पायर फाऊंडेशन आयोजित आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) पुरस्कृत कुमार-मुली (ज्युनिअर) जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेचे रंगतदार सामने केशवराव दाते क्रीडांगण, आगाशे पथ, दादर (प.) येथे झाली. मुलींच्या सामन्यात शिवनेरी सेवा मंडळाने ओम समर्थ भारत व्यायाम मंदिरचा ९-४ (मध्यंतर ९-१) असा एक डाव राखून ५ गुणांनी पराभव केला.

मुलींच्या दुसऱ्या सामन्यात ओम साईश्वर सेवा मंडळाने श्री समर्थ व्या. मंदिरचा ५-४ (मध्यंतर ५-२) असा एक डाव राखून १ गुणाने सहज पराभव केला.



मुलांच्या सामन्यात वैभव स्पो. क्लबने अमरहिंद मंडळावर ९-८ (मध्यंतर ८-४) असा ८.१० मि. राखून १ गुणाने विजय मिळवला.

मुलांच्या दुसऱ्या सामन्यात सरस्वती स्पो. क्लब (अ) ने ओम समर्थ भारत व्यायाम मंदिरवर ११-६ (मध्यंतर ११-२) असा एक डाव राखून ५ गुणांनी धुव्वा उडवला. सरस्वतीच्या रोहन कांबळे (नाबाद ३.५० मि. संरक्षण व ३ गुण), समर्थ उपशेटे (३.१० मि. संरक्षण), ओम नरवरे (२.२० मि. संरक्षण व १ गुण), ओमकार, मनीष, सोहम (प्रत्येकी २ मि. संरक्षण) यांनी विजय सहज केला.

मुलांच्या चौथ्या सामन्यात विद्यार्थी क्रीडा केंद्र (अ) ने विद्यार्थी क्रीडा केंद्र (ब) चा ९-६ (मध्यंतर ९-३) असा एक डाव राखून ३ गुणांनी सहज पराभव केला. विद्यार्थी (अ) च्या प्रसाद घाडीगावंकर (४ मि. संरक्षण व ३ गुण), सुबोध पाटील (४ मि. संरक्षण), मनन वाल्मिकी (३ मि. संरक्षण) यांनी तर पराभूत विद्यार्थी (ब) च्या अनमोल वाल्मिकी, आयुष यादव व वेद बोबाडे यांनी चांगली कामगिरी केली.

### कुमार गटात ठाणे ग्रामीण, पुणे ग्रामीण, कोल्हापूर विजयी | कुमारी गटात ठाणे शहर पुणे ग्रामीण उपांत्य पुर्व फेरीत दाखल
# राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा २०२५

**। पुणे । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएसशनच्या मान्यतेने पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या यजमान पदाखाली विधानसभेचे उपाध्यक्ष आण्णा बनसोडे व राकेशभाऊ घुले कबड्डी संघ व युवा प्रतिष्ठान यांच्या विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या ४१ वी कुमार व कुमारी राज्य अजिंक्यपद निवड चाचणी व आमदार चषक कबड्डी स्पर्धेच्या चौथ्या दिवशी पिंपरी चिंचवड बोपखेल येथील दिवंगत श्रीरंग धोदाडे क्रीडानगरीत सुरू असलेल्या कबड्डी स्पर्धा रंगदार सुरु आहेत.






कुमार विभागात ठाणे ग्रामीण, पुणे ग्रामीण, कोल्हापूर तर कुमारी विभागात ठाणे शहर पुणे ग्रामीण व पिंपरी चिंचवड संघ उपांत्य पुर्व फेरीत दाखल झाले आहेत.

मुलींच्या बाद फेरीच्या झालेल्या सामन्यात पुणे ग्रामीण संघाच्या वैभवी जाधव व कोमल महाजन यांच्या आक्रमक चढाया व वैष्णवी चव्हाण आणि सानिका वास्के यांनी घेतलेल्या पकडींमुळे पुणे शहर संघावर ४०-२० अशी मात करीत उपात्य पुर्व फेरीत प्रवेश केला. ठाणे शहर संघाने उपउपांत्य पुर्वफेरीत मुंबई उपनगर पश्चिम संघाचे आव्हान २७-२१ असे मोडून काढत उपांत्य पूर्व फेरीत प्रवेश केला.

मुंबई उपनगर पश्चिमच्या आचल पाल व तनुजा लाड यांनी कडवी झुंज दिली. त्यांना हर्षला लांडे व दृष्टी कोंबेकर यांनी पकडी घेत चांगली साथ दिली.

एकतर्फी झालेल्या सामन्यात पिंपरी चिंचवड संघाच्या किर्ती कडगंची व साक्षी गायकवाड यांनी वेगवान खेळ करत उस्मानाबाद संघाचा ५०-१९ असा सहज पराभव केला.

मुलांच्या बाद फेरीत अत्यंत अटितटीच्या झालेल्या सामन्यात ठाणे ग्रामीण संघाने ठाणे शहर संगावर ३०- २९ असा अवघ्या एक गुणांनी पराभव करून उपांत्य पूर्व फेरीत प्रवेश केला.

पुणे ग्रामीण संघाने पुणे शहर संघावर ४९-३८ असा विजय मिळवित उपांत्य पूर्व फेरीत प्रवेश केला. कोल्हापूरने सांगली संघावर ४१-२५ अशी मात करीत उपांत्य पूर्वफेरीत प्रवेश केला. कोल्हापूरच्या दिव्येंश पिंजारी याच्या वेगवान चढाया व सुनित्र कांबळे यांने केलेल्या पकडींमुळे हा सामना जिंकला. मध्यंतराला कोल्हापूर संघाकडे १८-१२ अशी आघाडी होती. सांगलीच्या साईनाथ लोहार याने केलेल्या चढाया व ओम शिंदे याने घेतल्या पकडींमुळे सामन्यात चांगली रंगत आली होती.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)